


दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com




## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी पर्यंत घ्या !

### सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला फटकारले




**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास राज्य निवडणूक आयोगाला आलेले अपयश पाहता, सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने ही अंतिम संधी देत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

हा निर्णय देताना कोर्टाने नाराजी व्यक्त करत यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही असा इशाराही आयोगा बरोबरच राज्य सरकारलाही दिला आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने ६ मे रोजी दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्याबद्दल निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले आहेत. यापूर्वी निवडणुका चार महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. आयोगाच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, नगरपरिषदांसाठी प्रभाग पुनर्रचना सुरू आहे. तर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी ती पूर्ण झाली आहे. निवडणुकीसाठी आवश्यक असलेल्या ईव्हीएमएसची कमी उपलब्धता, बोर्ड परीक्षांमुळे शाळांची अनुपलब्धता आणि कर्मचाऱ्यांची कमतरता यांसारखी कारणे देत आयोगाने वेळ मागितला आहे.

**निवडणूक आयोगाला निर्देश**

न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर तीव्र असंतोष व्यक्त करत म्हटले की, या न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे वेळेत पालन करण्यात निवडणूक आयोग अपयशी ठरला आहे. मार्च २०२६ मध्ये बोर्ड परीक्षा असल्या तरी, हे निवडणुका पुढे ढकलण्याचे कारण होऊ शकत नाही, असे न्यायालयाने सांगितले. निवडणुकांसाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची माहिती दोन आठवड्यांत राज्याच्या मुख्य सचिवांना सादर करण्याचे निर्देशही आयोगाला देण्यात आले. ३० नोव्हेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

### ओबीसी आरक्षणाचा मुद्दा

■ यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासह घेण्याचे निर्देश दिले होते. बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी असलेल्या ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्यास न्यायालयाने परवानगी दिली होती. दरम्यान आता ३१ जानेवारीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण करा असे थेट निर्देश कोर्टाने दिले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि सर्व महापालिकांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. कोर्टाच्या निर्देशानुसार वॉर्ड रचना ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी लागणार आहे.

## न्यूज ब्रीफ



### महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांचा राजीनामा

**मुंबई :** महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी वैयक्तिक कारणांमुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली. सराफ यांच्याकडे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारची बाजू मांडण्याची तसेच कायदेशीर सल्ला देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी होती. त्यांनी राजीनामा दिला असला, तरी राज्य सरकारच्या विनंतीनुसार ते जानेवारी २०२६ पर्यंत आपले कामकाज सुरू ठेवणार आहेत.

### मराठवाड्यात नदी-नाल्यांना पूर, पिकांचे नुकसान

# राज्यात सर्वदूर पाऊस

**मुंबई, वृत्तसंस्था :**



गत काही दिवसांपासून महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांत विशेषतः मराठवाड्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी नदीनाल्यांना पूर आला आहे. यामुळे रस्ते व शहरांना जोडणारे पूल पाण्याखाली गेले. त्यामुळे अनेक गावांचा शहरांशी असलेला संपर्क तुटला आहे. या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मराठवाड्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांतील शेतीचे या अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील सर्वपक्षीय आमदारांनी मंगळवारी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची विनंती केली. अंबाजोगाई तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे अतोनात नुकसान झाले आहे. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

### राज्यात पुढील दोन दिवस पावसाचे

■ राज्यात पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. काही जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होण्याचीही शक्यता आहे.

### २४ तासांत तीन जणांचा मृत्यू

■ गेल्या २४ तासांत महाराष्ट्रात झालेल्या मुसळधार पावसात तीन जणांचा मृत्यू झाला आहे आणि १२० हून अधिक जणांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि इतर बचाव पथके बाधित जिल्ह्यांमध्ये सुरक्षितस्थळी पोहोचण्यात सहभागी होती. बीड जिल्ह्यात पावसामुळे दोन जणांचा मृत्यू झाला आहे आणि गेल्या २४ तासांत नागपूरमध्ये एकाचा मृत्यू झाला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि नांदेड या विभागात ६५ मिमी पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### उत्तराखंडमध्ये मोठे नुकसान ; पाच जणांचा मृत्यू

■ डेहराडून : उत्तराखंडची राजधानी देहरादून आणि त्याच्या आसपासच्या भागात मंगळवारी ढगफुटी आणि रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले ज्यामध्ये किमान पाच लोक वाहून गेले आणि ५०० हून अधिक लोक विविध ठिकाणी अडकले.

### हिमाचल प्रदेशात पावसाचा कहर ; तिघांचा मृत्यू

■ शिमला : रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक पूर आला आणि मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले, ज्यामध्ये एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आणि मंडी जिल्ह्यात एक बस स्टँड पाण्याखाली गेला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ॲनिमेशन, गेमिंग धोरण जाहीर; राज्य मंत्रिमंडळाचे आठ निर्णय

## राज्यात ७९ शेतकरी भवन उभारणार

**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये नविन एनिमेशन आणि गेमिंग धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी राज्यातील विविध बाजार समितीमध्ये ७९ शेतकरी भवन उभारण्याच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होते. तसेच अनेक क्षेत्रांसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याचेही निर्णय घेतले जातात. १६ सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. याच निर्णयाअंतर्गत राज्य सरकारने मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीने वाढ केली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.




■ महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरण २०२५ जाहीर करण्यात आले आहे. याच निर्णयाअंतर्गत २०५० पर्यंतचे नियोजन करण्यात आले असून सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा हा आराखडा असणार आहे. ■ अकोला येथील दि निळकंठ सहकारी सूतगिरणीला ''खास बाब'' म्हणून शासन अर्थसहाय देण्याचा निर्णय घेण्यात आला. अर्थसहाय्याच्या ५:४५:५० या गुणोत्तरानुसार निवड करण्यात येणार आहे. ■ मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसेच विद्यार्थ्यांनी साठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ करण्यात आली आहे. या निर्णयाच हजारो विद्यार्थी- विद्यार्थिनींना फायदा होणार आहे. ■ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी व अस्तित्वातील भवनांच्या दुरूस्तीसाठी असा एकूण १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च केला जाणार आहे. विविध ठिकाणी ७९ नवीन शेतकरी भवन उभारण्याचे प्रस्तावित आहे. ■ आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेस २ वर्षे मुदतवाढ देण्यात आली आहे. नागपूर, काटोल, कळमेश्वर, (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती ) व संग्रामपूर, (जि.बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा केंद्र उभारण्यात येत आहेत. मुदतवाढीसह योजनेच्या स्वरुपात अनुषंगिक बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ■ राज्याच्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील पायाभूत प्रकल्पांबाबत यापुढे उपसमिती यापुढे मंत्रिमंडळ समिती म्हणून कामकाज करतील. ■ नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी संयुक्त उद्यम कंपनी. महानिर्मिती व मे.सतलज जलविद्युत निगम लि. यांची संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

### मालेगाव ब्लास्ट प्रकरणी उच्च न्यायालयात सुनावणी

**मुंबई :** मालेगाव ब्लास्ट २००८ प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, विशेष न्यायालयाच्या निर्णयाला कुणीही आव्हान देऊ शकत नाही. सुनावणी दरम्यान मंगळवारी उच्च न्यायालय म्हणाले, जर स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातलगांची साक्ष नोंदवली गेली असेल, तर त्याची माहिती न्यायालयाला उपलब्ध करावी. भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर आणि लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सर्व आरोपींना या प्रकरणात निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. पुढील सुनावणी बुधवारी होणार आहे.

### धर्मांतरण कायद्यांच्या वैधतेचा निर्णय सर्वोच्च न्यायालय घेणार !

**नवी दिल्ली :** राज्यांच्या धर्मांतरण कायद्यांना आव्हान देणाऱ्या विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या याचिका हस्तांतरित करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १६ सप्टेंबर रोजी दिले.

विविध राज्यांनी लागू केलेल्या धर्मांतरण कायद्यांना आव्हान देणाऱ्या 'सिटिझन्स फॉर पीस अँड जस्टिस' या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीवेळी सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.







### पाकच्या उपपंतप्रधानांनी ट्रम्प यांचा युद्धबंदीचा दावा फेटाळला

**कतार, वृत्तसंस्था :**

पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी भारत-पाकिस्तान युद्ध थांबवण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला.

मंगळवारी कतारमध्ये अल जझीराशी बोलताना त्यांनी पहिल्यांदाच कबूल केले की भारताने दोन्ही देशांमधील कोणत्याही तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी कधीही स्वीकारलेली नाही. तिसऱ्या पक्षाच्या सहभागासाठी ते तयार आहेत का असे विचारले असता, इशाक दार म्हणाले की आम्हाला कोणताही आक्षेप नाही, परंतु भारताने स्पष्टपणे म्हटले आहे की हा द्विपक्षीय मुद्दा आहे. इशाक दार म्हणाले की, आम्ही कोणाशीही बोलण्यास तयार आहोत. आम्ही शांतताप्रिय देश आहोत आणि संवाद हाच पुढे जाण्याचा मार्ग आहे असे मानतो, परंतु यासाठी दोन्ही पक्षांचा सहभाग आवश्यक आहे. दार म्हणाले की जेव्हा पाकिस्तानने अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यासमोर युद्धबंदीचा मुद्दा उपस्थित केला.



## कोराडी परिसरात पर्यावरण पर्यटन प्रकल्प

# महाजेनको - 'एनएमआरडीए' मध्ये सामंजस्य करार

मुंबई / वृत्तसंस्था

नागपूर महानगर क्षेत्रातील कोराडी (ता.कामठी) या ठिकाणी पर्यावरणीय पर्यटन स्थळ (ईको टुरिझम) विकसित करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महाजनको) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड या कंपनीची २३२.६४ हे. आर. जागा नागपूर प्रदेश विकास प्राधिकरणाला ३० वर्षाच्या भाडे करारावर प्रतिवर्ष १ रूपये भाडेपट्टयावर हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेशकुमार, अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, उर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, महाजेनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, 'नामप्रविप्रा'चे महानगर आयुक्त संजय मीणा आदी उपस्थित होते.



### सामंजस्य कराराचे तपशील

- **कराराची मुदत :** सुरुवातीला ३० वर्षे, वार्षिक केवळ १ रुपये भाडे, व त्यानंतर वाढीव मुदतीचा पर्याय उपलब्ध
- **महाजेनकोचे अधिकार :** सध्याच्या थर्मल पॉवर स्टेशन आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांच्यावर पूर्ण मालकी व नियंत्रण कायम राहणार.
- **प्राधिकरणाचे अधिकार :** तलावाच्या जलपृष्ठभागाचा वापर फक्त पर्यावरण पर्यटन प्रकल्पासाठी करण्याचे विशेष हक्क एनएमआरडीएला दिले जातील.
- **महाजनको :** महाजेनकोच्या संचालक मंडळाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

महाजेनको कंपनीने भाडे कराराने दिलेली जागा मौजा कोराडी, मौजा महादुला, मौजा खापरखेडा, मौजा नांदा (तालुका कामठी) आणि मौजा घोगली ता. नागपूर (ग्रामीण) या भागात आहे. ही जमीन नैसर्गिक संसाधनांच्या सान्निध्यात असून, जागतिक दर्जाचे पर्यावरणीय पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. या उपक्रमाचा मुख्य आधार शाश्वत जलकेंद्रित विविध कार्यक्रम आहे. नॉन-मोटरायझड बोटिंग (पॅडल बोट्स, कायाक्स, कॅनू), पर्यावरणपूरक शिकारा आणि फ्लोटिंग डेक राइड्स, फ्लोटिंग प्लॅटफॉर्मवरून पक्ष्यांचे निरीक्षण, निसग पर्यटन हे उपक्रम या ठिकाणी राबविण्यात येणार आहेत.

प्राधिकरणाला दिलेली जमीन ही नागपूरच्या महत्त्वाच्या शहरी आणि नैसर्गिक संसाधनांच्या जवळ असल्यामुळे, जागतिक दर्जाचे पर्यावरण पर्यटन स्थळ म्हणून तिचा विकास केला जाणार आहे. हा उपक्रम पर्यटन उद्योगास चालना देईल, स्थानिक लोकांना रोजगाराच्या नवीन संधी देईल व परिसराचा सामाजिक, आर्थिक विकास सशक्त करेल.

# कर्जत-जामखेड पंचायत समित्यांच्या कामाचा घेणार आढावा

## रोहित पवार घेणार वार्षिक आमसभा

अहिल्यानगर / वृत्तसंस्था



आमदार रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत आणि जामखेड पंचायत समित्यांच्या वार्षिक आमसभा आयोजित करण्यात आल्या आहेत. कर्जत-जामखेड मतदारसंघातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांतील प्रलंबित तसेच सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी या सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये मतदारसंघातील विविध सरकारी कार्यालयांच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत झालेल्या नसल्याने या दोन्ही पंचायत समित्यांचे कामकाज प्रशासक म्हणून बीडीओ यांच्याकडे देण्यात आलेले आहे. त्यामुळे विकास कामांचा आढावा घेणे आणि प्रत्येक शासकीय कार्यालयात नागरिकांच्या अडकलेल्या कामांचा निपटारा करणे यासाठी या आमसभांना मोठे महत्त्व आहे. या आमसभेला थेट आमदार स्वतः उपस्थित राहणार असल्याने प्रशासनाकडून आमसभेची जोरदार तयारी करण्यात आली आहे. नागरिकांच्याही अडकलेल्या प्रश्नांवर या आमसभेत चर्चा होऊन ते सोडवण्यास मदत होणार आहे.

कर्जत पंचायत समितीची आमसभा गुरुवार १८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शिवपार्वती मंगल कार्यालय, कर्जत येथे पार पडणार आहे. तर जामखेड पंचायत समितीची आमसभा शुक्रवार १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राज लॉन्स, जामखेड येथे होणार आहे. या दोन्ही आमसभांमध्ये २०२४-२५ या आर्थिक वर्षात पूर्ण झालेल्या व सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पीएमपीएमएलच्या ताफ्यात लवकरच 'इलेक्ट्रिक डबल डेकर बस' ची एंट्री

पुणे / वृत्तसंस्था

पीएमपीएमएलच्या ताफ्यात लवकरच इलेक्ट्रिक 'डबल डेकर बसची एंट्री होणार आहे. पुण्यातील कात्रज डेपो ते हिंजवडी अशी डबल डेकर बसची चाचणी काल पार पडली. पीएमपीएमएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांच्या उपस्थितीत ही चाचणी घेण्यात आली. लवकरच पुणेकरांच्या सेवेत डबल डेकर बस येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

यावेळी बोलतांना पीएमपीएमएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे म्हणाले की, आजपासून स्विच कंपनीच्या इलेक्ट्रॉनिक डबल डेकर बसची पुढील काही दिवस चाचणी होणार आहे. या डबल डेकर बसमध्ये अत्याधुनिक अशा सुविधा आहेत. ६५



प्रवासी बसून तर २० प्रवासी हे उभे राहून प्रवास करू शकणार आहे. तसेच या बसमध्ये एसी तसेच सीसीटीव्ही कॅमेरे अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. पुढील काही दिवस आयटी पार्क असलेल्या हिंजवडी येथे याची चाचणी घेण्यात येणार आहे. तसेच यशस्वी चाचणीनंतर पीएमपीएमएल शासकीय मंडळाची बैठक घेऊन सुरुवातीला दहा बस घेण्याचे आमचे नियोजन आहे. तशी चर्चादेखील आम्ही करणार आहोत. यानंतर याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती देवरे यांनी दिली.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर 'शिवस्मारक' आणि 'शिवमुद्रा' उभारणार

मुंबई / वृत्तसंस्था

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान तळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्या बाबत सिडको मार्फत कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले.

मंत्रालयामध्ये अटलसेतुजवळ शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्या बाबत आयोजित बैठकीत सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार बोलत होते. यावेळी आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, सचिव डॉ.किरण कुलकर्णी, नवी मुंबईचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, सिडको आणि 'एमएमआरडीए'चे



अधिकारी उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्राला समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. या सांस्कृतिक वारशाची माहिती सर्वत्र पोहोचविण्यासाठी नियोजन करावे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगड या राजधानीच्या जिल्ह्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जगभरातील पर्यटक येतील, त्यावेळी महाराष्ट्राच्या संस्कृतीची माहिती होण्यासाठी अटल सेतू जवळ शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्याबाबत निधीचा प्रस्ताव तयार करावा. सिडकोने निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करून मान्यता घेऊन या कामाला गती द्यावी. सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी व विभागांनी शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्याच्या अनुषंगाने विविध परवाने त्वरित प्राप्त करुन घ्याव्यात, असे निर्देशही ॲड. शेलार यांनी दिले.

## पाककला

– रुपाली गायकवाड

सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी, बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)



### विड्याच्या पानाची भजी

**साहित्य :-** विड्याची /खाऊची पाने २५, बेसन एक कप, दोन चमचे तांदळाचे पीठ, पाव चमचा हळद, एक चमचा ओवा, चवीप्रमाणे मीठ, पाव चमचा हिंग. पाव चमचा सोडा, एक चमचा गरम तेल. अर्धी वाटी कोथिंबीर.

**कृती :-** सर्वप्रथम विड्याची किंवा खाऊची पानांचे देठ काढून बारीक चिरून घ्या आता त्यामध्ये बेसन तांदळाचे पीठ, हळद, मीठ, ओवा, हिंग, कोथिंबीर घालून थोडं थोडं पाणी घालून घट्टसर मिश्रण तयार करा आता यामध्ये बेकिंग सोडा आणि कडकडीत एक चमचा गरम तेल घालून मिक्स करा. आता या मिश्रणाचे गरम तेलामध्ये भजे तळून घ्या. अतिशय कुरकुरीत आणि खमंग असे विड्याच्या किंवा खाऊच्या पानाची भजे तयार होतात या पानांमध्ये औषधी गुणधर्म असल्यामुळे अशी भजी खायला अतिशय आरोग्यवर्धक आहे नक्की करून बघा.



वरील पाककृतीचे व्हिडीओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.




### राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात अपेक्षित प्राप्ती होईल. विद्यार्थ्यांना स्पर्धामध्ये यश मिळेल. अनावश्यक खर्च टाळावा.
- **वृषभ** : सारं काही मनाप्रमाणे घडत जाईल. खऱ्या हितचिंतकांची पारख करा. मुलांचे प्रश्न मार्गी लागतील.
- **मिथुन** : कामातील धरसोडपणा टाळावा. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. दिलासादायक घटना घडतील.
- **कर्क** : कामाचा उत्साह वाढता राहील. प्रलंबित कामांना गती येईल. छोट्या–मोठ्या प्रवासाचे योग आहेत.
- **सिंह** : व्यवसायात नवे बदल होतील. महत्त्वाचे करार मार्गी लागतील. कौटुंबिक सुख–समाधान लाभेल.
- **कन्या** : आवाका पाहून कार्याची आखणी करा. अनुभवींचा सल्ला कामी येईल. मनाजोग्या घटना घडतील.
- **तूळ** : कार्याचं इतरांकडून कौतुक होईल. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल, आध्यात्मिक प्रगती होईल.
- **वृश्चिक** : प्रेम प्रकरणात वाद–विवाद संभवतात. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावे. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : उगाच चिंता करणं टाळावं. विवाहाच्या प्रयत्नात तडजोड करावी. अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर** : मनाविरूध्द घटना संभवतात. पुरेसा संयम बाळगायला हवा. मुलांच्या प्रगतीत अडचणी येतील.
- **कुंभ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. ठरलेलं उद्दीष्ट गाठू शकाल. तांत्रिक क्षेत्रात संधींचा लाभ घ्यावा.
- **मीन** : महत्त्वाची कामं रखडतील. बेरोजगारांनी प्रयत्न सुरू ठेवावेत. विद्यार्थ्यांना अनुकूलता राहणार आहे.

### मेक अप मॅनिया

## सर्रास वापरा सीरम

त्वचा हेल्दी बनवायची तर सीरमचा वापर करणं आवश्यक आहे. मॉईश्चरायजर लावण्याआधी याचा वापर करावा. सीरम त्वचेला हायड्रेट करण्याचं काम करतात. हे क्रीमसारखे चिकट नसल्याने त्वचेमध्ये सहज सामावून जातात. यांच्यामुळे फाउंडेशन लावण्याआधी परफेक्ट बेस तयार होतो. सीरम इसेंशियल ऑईल्सपासून बनत असल्याने त्वचेला पोषण मिळतं.

* **तेलकट त्वचा**– या त्वचाप्रकारासाठी सॉलिसिलीक ॲसिड, रेटिनॉलचं प्रमाण असलेलं फेस सीरम निवडावं. रेटिनॉल सीरम अँटी एजिंगचे फायदेही देतं. रोजहिप सीड ऑईलही त्वचेवर उत्तम परिणाम करत असतं.
* **कोरडी त्वचा**– कोरड्या त्वचेवर हायल्युरॉनिक ॲसिड किंवा व्हिटॅमीन सीचं प्रमाण जास्त असलेलं सीरम वापरावं. व्हिटॅमीन सीमुळे त्वचेचा प्रदुषणापासून बचाव होतो.
* **सामान्य त्वचा**– सामान्य त्वचेसाठी ग्लाएकॉलिक ॲसिड सीरम उत्तम आहे. या सीरमच्या वापरामुळे त्वचा टवटवीत दिसण्यास मदत होत असते. याशिवाय रात्रीसाठी नाईट सीरमचा वापर करू शकता.

### दिनविशेष

## १७ सप्टेंबर

- १९५० : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म.
- १९९९ : प्रसिद्ध गीतकार हसरत जयपुरी यांचं निधन.
- २०१३ : कोळसा खाणवाटप गैरव्यवहार चौकशीतील असहकार्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला पुन्हा फटकारलं.
- २०१४ : चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांचं भारत दौऱ्यावर आगमन.
- २०१७ : पी.व्ही. सिंधू कोरियन ओपन सुपर सीरिज जिंकणारी पहिली भारतीय ठरली.

### स्मार्ट ॲप्स

## हटके गेम्स

गुगल प्ले स्टोअरवर बरेच गेमिंग ॲप्स आहेत. त्यापैकी काही ॲप्स खूपच लोकप्रिय आहेत. कोट्यवधी लोकांनी अशी ॲप्स डाउनलोड केली आहेत. विशेष म्हणजे ही ॲप्स तुमच्या मोबाईलमधली फार जागा व्यापत नाहीत.

* डॉ. ड्रायव्हिंग हा रेसिंग गेम आहे. हा गेम स्मार्टफोनवर अगदी सहज खेळता येईल. रेसिंग गेमच्या चाहत्यांसाठी हा गेम म्हणजे एक पर्वणीच आहे.
* बास्केटबॉल शूट ॲप एक कोटी लोकांनी डाउनलोड केलं आहे. यात बॉल बास्केटमध्ये गेल्याावर पॉईंट्स मिळतात. प्रत्येक सेटमध्ये ठराविक बॉल दिले जातात.
* आर्चरी हा गेम पाच कोटी लोकांनी डाउनलोड केला आहे. या ॲपचा आकार २० एमबी आहे. इथे तुम्हाला नेम धरायचा आहे. योग्य ठिकाणी निशाणा लागला तर गुण मिळतात.
* प्ले टेनिस हा गेम अनेकांना आवडतो. नावावरूनच हा टेनिस गेम आहे हे कळतं. यात तुम्हाला टेनिस खेळायचं आहे. नियमानुसार गुण दिले जातात. प्रतिस्पर्धी खेळाडूला हरवणं हे तुमचं उद्दिष्ट असतं.

### पंचांग

**बुधवार, १७ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
भाद्रपद कृ. ११, नक्षत्र : पुष्य
चंद्रराशी : कर्क, योग : परिघ,
सूर्योदय : ६.२९, सूर्यास्त : ६.३७

### फॉरवर्डस

**मिल जाता हैं दो पल का**
**सुकून तेरी बन्दग़ी में...**

**वरना परेशां क़ौन नहीं अपनीं**
**अपनीं ज़िन्दग़ी में...!**

### आरोग्यमंत्र

## शिसं फायदे आणि तोटे

शिसं म्हणजे जडशीळ स्वरूपाचा धातू. पुरातन काळापासून ज्ञात असला तरी त्याचे दुर्गुण मात्र याच शतकात कळायला लागले. दुर्गुण कळले म्हणून वापराची पद्धत बदलली आणि नवीन पद्धतीनं त्याचा वापर सुरू झाला. अत्यल्प शिशाचं प्रमाणही मानवी शरीरात कायमचे दोष निर्माण करू शकतं. मेंदू व मज्जातंतूंच्या कधीही बऱ्या न होणाऱ्या व्याधींची सुरुवात होऊन बधिरता, जडत्व येऊन हळूहळू हालचालीच बंद होत जातात. रक्तातल्या पांढऱ्या पेशींची संख्या शिशामुळे कमी होत जाते.

भूक मंदावते. प्रतिकारशक्ती कमी होते. हे कळलं तसा शिशाचा अनेक वर्षे चालू असलेला पाण्याचे नळ, घराचे पत्रे, मासेमारीचा हुक यातला वापर थांबत गेला. मग शिशाचा नवीन वापर सुरू झाला. सर्व प्रकारची रेडिओॲक्टिव्ह किरणे फक्त शिशाचा पत्रा सहजरित्या अडवतो, हा गुण कळल्यानंतर अणुभट्ट्या, आण्विक साधनं, क्ष किरणांशी संबंधित काम करणाऱ्यांसाठी हातमोजे, झगे, बूट, गरजेनुसार भिंतीच्या विटांना लावलेले जाड पत्रे या ठिकाणी आता शिशाचा वापर होऊ लागला आहे. मोटारींच्या बॅटरीत आजही शिसं वापरतात. पेट्रोलमध्ये ज्वलन चांगलं व्हावं म्हणून शिसं अत्यल्प प्रमाणात घातलं जातं. या पेट्रोलच्या वापरातून निघणारा धूर हा श्वसनाद्वारे आसपासच्या लोकांच्या रक्तात मिसळला जातो. त्याचे दुष्परिणाम दिसायला कित्येक वर्षे जावी लागतात. पण मोठ्या शहरांतून वाढत असलेले वाहनांचे प्रमाण लक्षात घेता ही वेळ फार दूरवरची नव्हे. या बाबतीतील जागरूकता निर्माण व्हायला हवी.

### ग्रुमिंग

* आंघोळीनंतर घाम रोखण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या स्प्रे चा वापर करा. काखेत, पायांवर किंवा जास्त प्रमाणात घाम येणाऱ्या भागावर हा स्प्रे शिंपडा. नैसर्गिक घटकांनी युक्त प्रोडक्टची निवड करा. त्याचा त्वचेला त्रास होत नाही ना, हे तपासून घ्या.

* आंघोळीनंतर स्वच्छ धुतलेले आणि कडक वाळलेले कपडे घाला. अनेक जण आधीच्या दिवशी वापरलेला टी शर्ट परत घालतात. टी शर्ट किंवा शर्ट आधी तासभर घातला असला तरी बॅक्टेरियांची वाढ होण्यास तेवढा वेळ पुरेसा असतो. व्यायाम करताना घातलेले कपडे धुतल्याशिवाय पुन्हा घालू नका. (क्रमशः)

### करिअरवाटा

## संधी सायबर लॉ मधल्या

सध्याच्या बदलत्या तांत्रिक युगामध्ये इंटरनेटशी संबंधित सर्व व्यवहारांमध्ये कायद्याचा प्रश्न येईल तिथं सायबर लॉ चं ज्ञान महत्त्वाचं ठरतं. सायबर लॉ ला राज्याच्या किंवा देशाच्या सीमा लागू नाहीत. कारण इंटरनेटचं विश्व आंतरराष्ट्रीय आहे. ई–बिजनेस, ई–कॉमर्स, ई–गर्व्हनन्स आणि ई–प्रोक्युरमेंट असे सगळे व्यवहार या कायद्याच्या अंतर्गत येतात. या कायद्याखाली इंटलेक्चुअल प्रॉपर्टी, कॉपीराईट्स आणि ट्रेडमार्कस् आदी संबंधीचे कायदे अंतर्भूत आहेत. हॅकिंग, क्रेडीट कार्डसंबधीचे गुन्हे, सायबर स्टॉकिंग, पोर्नोग्राफी आणि ब्लॅकमेलिंग हे सगळे गुन्हेही या कायद्याखाली हाताळले जातात. हल्ली अशा गुन्ह्यांचं प्रमाण वाढत असल्यामुळे या कायद्याचं महत्त्वही वाढत आहे. साहजिक त्याच्याशी संबंधित नोकरीच्या संधीही वाढत आहेत. या क्षेत्रात काम करणाऱ्यांना अनेक प्रकारची तांत्रिक कामं करावी लागतात. त्यामुळे ती व्यक्ती तंत्रज्ञानात वाकबगार असली पाहिजे त्याचबरोबर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होणाऱ्या नवनव्या बदलांचं आकलन करण्याची क्षमताही त्याच्यात असली पाहिजे. सायबर लॉच्या संबंधात प्राथमिक माहिती देणारा पदविका अभ्यासक्रम आणि दुसरा पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. इच्छुक तो पूर्ण करु शकतात.



### खेचाखेची

## डॉक्टरच्या मढ्यावर

**डॉक्टर :–** काका, पौष्टिक खा, बदाम खा भिजवून, फळे खा, पालेभाज्या खा..
घरातलं खावं जरा,..
रोज काय वडापाव, मिसळ...?

**काकू :–** तुम्हीच समजावून सांगा ह्यांना डॉक्टर. हजारवेळा सांगितलं डॉक्टरच्या मढ्यावर पैसा घालण्यापेक्षा चांगलचुंगलं खाण्यावर घालवा...

डॉक्टर अजूनही बेशुद्ध आहे.

### वेगळं काही

दक्षिण रेल्वेने विशेष ट्रेन सुरू केली तेव्हा इंग्लंड मधल्या एका नवपरिणित जोडप्याने आपल्या हनिमूनसाठी ही संपूर्ण ट्रेन आरक्षित केली. ही ट्रेन पहिल्यांदा आरक्षित करण्याचा मान त्यांना जातो. ३० वर्षांचा ग्रॅहम विलियम लिन आणि २७ वर्षांची सिल्विया प्लासिक निलगिरी पर्वतरांगांमध्ये आपला हनिमून साजरा करायचं ठरवलं. यासाठी त्यांनी मेत्तुपलयम ते उधगमंडलम या दरम्यान संपूर्ण ट्रेन आरक्षित केली होती. एका मार्गाच्या प्रवासासाठी त्यांनी तब्बल तीन लाख रूपये खर्च करून ही ट्रेन आरक्षित केली आणि पर्वतरांगांमधून प्रवासाचा आनंद लुटला. या नवपरिणित जोडप्याचं स्थानकांवर स्वागतही करण्यात आलं. पर्यटनाला बळकटी देण्यासाठी हे ट्रेन सुरू करण्यात आली.

### सौंदर्यसाधना

## कोणतं क्रीम वापरू ?

सौंदर्यवर्धनासाठी अनेक क्रीम्स उप्लब्ध आहेत. त्यातही सध्या बीबी, सीसी आणि डीडी क्रीम्सची चलती बघायला मिळते. मात्र क्रीम खरेदी करताना गोंधळ उडत असेल तर तो दूर करणाऱ्या काही बाबी लक्षात घ्यायला हव्या.



* ब्युटी बाम किंवा ब्लॅमिश बाम म्हणजे बीबी क्रीम. या क्रीमचं टेक्श्चर क्रीमी आणि मॉईश्चरायझरसारखं असतं. या क्रीममुळे त्वचेचा टोन राखला जातो. फारसा मेक अप करायचा नसेल किंवा मेक अपची आवड नसेल तर बीबी क्रीम उत्तम ठरतं. हे क्रीम लावल्यावर त्वचेवरचे डाग लपतात. * सीसी क्रीम फाउंडेशन, प्रायमर, ब्राइटनर म्हणून काम करतं. सीसी म्हणजे कलर कंट्रोल क्रीम. हे क्रीम त्वचेत लगेच शोषलं जातं. तेलकट त्वचा असणाऱ्या महिलांनी सीसी क्रीम वापरावं. या क्रीममध्ये 'ई' आणि 'सी' जीवनसत्त्वं असतात. यामुळे त्वचा ताजीतवानी दिसते. प्रौढ महिलांसाठी सीसी क्रीम योग्य ठरतं. * डीडी क्रीम म्हणजे डेली डिफेन्स. या क्रीमचं टेक्श्चर क्रीमी असतं. २५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी या क्रीमचा वापर करावा. ते त्वचेच्या विविध समस्यांवर प्रभावी ठरतं. हे क्रीम तुम्हाला दिवसभर ताजंतवानं ठेवतं.

दैनिक महाभूमि

# बुलढाणा भूमि

बुधवार । १७ सप्टेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

### सोने-चांदी

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | १०७००० |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | १०८००० |
| चांदी (प्रति किलो) | १२५००० |

### बाजारभाव

**चिखली कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २१५० | २४०० |
| मुंग | ५२०० | ६००० |
| सोयाबीन | ३८५० | ४२०० |
| तुर | ५१५० | ६१०० |
| ज्वारी | १४५१ | १७०० |

**खामगाव कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २५०० | २६५० |
| हरभरा | ४४०० | ५९५० |
| सोयाबीन | ३४५० | ३४२५ |
| तुर | ५४०० | ६५०० |
| ज्वारी | १७०० | २२५० |

### दखल...

**आत्महत्या प्रतिबंध सप्ताह**

पुनरपी जन्मम् पुनरपी मरणम्
च्या फेऱ्यातून सुटण्याची
मनुष्य योनीतच मिळते संधी
म्हणून आत्महत्येच्या विचारांना
मनी थारा देऊ नये कधी..

संकटे येतील जातील
हे जिवनचक्र आहे
संयमाने करावा सामना
यातच पुरुषार्थ किर्ती आहे..

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर. (९४२१३९४३३९)

## मागील ४८ तासात ठिकठिकाणी पावसाची हजेरी..

# जिल्ह्यातील ११ महसूल मंडळात अतिवृष्टी

**बुलढाणा/प्रतिनिधी**

गत वर्षाच्या तुलनेत यंदाचे पर्जन्यमान अधिक आहे. मे अखेरीसच दाखल झालेल्या मान्सूनने जिल्ह्यात ठिकठिकाणी हजेरी लावल्याने दिलासा मिळाला होता. दरम्यान, हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार सोमवारी पावसाने पुन्हा हजेरी लावली. मागील ४८ तासात झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील ११ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. यामध्ये मलकापूर तालुक्यातील जांभूळधाबा येथे सर्वाधिक १७५ मिमी पावसाची नोंद झाली. सोमवारी सकाळी सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा येथील शेती पाण्याखाली गेल्याचे दिसून आले. यानंतरही विविध तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून भरपाईची मागणी होत आहे.



### 'या' महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद

■ जिल्हा प्रशासनाच्या १६ सप्टेंबरच्या अहवालानुसार चिखली तालुक्यातील पेठ, देऊळगाव राजा तालुक्यातील तुळजापूर, अंढेरा, सिंदखेड राजा तालुक्यातील सिंदखेड, किनगाव, दुसरबीड, मलकापूर तालुक्यातील मलकापूर, नरवेल, धरणगांव, जांभूळधाबा तर मोताळा तालुक्यातील शेलापूर अशा एकूण ११ मंडळात ६५ मिलीमीटर पेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे.



### दोन प्रकल्पाचे द्वार उघडले

■ जिल्ह्यातील सर्वात महत्वकांशी संत चोखा सागर (खडकपूर्णा) प्रकल्पाचे १९ दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले असून नदीपात्रात ४६ हजार ८५४ घन फूट प्रति सेकंद पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तर मेहकर तालुक्यात पैनगंगा नदीवरील पेनटाकळी प्रकल्पाचे ५ दरवाजे २० सेंटीमीटरने मंगळवारी सकाळी उघडण्यात आले आहे. पाण्याची आवक पाहता विसर्ग कमी अथवा जास्त केला जाऊ शकतो, या दोन्ही नद्यावरील गावांना सतर्कतेचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.



### नदीला पूर; नुकसान भरपाईची मागणी

■ देऊळगाव राजा तालुक्यात मुसळधार पाऊस बरसला. त्यामुळे तालुक्यात अनेक नदी नाल्यांना पूर आला आहे. आमना नदीला सुद्धा यावेळी मोठा पूर आला असून नदी दुथडी भरून वाहत आहे. या नदीचे पाणी काठावरील शेतात तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिरले. शिवाय नदीकाठावरील घरांमध्ये सुद्धा पाणी शिरले आहे. नदीचे पाणी शेतात शिरल्याने शेतीचे आणि पिकांचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी जोर धरत आहे.

### बुलढाण्यात घरावर कोसळली वीज

■ पावसासह वीजांच्या तांडवाने अनेक भागात नुकसान झाले. बुलढाणा शहरातील क्रीडा संकुल रोड परिसरात भूषण यंदे यांच्या घरावर सोमवारी मध्यरात्री वीज कोसळली. यामध्ये, मोठे नुकसान झाले आहे. त्याआधी खामगाव तालुक्यातील वरवट-शेगाव मार्गावर काथरगाव येथील बसथांब्याजवळ विजेचा धक्का बसून एका युवकाचा मृत्यू झाला असून दुसरा युवक गंभीर जखमी झाला आहे. योगेश भानुदास देवकुडे (वय २८, रा. काथरगाव) असे मृतकाचे नाव आहे.

## शासन निर्णय आला, मानधन केव्हा येणार?

### रोजागार सेवकांचा सवाल ▶ आंदोलनाचा ईशारा

**चिखली/प्रतिनिधी**

मनरेगा योजनेंतर्गत ग्रामीण रोजगार सेवकांना दरमहा मानधन देण्याचा शासननिर्णय प्रसिद्ध होवून दहा महिन्यांचा कालावधी उलटला आहे. परंतु, अजूनही मानधन मिळाले नसल्याने शासन निर्णय आला, मानधन केव्हा येणार? असा सवाल उपस्थित करत चिखली तालुक्यातील रोजगार सेवकांनी बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भातील निवेदन गट विकास अधिकारी यांच्याकडे देण्यात आले.



ग्रामपंचायत व पंचायत समितीशी जोडणारा महत्वाचा दुवा म्हणून ग्राम रोजगार सहाय्यकांना ओळखले जाते. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने मनरेगा योजने संदर्भात शासननिर्णय प्रसिद्ध केला होता. यानुसार, रोजगार सेवकांना दरमहा ८ हजार रुपये व २ हजार रुपयांचा अधिकचा भत्ता असे मानधन नियोजित करण्यात आले होते. शासन निर्णय प्रसिद्ध होवून दहा महिने उलटले परंतु अद्याप अंमलबजावणी झाली नाही. सप्टेंबर २०२४ ते अद्यापपर्यंत जिल्ह्यातील रोजगार सेवकांचे मानधन प्रलंबित आहे. यामुळे, जिल्ह्यातील सर्वच ग्राम रोजगार सहाय्यकांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी व मानधन वितरित न केल्यास १८ सप्टेंबर २०२५ पासून जिल्हाभरात बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## सेवा पंधरवडा योजनेचा लाभ घ्यावा : तहसीलदार

**चिखली/प्रतिनिधी**



महसूल व वन विभागाच्या निर्णयानुसार राज्यात १७ सप्टेंबर ते २ आक्टोंबर या कालावधीत तीन टप्प्यात 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत विविध योजनांचा लाभ सामान्य नागरिकांना मिळणार असून, सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार संतोष काकडे यांनी केले आहे.

पहिल्या टप्प्यात पाणंद रस्ते खुले करण्याबाबत कार्यक्रम राबविण्यात येणार असून यामध्ये ग्रामीण रस्ते, गाडीमार्ग, पायमार्ग या रस्त्यांचे सिमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देण्याबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या कालावधीत शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अंमलबजावणी करण्यात येणार आहे. अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्यात आलेल्या असुन सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. शासन निर्णय व प्रचलित धोरणांनुसार कार्यवाही करण्यात येणार असून तसेच भुमिहिन गरजु व बेघर कुटुंबांना घरकुलासाठी जागा नियमानुकुल करण्यासाठीचे परिपूर्ण प्रस्ताव हे शक्ती प्रदत्त समीतीकडे उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात येणार आहेत, जेणेकरुन भुमिहीन मंजुर घरकुल लाभार्थी जागेअभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित राहणार नाही. सेवा पंधरवडा अभियानात सहभागी होवून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे तहसीलदार काकडे यांनी संगितले.

## सौर प्रकल्प स्थलांतरीत करण्याची मागणी

**सिंदखेड राजा/प्रतिनिधी**

तालुक्यातील किनगांव राजा येथे होवू घातलेला मुख्यमंत्री सौर कृषी वहिनी प्रकल्प स्थलांतरीत करण्यासाठी ग्रामस्थांनी उपोषणाला सुरवात केली आहे.

शासकीय जमीन गट क्र.५२५ मधील एच-क्लास जागेवर सौर कृषी वाहिनी प्रकल्प नियोजित असुन सौर कृषी वाहिनी प्रकल्पाला स्थानिक नागरिकांचा विरोध नसुन फक्त जागा स्थलांतरीत करण्याच्या मागणी तसेच फुले नगर येथे ग्रामपंचायत नमुना आठ अ मधील सरकार ही नोंद कमी करून मालक म्हणून संबंधित नागरीकांचे नावे लावण्यात यावे, पात्र घरकुल लाभार्थ्यांना त्याच ठिकाणी घरकुलांचा लाभ देण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांची केली आहे. या संदर्भात प्रशासनाला लेखी तक्रार देण्यात आली होती. परंतु कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्यामुळे



अखेर ग्रामस्थांनी उपोषणाला सुरुवात केली. फुले नगर येथील वस्ती मध्ये मागील ५० ते ६० वर्षापासून नागरीक वास्तव करतात,परंतु अद्यापही नागरिकांना स्वतःच्या जागा नावावर करण्यात आलेली नाही.सदर शासकीय जमिनीवर सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून शेकडो वृक्षांची लागवड करण्यात आली होती. सदर वृक्षांची जेसीबीच्या सहाय्याने वृक्षतोड करण्यात आली आहे. हा प्रकल्प शासकीय जमिनीवर स्थलांतरित करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

## रस्ता चिखलमय, शेतात जाण्यासाठी संघर्ष!

**अंढेरा/प्रतिनिधी**

परिसरातील शेतरस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. चिखल, खड्डे, काटेरी फांद्या यामुळे शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांचे दैनंदिन जीवनमानच संकटात आले आहे. विशेषत: रामेश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता पूर्णपणे चिखलात माखल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून जावे लागते.

दरवर्षी पावसाळ्यात अंढेरा धोत्रा नांदई मार्ग तसेच रामेश्वर मंदिरकडे जाणारा रस्ता चिखलाने बंदिस्त होतो. पावसाचे पाणी न वाहिल्याने दलदल तयार होऊन वाहने अडकतात. अनेकदा शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना गुडघाभर चिखलातून चालत जावे लागते. दुचाकी घसरतात, ट्रॅक्टर रुततात, कपडे फाटतात, अपघात होतात. रस्त्यांमुळे शेतीमालाची वेळेवर बाजारपेठेत वाहतूक होत नाही. भाजीपाला, सोयाबीन, कापूस ही पिके खराब होतात. शेतमजुरांनाही वेळेवर कामावर जाता येत नाही. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, एखादा आजारी पडल्यास दवाखान्यात पोहोचणे जीवघेणे ठरते, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. फक्त २०१६ पासून शेतकरी व ग्रामस्थांनी जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाला निवेदने दिली आहेत.

### अन्यथा आंदोलन छेडू; ग्रामस्थांचा इशारा

■ शेतरस्त्यांवर तातडीने मुरूम टाकून वाहतुकीस योग्य बनवावे, काटेरी झुडपे व फांद्या कापून रस्ता मोकळा करावा, कायमस्वरूपी खडीकरण करून शेतकऱ्यांची वाट मोकळी करुन द्यावी, लवकरात लवकर रस्त्यांची दुरुस्ती केली नाही, तर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा रामेश्वर वाघ यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.



### न्यूज ब्रीफ

#### कौशल्य स्पर्धेसाठी नोंदणीचे आवाहन

**बुलढाणा :** सर्वांत मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा दर दोन वर्षांनी घेण्यात येत असून ही जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई, चीन येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची संधी असून तरुणांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करुन या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सील तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने ६३ विविध क्षेत्रांमध्ये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर स्किल कॉम्पीटीशनचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमधून

#### वाहनाच्या धडकेत एक ठार

**मोताळा :** भरधाव वेगात आलेल्या चारचाकी वाहनाने मालवाहूला जोरदार धडक दिल्याने मालवाहूच्या चालकाचा मृत्यू झाल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घुस्सर फाट्याजवळ घडली. मृताचे नाव बिस्मिल्ला शाह अय्युब शाह (रा. मलकापूर) असे आहे. याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मलकापूर येथील मुस्ताक अली नगरात राहणारे मकबुल शाह अय्युब शाह यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ बिस्मिल्ला शाह हा मालवाहू घेऊन बुलढाणा येथून मलकापूरकडे जात होता. या अपघातात बिस्मिल्ला शाह यांचा जागीच मृत्यू झाला.

#### राशन दुकानदारांना माहिती देण्याचे आवाहन

**साखरखेर्डा :** सिंदखेडराजा तहसील कार्यालयाच्या माहितीनुसार, तालुक्यात एकूण ६,९३७ एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक आहेत. यापैकी ४,८२९ कुटुंबांची बँक खात्यांची माहिती मिळालेली असून, २,१०८ खातेदारांची माहिती अजूनही प्राप्त होणे बाकी आहे. पुरवठा अधिकारी यांनी राशन दुकानदारांना या माहितीची तातडीने नोंद करण्याचे आवाहन केले आहे.

### अनेक दशकांपासून शिक्षणक्षेत्रात सेवा देणाऱ्या शिक्षकांची नाराजी

# नव्याने 'शिक्षक पात्रता परीक्षा' घेणे असंयुक्तिक!

**अभिषेक वरपे**

**बुलढाणा :** पहिले ते आठवीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या राज्यातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आल्याचा शासननिर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने प्रसिद्ध करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबरला ही परीक्षा पार पडणार असून, गेली अनेक वर्षे शिक्षक म्हणून सेवा बजाविणाऱ्यांनाही आता पुन्हा एकदा परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. शिक्षक संघटना व शिक्षकांकडून या निर्णयावर नाराजी व्यक्त होत आहे. दीर्घ सेवा करूनही परीक्षेमुळे नोकरी गमवावी लागणे हा अन्याय असून नव्याने 'टीईटी' परीक्षा घेणे असंयुक्तिक असल्याचा सूर उमटत आहे.



"शिक्षकांचे ज्ञान व अध्यापन कौशल्य सतत अद्ययावत राहिले पाहिजे. यासाठी टीईटी आवश्यक आहे. मात्र अनुभवी शिक्षकांसाठी प्रशिक्षण/रिफ्रेशर कोर्सेस किंवा वेगळी संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. न्यायालयाचा निर्णय मान्य करूनही शासनाने शिक्षकांना मदत करणारी उपाययोजना करायला हवी.
- **जयश्री महेंद्र जाधव,** सहाय्यक शिक्षिका



"स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे आहे आणि शिक्षक त्यासाठी प्रयत्न सुद्धा करतात परंतु टीईटी परीक्षा म्हणजेच शिक्षकाचे भवितव्यच असे ठरविणे हे शिक्षकांना नाऊमेद करण्यासारखे आहे.
- **गजानन पवार,** सहाय्यक शिक्षक



"शिक्षकांना निवड मंडळामार्फत परीक्षा घेऊन नियुक्त दिली गेली. शैक्षणिक अहर्ता शिक्षकांनी पूर्ण केली असल्याने आता नव्याने शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करणे शिक्षकांवर अन्यायकारक होईल. शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवरचा मानसिक आणि शारीरिक ताण वाढवणारा हा निर्णय ठरू शकतो.
- **अशोक खोरखेडे,** जिल्हाध्यक्ष शिक्षक भारती संघटना





"आधीच्या सर्व निकषांवर पात्र ठरुन शिक्षकांची सेवा सुरू आहे. विशेष म्हणजे, 'टीईटी' अन्उतीर्ण होण्याची भीती मुळातच शिक्षकांना नाही आहे. परंतु, नव्याने टीईटी घेतल्यास सर्व प्रक्रियेत व व्यवस्थापनात अनियमितता निर्माण होणार असल्याची दाट शक्यता आहे.
- **डॉ.संजय सोनुने,** राज्य उपाध्यक्ष प्राथमिक शिक्षक संघ

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर शिक्षण खात्याकडून स्पष्ट संकेत देण्यात आले असून, टीईटी न केलेल्या शिक्षकांना सेवानिवृत्त होण्यापूर्वीच पदावरून हटवले जाऊ शकते, असा इशारा मिळतोय. नियुक्तीच्या अथवा पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेले शिक्षक आणि सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले शिक्षक चिंतेत आहेत. नव्याने टीईटी परीक्षा घेणे योग्य नाही, असा सूर सध्या शिक्षक व शिक्षक संघटनांमधून उमटत आहे. अनेक शिक्षकांनी दशकभरापासून शिक्षण क्षेत्रात सेवा दिल्यानंतर आता पुन्हा एकदा पात्रता परीक्षा देण्याची सक्ती करणे ही अन्यायकारक बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## रब्बी हंगामाची तयारी करताय, अर्ज केला का?

**बुलढाणा/प्रतिनिधी**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत अन्नधान्य पिके व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीतधान्य पिके सन २०२५-२६ अंतर्गत रब्बी हंगामामध्ये पीक प्रात्याक्षिके तसेच प्रमाणित बियाणे वितरण या बाबीचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी चालू वर्षी हरभरा, ज्वारी, मका, तीळ, करडई, भूईमुंग व मोहरी या पिकांचे महाडीबीटी प्रणालीव्दारे बियाणे या घटकासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार आहे. पीक प्रात्याक्षिके ही बाब शेतकरी गटामार्फत राबविली जाणार आहे.

पीक प्रात्याक्षिकासाठी एका शेतकऱ्याला एक एकर मर्यादेत निविष्ठा स्वरुपात अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार आहे. प्रमाणित बियाणे वितरणासाठी एका शेतकऱ्याला आवश्यक असणाऱ्या बियाण्याचा दोन हेक्टर मर्यादेत



लाभ देय असणार आहे. प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य या पध्दतीने लॉटरी करण्यात येणार आहे. या निविष्ठांचा पुरवठा करण्यासाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या अर्जातून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर बियाणे, औषधे व खते या बाबीअंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येईल. यासाठी जास्तीत-जास्त शेतकरी बांधवांनी संकेतस्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत व या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

## विम्याला जीएसटी सूट पण..!

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने (सीबीआयसी) मंगळवारी सांगितले की, विमा कंपन्या २२ सप्टेंबरपासून 'इनपुट' म्हणजेच वैयक्तिक आरोग्य आणि जीवन विमा पॉलिसींसाठी कमिशन आणि ब्रोकरेजसारख्या कच्च्या मालासाठी भरलेल्या जीएसटीवर इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) दावा करू शकणार नाहीत. २२ सप्टेंबरपासून नवीन जीएसटी स्लॅब लागू झाल्यावर विविध वस्तू आणि सेवांवरील कर आकारणीबद्दल स्पष्टीकरण देणारे वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) सीबीआयसीने जारी केले आहेत. जीएसटी कौन्सिलने ३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत वैयक्तिक आरोग्य आणि जीवन विमा पॉलिसींवर भरलेल्या प्रीमियमला जीएसटीमधून सूट देण्याचा निर्णय घेतला. सध्या त्यावर १८ टक्के दराने जीएसटी आकारला जातो. ही सूट २२ सप्टेंबरपासून लागू होईल. विमा कंपन्यांच्या कोणत्या 'इनपुट' सेवांना जीएसटीमधून सूट आहे या प्रश्नाला उत्तर देताना सीबीआयसीने म्हटले आहे की, सध्या विमा कंपन्या अनेक इनपुट आणि कमिशन, ब्रोकरेज आणि पुनर्विमा यासारख्या इनपुट सेवांवर आयटीसीचा लाभ घेत आहेत. या इनपुट सेवांपैकी, पुनर्विमा सेवांना सूट दिली जाईल. इतर कच्च्या मालाच्या बाबतीत, इनपुट कर क्रेडिट मागे घेतले जाईल. कारण जीएसटी सूट अंतिम उत्पादन सेवांना दिली जात आहे, सीबीआयसीने म्हटले आहे. याचा अर्थ असा की वैयक्तिक विमा पॉलिसींच्या बाबतीत कमिशन आणि ब्रोकरेजसारख्या 'इनपुट'वर भरलेले कर विमा कंपन्यांना खर्च होतील कारण ते असे कर सेट ऑफ करू शकणार नाहीत. सीबीआयसीने असेही स्पष्ट केले की, दररोज प्रति खोली ७,५०० रुपयांपेक्षा कमी किंवा त्यापेक्षा कमी किमतीचे निवास युनिट्स प्रदान करणारे हॉटेल अशा युनिट्सवर आयटीसीचा लाभ घेऊ शकणार नाहीत. कारण आयटीसीशिवाय अशा पुरवठ्यांवर पाच टक्के जीएसटी दर लागू आहे. त्याचप्रमाणे, सौंदर्य आणि शारीरिक तंदुरुस्ती सेवांवर देखील आयटीसीशिवाय पाच टक्के कर आकारला जातो. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने म्हटले आहे की, ५ टक्के आयटीसीशिवाय श्रेणीत येणाऱ्या सेवा प्रदात्यांना या सेवांवर १८ टक्के आयटीसी आकारण्याचा पर्याय नाही. सरकारला या बदलांचा जास्तीत जास्त फायदा ग्राहकांना मिळावा अशी इच्छा आहे, म्हणून त्यांनी या उद्योगांसाठी दुहेरी दर रचनेला परवानगी दिलेली नाही. इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) नसलेले ५ टक्के स्लॅबमध्ये असलेले व्यवसाय अशा वस्तू आणि सेवांसाठी कच्च्या मालावर भरलेल्या करांवर क्रेडिटचा दावा करू शकणार नाहीत. उदाहरणार्थ, पूर्णपणे वापरलेले टॉयलेटरीज किंवा खोल्यांसाठी सुविधा खरेदी करणारे हॉटेल, ज्यावर ५ टक्के दराने आयटीसीचा दावा केला जात नाही, त्या खरेदीवर आयटीसीचा लाभ घेऊ शकत नाही. अशा सेवांच्या पुरवठ्यात केवळ वापरल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर आकारल्या जाणाऱ्या इनपुट कराचा क्रेडिट सेवा प्रदात्याकडून घेतला जाणार नाही, असे सीबीआयसीचे म्हणने आहे. विमा कंपन्यांवर याचा होणारा परिणाम लक्षात घेऊन दोन्ही पातळ्यांवर संतुलन राखणे आवश्यक आहे. जीवन-आरोग्य विम्याला जीएसटीमधून दिलासा तर मिळाला पण कंपन्यांना आयटीसी नाही. त्यामुळे आरोग्य आणि जीवन विम्याचा प्रसार वाढवायचा असेल, तर पारदर्शक व स्थिर धोरणांची आवश्यकता नक्कीच आहे!

## मराठवाडा मुक्तीसंग्राम : लोकशक्ती, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा अमर प्रवास





॥ दिनविशेष ॥

- डॉ. राजेंद्र बगाटे
समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास मांडताना आपण केवळ परकीय सत्तेविरुद्ध झालेल्या राजकीय संघर्षाचा विचार करतो. पण हा इतिहास तेवढ्यापुरता मर्यादित नाही; तो समाजातील विविध स्तरांतील असमानता, शोषण, जातिभेद, धार्मिक दडपशाही आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध झालेल्या संघर्षाचाही आहे. भारतात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याचा सूर्य उगवला, पण या स्वातंत्र्याच्या किरणांचा लाभ सर्व भारतीयांना एकसमानपणे झाला नाही. ब्रिटिश साम्राज्याचे जोखड झुगारून देश स्वतंत्र झाला, तरी हैदराबाद संस्थान निजामाच्या ताब्यात होते. त्याच्या हुकूमशाही वृत्तीमुळे आणि रझाकारांच्या दहशतीमुळे मराठवाडा अजूनही गुलामगिरीतच होता. निजामशाहीच्या राजवटीतील अन्याय, रझाकारांची दहशत आणि सामाजिक-आर्थिक शोषण यांचा भोग मराठवाड्यातील सामान्य माणसाला करावा लागत होता. त्यामुळे मराठवाडा मुक्तीसंग्राम हा केवळ राजकीय स्वातंत्र्याचा नव्हे तर सामाजिक न्याय व लोकशक्तीचा लढा ठरला. म्हणूनच मराठवाड्याला खरी मुक्ती १७ सप्टेंबर १९४८ रोजी मिळाली. हा मुक्तीसंग्राम केवळ राजकीय विलिनीकरणाचा प्रश्न नव्हता, तर सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांसाठी झालेला व्यापक संघर्ष होता. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर हा संघर्ष हा जनतेच्या आत्मजागृतीचा, लोकशक्तीच्या एकात्मतेचा आणि परिवर्तनाच्या ध्यासाचा इतिहास आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्राम या संघर्षाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना आपण हे पाहतो की हा लढा वर्गसंघर्ष, जातीभेद, धार्मिक भेद आणि लिंगदडपशाही यांच्या विरोधातील एक व्यापक सामाजिक चळवळ होती. या चळवळीच्या तात्विक प्रेरणेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान ठळकपणे दिसते. त्यांनी समाजाला दिलेले 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हे तत्त्वज्ञान मराठवाड्याच्या शेतकरी, मजूर, स्त्रिया आणि दलित घटकांसाठी दीपस्तंभ ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे वंचित समाजात आत्मसन्मानाची भावना जागृत झाली आणि त्यांनी मुक्तीसंग्रामात सक्रिय सहभाग घेतला. निजामशाहीत मराठवाड्याचे समाजजीवन असमानता, दडपशाही आणि शोषणाने पिडलेले होते. शेतकऱ्यांना जमीनदारशाहीच्या जोखडाखाली अवाजवी कर द्यावे लागत असत. वेठबीगारी करणे भाग होते. पिकावरच्या मालकीपेक्षा कराचा बोजा अधिक होता. शेतकरी हा उत्पादन करणारा असला तरी त्याला फक्त उपासमारी उरायची. दलित समाज अस्पृश्यतेच्या बेड्यात अडकला होता. त्यांना सामाजिक सन्मान वा अधिकार नव्हता. स्त्रियांना शिक्षण मिळत नव्हते; उलट अनेकदा त्यांना जबरदस्ती, अत्याचार आणि दडपशाही सहन करावी लागत होती. उर्दू भाषेचे वर्चस्व लादून मराठी भाषा व संस्कृतीला दुय्यम दर्जा देण्यात आला. धार्मिक भेदभाव वाढवून बहुसंख्य लोकांना दुय्यम दर्जा मिळत होता. ही सगळी परिस्थिती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'संरचनात्मक अन्याय' म्हणून पाहता येते, जिथे संपूर्ण समाजव्यवस्था ही सत्ताधारी वर्गाच्या हितासाठी कार्यरत असते. याच पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची संकल्पना पुढे ठेवली. त्यांनी सांगितले की स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेतून मुक्ती नव्हे, तर प्रत्येकाला समान संधी, सन्मान आणि हक्क मिळणे होय.

या सामाजिक शोषणाच्या रचनेला रझाकारांच्या दहशतीने अधिक भयानक रूप दिले. कासिम रिजवीच्या नेतृत्वाखाली रझाकार संघटना उभी राहिली. त्यांनी खेड्यापाड्यात हिंसाचार माजवला होता. घरांची लूट, शेतसंपत्तीचा नाश, स्त्रियांवर बलात्कार, जबरदस्ती धर्मांतर, खून आणि दरोडे हे त्यांचे दैनंदिन व्यवहार बनले. शेतकऱ्यांची जनावरे हिसकावली जात, पिके जप्त केली जात होती. गावोगावी रझाकारांची भीती पसरली होती. ही स्थिती समाजशास्त्रीय दृष्टीने सत्ताव्यवस्थेच्या 'दहशतवादी साधनांद्वारे नियंत्रण' या संकल्पनेचे उदाहरण ठरते. या दडपशाहीविरुद्ध मराठवाड्याने आवाज उठवला होता. हैदराबाद राज्य काँग्रेसने चळवळीची सूत्रे हातात घेतली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली. गोविंदभाई श्रॉफ, शंकरराव चव्हाण, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे, दिगंबरराव बिंदू यांसारख्या नेत्यांनी जनतेला संघटित केले. भूमिगत संघटना तयार करून रझाकारांविरुद्ध सशस्त्र संघर्ष छेडला गेला. परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद (धाराशिव), औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) या जिल्ह्यांत हजारो कार्यकर्त्यांनी सत्याग्रह, निदर्शने आणि प्रतिकार यांत भाग घेतला.

शेतकऱ्यांनी जमिनीच्या हक्कासाठी, विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि भाषेच्या मान्यतेसाठी, तर स्त्रियांनी समाजातील सन्मानासाठी या लढ्यात सहभाग घेतला. हा संघर्ष म्हणजे लोकशक्तीचा अभूतपूर्व जागर होता, जो समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'जनआंदोलनाच्या सामूहिक कृतीचा अभ्यास' दाखवतो. या जनआंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अप्रत्यक्षपणे सर्वत्र कार्यरत होते. त्यांनी दिलेली आत्मसन्मानाची शिकवण दलित समाजाला संघर्षासाठी उभारी देणारी ठरली. मानवाला मानव म्हणून समान हक्क मिळाले पाहिजेत ही त्यांची भूमिका मराठवाड्यातील जनतेच्या रक्तात मिसळली होती. सामाजिक न्यायासाठीचा हा लढा लोकशक्तीच्या ऐक्याने पुढे सरकत राहिला. हिंदू-मुस्लिम ऐक्य, दलित-बहुजन एकजूट, स्त्रियांचा सहभाग या सर्वांनी मुक्ती संग्रामाला सामाजिक क्रांतीचे रूप दिले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम चळवळीची खासियत म्हणजे तिचे सर्वसमावेशक स्वरूप होय. जाती, धर्म, पंथ, भाषा या भेदांना झुगारून लोक एकत्र आले होते. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे उदात्त उदाहरण येथे दिसले. दलित, शेतकरी, स्त्रिया, कामगार, विद्यार्थी असे सर्व घटक या संघर्षात सहभागी झाले होते. यामधील 'सामाजिक ऐक्य' हा समाजशास्त्रातील महत्त्वाचा घटक या लढ्यात प्रकर्षाने दिसतो. संघर्षातील बलिदानांनी आणि त्यागांनी ही ऐक्याची भावना अधिक दृढ केली होती. भारतीय सरकारने निजामाच्या हटवादी भूमिकेविरुद्ध लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो'ची सुरुवात झाली. भारतीय सैन्याने अवघ्या पाच दिवसांत निजामशाही संपवली आणि १७ सप्टेंबर रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. या घटनेने मराठवाड्याच्या जनतेला खरे स्वातंत्र्य दिले गेले. हे स्वातंत्र्य केवळ राजकीय नव्हते, तर ते सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही यांचे नवे दार उघडणारे ठरले. मराठवाडा मुक्तीनंतर मराठवाड्याचे समाजजीवन झपाट्याने बदलले. मराठी भाषेला शैक्षणिक व प्रशासकीय मान्यता मिळाली. शाळा व महाविद्यालये उभारली गेली. शेतकऱ्यांना जमिनीचा हक्क देणाऱ्या सुधारणा राबविल्या गेल्या. स्त्रियांना शिक्षणाचे दार खुले झाले, त्यांनी राजकीय आणि सामाजिक जीवनात सक्रिय सहभाग नोंदवला.

दलित समाजाने संविधानिक हक्कांचा उपयोग करून सामाजिक सन्मान मिळवला. ही सर्व प्रगती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'सामाजिक गतिशीलता' ठरते, ज्यामुळे वंचित समाज घटकांना नव्या संधी प्राप्त झाल्या. तथापि, या मराठवाडा मुक्तीनंतरही मराठवाड्याला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकऱ्यांची आत्महत्या, स्थलांतर, शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी आणि औद्योगिक विकासाचा अभाव ही गंभीर सामाजिक-आर्थिक समस्यांची जखम अजूनही कायम आहे. याचा अर्थ असा की राजकीय मुक्ती मिळाल्यानंतरही सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी संघर्ष सुरू आहे. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास, 'परिवर्तन हा सतत चालणारा प्रवास आहे.' मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाची आजची उपयुक्तता केवळ ऐतिहासिक स्मरणापुरती मर्यादित नाही. तो आपल्याला सामाजिक एकात्मता, लोकशाही मूल्ये, स्त्रिया आणि वंचित घटकांचा सहभाग, अन्यायाविरुद्धचा संघर्ष या मूल्यांची आठवण करून देतो. या दिवसातून आपण शिकतो की लोकशक्तीच्या बळावर कुठलाही अन्याय संपवता येतो. हा संघर्ष नवे समाजनिर्मितीचे मार्गदर्शन करतो.

शेवटी, मराठवाडा मुक्तीसंग्राम हा भारतीय इतिहासातील एक अद्वितीय अध्याय आहे. तो केवळ निजामशाही संपविण्याचा राजकीय संघर्ष नव्हता, तर सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाहीसाठी झालेला व्यापक जनआंदोलन होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा संघर्ष लोकशक्तीच्या सामर्थ्याचा, सामाजिक ऐक्याचा आणि परिवर्तनाच्या ध्यासाचा पुरावा आहे. १७ सप्टेंबर हा दिवस आपल्याला लोकशक्तीचे सामर्थ्य, एकात्मतेचे मूल्य आणि सामाजिक न्यायाची गरज सतत स्मरण करून देतो. म्हणूनच मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन हा केवळ ऐतिहासिक विजयाचा उत्सव नसून, सामाजिक परिवर्तनाचा दीपस्तंभ आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## संबंध नव्या वळणावर; परंतु सावध !

विश्लेषण

- प्रा.अशोक ढगे

(क्रमशः)



त्याला गलवान खोऱ्यासह अन्य ठिकाणी चीनने केलेली आगळीक कारणीभूत आहे. असे असले, तरी दोन्ही देशांमधील व्यापार थांबला नव्हता. वाढतच होता. मध्यंतरी काही गोष्टींवर निर्बंध आणून कोंडी करण्याचे प्रयत्न झाले. त्यामुळे होणारे नुकसान आणि परस्पर अवलंबित्व लक्षात आल्याने वाटाघाटी सुरू झाल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्क वाढवल्यानंतर या प्रयत्नांना गती आली.

मोदी आणि जिनपिंग यांनी द्विपक्षीय चर्चेदरम्यान संबंध मजबूत करण्यावर भर दिला. तथापि, दोन्ही राष्ट्रप्रमुख भेटले, तेव्हा हस्तांदोलन करून एकमेकांचे
स्वागत केले. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी शी जिनपिंग यांची गळाभेट घेतली नाही. अशा परिस्थितीत, त्यांच्या संबंधांमधला उबदारपणा संपला आहे का, असे प्रश्न उपस्थित झाले. हे प्रश्न उपस्थित होण्याला अनेक कारणे आहेत. अलिकडच्या काळात चीन आणि भारत यांच्यातील संबंध सुधारत असले, तरी भारत-पाकिस्तान संघर्षात ड्रॅगनने शेजारी देशाला पाठिंबा दिला होता, हे विसरता कामा नये. मोदी यांना चीनची शैली समजली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये चीनशी संबंध सामान्य झाले आहेत, हे मोदी विसरले नसतील. २०२० मध्ये पूर्व लडाख सीमेवरील तणावानंतर दोन्ही राष्ट्रांमधील संघर्ष वाढला. विमानांची थेट वाहतूक थांबवण्यासह अनेक कठोर निर्णय घेण्यात आले. तथापि, आता परिस्थिती बदलताना दिसते आहे. विशेषतः २०२४ च्या ब्रिक्स शिखर परिषदेत मोदी आणि जिनपिंग यांच्यात सकारात्मक बैठक झाली. या संबंधांमध्ये पुन्हा सुधारणा होण्याची आशा निर्माण झाली. त्यामुळेच सात वर्षांनी पंतप्रधान मोदी चीनला गेले. चीनलाही मोदी यांच्या या भेटीचे महत्त्व समजले आहे. मोदी आणि जिनपिंग यांच्यातील चर्चाही महत्त्वाची होती. ट्रम्प यांच्या टॅरिफ हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ती झाली. त्याचा परिणाम जगभरातील जवळजवळ सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांवर झाला आहे.

जिनपिंग यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीबद्दल मोदी यांनी सांगितले की, गेल्या वर्षी कझानमध्ये आमची खूप अर्थपूर्ण चर्चा झाली. आमच्या संबंधांना सकारात्मक दिशा मिळाली. सीमेवरील सैन्य मागे घेतल्यानंतर शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सीमा व्यवस्थापनाबाबत आमच्या विशेष प्रतिनिधींमध्ये एक करार झाला आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे. दोन्ही देशांमधील थेट उड्डाणेदेखील पुन्हा सुरू होत आहेत. दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांचे हित आमच्या सहकार्याशी जोडलेले आहे. यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्गही मोकळा होईल. परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारे संबंध पुढे नेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. या प्रसंगी बोलताना चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे, तर भागीदार म्हणून पाहण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि परस्पर आदर आणि सहकार्याद्वारे विश्वास निर्माण करण्याच्या गरजेवर सहमती दर्शवली. जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला. हा करार नेहरू यांच्या काळात झाला होता. नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणावर, त्यातही चीनबाबतच्या धोरणावर मोदी सातत्याने टीका करत
आहेत. त्यांच्यासमोरच जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला हा काव्यगत न्याय झाला. पंचशील करार हा शांततापूर्ण मार्गाने जगण्यासाठी पाच प्रमुख कल्पनांचा संच आहे. ही तत्त्वे मूलतः १९५४ मध्ये दोन्ही देशांमधील कराराचा भाग होती आणि परस्पर आदर आणि एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्यावर केंद्रित आहेत. श्री. जिनपिंग पंचशील कराराचा उल्लेख भारत-चीन संबंधांसाठी मार्गदर्शक चौकट म्हणून करत असताना मोदी यांनी दोन्ही देशांमधील स्थिरता आणि दीर्घकालीन सहकार्याचा उल्लेख केला. त्यांनी परस्पर आदर, परस्परहित आणि परस्पर संवेदनशीलतेचे महत्त्व सांगितले. मोदी यांचा चीन दौरा दोन दिवसांच्या शांघाय सहकार्य परिषदे निमित्ताने होता. या परिषदेत रशिया, मध्य आशिया, दक्षिण आशिया, आग्नेय आशिया आणि मध्य पूर्वेतील नेते एकत्र आले होते. या शिखर परिषदेकडे जागतिक दक्षिणेतील एकतेचे प्रदर्शन म्हणून पाहिले जात आहे. त्यात सदस्य राष्ट्रे प्रादेशिक सुरक्षा, आर्थिक सहकार्य आणि बहुपक्षीय संवादावर लक्ष केंद्रित करत आहेत. जिनपिंग यांच्या मनोगतामुळे दशकांपूर्वीच्या चौकटीकडे लक्ष वेधले गेले आहे. या चौकटीने एके काळी नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमधील शांततापूर्ण संबंधांचे स्वप्न पाहिले होते. पंचशील, किंवा शांततापूर्ण सहअस्तित्वाची पाच तत्वे ही परस्परआदर आणि विनाहस्तक्षेपावर आधारित आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी एक चौकट आहे. २९ एप्रिल १९५४ रोजी चीन आणि भारताच्या तिबेट प्रदेशात स्वाक्षरी केलेल्या व्यापार आणि वाणिज्य करारात ते प्रथम औपचारिकपणे सादर करण्यात आले. एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर, दोन्ही बाजूंनी आक्रमकता न दाखवणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानता आणि परस्पर लाभ, शांततापूर्ण सहअस्तित्व यांचा त्यात उल्लेख होता.

जून १९५४ मध्ये पंडित नेहरू आणि चीनचे
पंतप्रधान झोउ एनलाई यांनी पंचशीलची व्याप्ती वाढवणारे संयुक्त निवेदन जारी केले. त्यानंतर ते केवळ भारत-चीन संबंधांचा आधार म्हणूनच नव्हे, तर जागतिक शांतता आणि राजनयिकतेचे एक मॉडेल म्हणूनदेखील प्रस्तावित करण्यात आले. या कराराचा उल्लेख जिनपिंग यांनी केला. दोन्ही नेत्यांमध्ये दहशतवाद, सीमा तणावात शांतता प्रस्थापित करणे आणि व्यापार यासह अनेक जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली. दहशतवादाच्या मुद्दयावर मोदी यांनी चीनकडून पाठिंबा मागितला. त्यावर चीनने त्यांना पाठिंबा देण्याचे मान्य केले. यानंतर मोदी म्हणाले, की सीमेवर शांतता आणि सौहार्द राखणे हे संबंधांच्या एकूण विकासासाठी विम्यासारखे आहे. सीमेवरील परिस्थिती कोणत्या ना कोणत्या प्रकारे एकूण संबंधांवर परिणाम करेल. मोदी आणि शी यांनी भारत आणि चीनमधील मतभेद वादात बदलू देऊ नयेत, अशी भावना व्यक्त केली. जिनपिंग यांनी द्विपक्षीय संबंध आणखी सुधारण्यासाठी चार सूचना केल्या. भारत-चीन संबंध दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांना लाभदायक ठरू शकतात यावर एकमत झाले. मोदी आणि जिनपिंग यांनी अनेक जागतिक समस्या आणि चालू आव्हानांवरही चर्चा केली. दोन्ही देशांमध्ये सामंजस्य कसे विकसित करावे आणि या बदलत्या आव्हानांमध्ये परस्पर संबंध कसे पुढे नेऊ नयेत यावरही दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला. त्याची जाणीव असल्यानेच मोदी यांनी गळाभेट टाळली.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## स्वतंत्र भारतामध्ये विनाअट सामील होऊन मराठवाड्यातील जनतेने चूक केली काय ?



- बोरसे गुरुजी
करजगांव
मो.नं. ९४०३५००४७७



दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी आपण मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करत आहोत. मागे वळून पाहतांना असे निदर्शनात येते की, मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्याच्या फक्त वल्गना करण्यात आल्या आणि मराठवाड्याच्या जनतेच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. खरंच आमच्या मराठवाड्यातील जनता पूर्वीपासून अतिशय सहनसिल, त्यागी, निस्वार्थि देशभक्त आहे. त्यांनी कोणतीही अट न घालता ज्यावेळेस भारत स्वतंत्र झाला त्यावेळेस विनाअट मराठवाडा स्वतंत्र भारतामध्ये सामील झाला. देशाला स्वातंत्र्य मिळाले मराठवाड्यातील जाणत्या देशभक्त जनतेला आनंद झाला. आनंदाचे गीत मराठवाड्यामध्ये गायले गेले. खरे म्हणजे त्या वेळचे जे आमचे स्वातंत्र्य सेनानी होते जे आमचे मराठवाड्याचे नेते होते ते अटी घालू शकले असते आणि मराठवाड्याचा विकासाचा अजेंडा पुढे ठेवू शकले असते. काही विकासात्मक दर वर्षाचे आर्थिक अंदाजपत्रक ठरवुन घेता आले असते. देशाभिमान राष्ट्रनिष्ठा यामुळे त्यावेळच्या लोकनेत्यांनी कोणत्या कोणत्याही अटी न घालता प्रथम प्राधान्य गुलामीतुन मुक्त होण्याला दिले.

स्वतंत्र भारतामध्ये सामील होण्याचे ठरवले. मराठवाडा स्वतंत्र भारतामध्ये सामील झाला. परंतु मराठवाड्याच्या वाट्याला सतत उपेक्षाच आलेली आहे. आज कोणत्याही क्षेत्राचा विचार करा, शैक्षणिक क्षेत्रामध्ये कृषी क्षेत्रामध्ये, औद्योगिक क्षेत्रामध्ये, भुमीपुत्रांना नोकरी आणि प्रशासनातला सहभाग, विकासाबाबत सर्वच क्षेत्रांमध्ये मराठवाडा इतर भागांपेक्षा कोसो दूर आहे. आता मराठवाड्यामध्ये जो आरक्षणाचा लढा लढला जात आहे त्याला मराठवाड्याची उपेक्षा हेच कारण आहे. तो अन्याय कोणत्याही एका जातीवर नाही तर सर्वच जनतेवर झालेला आहे. अगोदर रजाकारांनी लुटले त्यातून जनता सावरते न सावरते तो भारतामध्ये लोकशाहीतल्या निवडुण आलेल्या रझाकारांनी स्वार्थापोटी विकासाकडे पाठ फिरवली. लोकशाहीमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सुद्धा मराठवाड्याची उपेक्षाच केली. स्वतःच्या स्वार्थासाठी जनतेला वापरून घेतले. जनतेचा एकही प्रश्न न सोडवता फक्त स्वतःचा स्वतःच्या कुटुंबाचा आणि सोयऱ्या धायऱ्यांचाच प्रश्न सोडवण्यामध्ये गुंतले. आश्वासनांचे राजकारण करुन आपली पोळी भाजुन घेतली. स्वतः अब्जोपती झाले जनतेला कंगाल केले. आम्ही भाऊ, दादा, आण्णा, नाना, तात्या म्हणुन त्यांना डोक्यावर घेतले. काही मोजके नेते सोडता मराठवाड्यातील लाचार नेत्यांच्यामुळे महाराष्ट्राकडून सतत मराठवाड्याची उपेक्षा झालेली आहे. त्यामध्ये पूर्वीपासून शिक्षणाच्या समस्या सोडवल्या गेल्या नाहीत.

आता आता शिक्षणासाठी काही तरतूदी झाल्या त्या सुद्धा पुरेशा नाहीत. मराठवाड्यातील नोकरशाहीचा विचार केला तर स्थानिक भूमिपुत्र आजही मराठवाड्याच्या प्रशासनामध्ये तुलनेने अतिशय कमी आहेत. त्यामानाने इतर भागातून पश्चिम महाराष्ट्र तसेच विदर्भातून मोठ्या प्रमाणात नोकरवर्ग मराठवाड्यामध्ये नौकरी करत आहे. शिक्षण नाही ! असले तरी नौकरी नाही नोकरी नाही त्यामुळे लग्नाचा प्रश्न. असे एक ना अनेक प्रश्न मराठवाड्यामध्ये सध्या चर्चेत असतानाही राजकर्ते या गोष्टीकडे लक्ष देत नाहीत. मरणाचे कष्ट मेहनत करूनही आमच्या वाट्याला सतत दुःख दारिद्र्य येत आहे. कृषी क्षेत्राचा विचार केल्यास न परवडणारी शेती शेतकरी करत असून सर्वाधिक आत्महत्या मराठवाड्यामध्ये झालेल्या आहेत. आजही मराठवाडा भ्रष्टाचाराने होरपळत आहे. पुढारी आणि अधिकारी यांची अनिष्ट युती जनतेला त्रासदायक आहे. स्थानिक नेते मात्र स्वतःचा स्वार्थ आणि स्वतः कुटुंबाचा स्वार्थ पाहण्यात आणि पैसे कमाव धन्यता मानत आहे. आता त्यांच्या रझाकारीला जनता कंटाळली असुन पक्षपाती कारस्थानांना तोंड देत आहे.

जनतेला वाऱ्यावर सोडून त्यांनी इतर नेत्यांची लाचारी पत्करलेली आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये फक्त नावाला औद्योगिक शब्द उच्चारला गेला परंतु पाहिजे त्या प्रमाणामध्ये कारखानदारी मराठवाड्यात उभी राहू शकली नाही. त्या ठिकाणी सुद्धा आमच्या नेत्यांनी लक्ष दिलेले नाहीइतरांच्या पोळ्या भाजु लागले परंतु स्थानिक उद्योजक मोठ्या प्रमाणावर उभे राहु शकले नाहीत. त्यामुळे असे वाटते की,स्वतंत्र भारतामध्ये विनाअट सामील होऊन मराठवाड्यातील जनतेने चुक केली काय ?

आता यापुढे दूरदृष्टी ठेवून नवोदित नेत्यांनी सर्व गोष्टीचा अभ्यास करून मराठवाड्याच्या झालेल्या उपेक्षेचे कारणे शोधून आता तरी स्थानिक नेत्यांनी राज्यकर्त्यांनी मराठवाड्याकडे आणि मराठवाड्यातील जनतेकडे लक्ष देऊन विकासाचा अनुशेष भरून काढणाऱ्या योजना राबवाव्यात अन्यथा काळ माफ करणार नाही. जय हिंद !

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक;-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८
ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com**. कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)
दैनिक महाभूमि
This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** **RNI No.MAHMAR/2023/89148**

दैनिक महाभूमि

छत्रपती **संभाजीनगर भूमि**

dainikmahabhoomi@gmail.com

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिन



## न्यूज ब्रीफ

### तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा उत्साहात

**सोयगाव :** जिल्हा क्रीडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा तालुका क्रीडा संकुल येथे ११ व १२ सप्टेंबर रोजी पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटनप्रसंगी डॉ. सैरास तडवी, डॉ. सुशील जावळे, डॉ. निलेश गावडे, राहुल चौधरी, दीपक बनकर, प्रा. शेख तोफिक, तोफिक पठाण, नावेद शेख, सोहेल शिकलकर, प्रा. संदीप निकम, प्रा. मोरे, प्रा. साबळे, दादु श्रीखंडे, भूषण पवार, पियुष काटोले आदींची उपस्थिती होती. स्पर्धेत तालुक्यातील २७० विद्यार्थी-विद्यार्थिनीं सहभागी झाल्या होत्या.

### रेल्वेसमोर उडी घेऊन एकाची आत्महत्या

**छत्रपती संभाजीनगर :** ज्वेलर्सच्या दुकानात काम करणाऱ्या एका कारागिराने धावत्या रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवार, १४ सप्टेंबर रोजी तिसगाव परिसरातील रेल्वे रुळावर उघडकीस आली. दत्तात्रय साहेबराव पावटे (६२ वर्ष), रा. हनुमाननगर, गारखेडा परिसर असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. दत्तात्रय पावटे हे ज्वेलर्सच्या दुकानात काम करत होते. शनिवार, १३ सप्टेंबर रोजी कामावरून ते घरी परतले नाहीत, म्हणून त्यांच्या मुलाने त्यांचा शोध घेतला. मात्र, ते कुठेही मिळून आले नाहीत. या प्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### विनोद रापतवार यांचे आज व्याख्यान

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त बुधवार, १७ सप्टेंबर रोजी नागपूरचे जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांचे 'स्मरण हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या महात्मा फुले सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी कुलगुरु डॉ. विजय फुलारी, प्रकुलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

### निधन वार्ता

### सुहासिंनी बलखंडे



**छत्रपती संभाजीनगर :** सुहासिनी लक्ष्मण बलखंडे (६८ वर्ष), रा. श्रध्दा कॉलनी, यांचे अल्पशा आजाराने मंगळवार, १६ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पडेगाव येथील ख्रिश्चन स्मशानभूमीत दफनविधी करण्यात आला.

## हजारो हेक्टर शेती पाण्याखाली; वातावरणात गारठा

# जिल्ह्यात सर्वदूर जोरदार पाऊस; नदी-नाल्यांना पूर

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**





गेल्या दोन दिवसापासून शहरासह जिल्ह्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. जोरदार पावसामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. जोरदार पावसामुळे जिल्ह्याच्या विविध भागातून वाहणाऱ्या नदी-नाल्यांना पूर आला आहे. दरम्यान, सतत पडणाऱ्या पावसामुळे वातावरणात कमालीचा गारठा पसरला असून सकाळी आणि सायंकाळच्या वेळी नागरिकांना उबदार कपडे परिधान करावे लागत आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह मराठवाड्याला हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. गेल्या तीन ते चार दिवसापासून जिल्ह्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे. कन्नड, वैजापूर, गंगापूर, सिल्लोड, खुलताबाद, पैठण आदी तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून सूर्यदर्शन झालेले नाही.

कन्नड तालुक्यातील पिशोर, नाचनवेल, चिंचोली-लिंबाजी, वैजापूर तालुक्यातील शिवना, सिल्लोड तालुक्यातील सिसारखेडा, सोयगाव तालुक्यातील जरंडी, माळेगाव, पिंपरी, निंबायती, बहुलखेडा, कवली, घोसला या भागात मध्यम स्वरूपाचा अवकाळी पाऊस झाला असून बनोटी, तिडका, वाकडी, घोरकुंड, वरठाण, हनुमंत खेडा, उप्पलखेडा, किन्ही, वडगाव, पळाशी, वाडी, नायगाव आदी परिसरात पावसाचे पाणी शेतात साचले असल्याने हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे.

दरम्यान, गेल्या दोन दिवसापासून सुरु असलेल्या पावसामुळे शहराच्या विविध भागातून वाहणाऱ्या नदी - नाल्यांना पूर आला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील लेणी, वेरुळ लेणी, अजिंठा लेणी परिसरातील डोंगरातून धबधबे वाहण्यास सुरुवात झाली आहे. तसेच शहराच्या विविध सखल भागात पावसाचे पाणी साचले असून त्यातून मार्ग काढतांना नागरिकांना कसरत करावी लागत आहे.

### जायकवाडीतून पाण्याचा विसर्ग

■ जिल्ह्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावल्याने तसेच जायकवाडी धरणात नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्यामुळे जायकवाडी धरण ९८ टक्याच्यावर भरले आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे उघडून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरु असल्याने नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

## जि.प. निवडणूक : एका केंद्रावर मतदार संख्या ८०० वरून ११००

### मतदान केंद्रांची संख्या २ हजार ३९६ वरून होणार कमी

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्र निश्चितीचे निकष बदलले आहेत. यामुळे जिल्ह्यातील मतदान केंद्रांची संख्या कमी होणार आहे. आता एका मतदान केंद्रावर सरासरी १,१०० मतदार असतील, याआधी एका केंद्रावर ८०० ते ९०० मतदार होते अशी माहिती जिल्हा परिषदेच्या सूत्रांनी दिली.

२०१७ मध्ये जिल्ह्यात १,९६० मतदान केंद्रे होती. त्यानंतर मतदारसंख्या वाढल्याने ही संख्या - २,३९६ वर गेली. आता नव्या निकषांनुसार ही संख्या पुन्हा २ हजारांच्या आसपास येणार आहे. आगामी निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण १८ लाख ७० हजार ५८७ मतदार असतील. राज्य निवडणूक आयोगाने जुलैमध्ये मराठवाड्यातील निवडणुकांची तयारी पाहिली होती. त्यावेळी जिल्हा प्रशासनाने मतदार आणि प्रस्तावित मतदान केंद्रांची माहिती दिली होती. १ जुलै २०२५ च्या मतदार यादीवर आधारित ही माहिती होती. त्यानुसार २,३९४ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली होती. राज्यात ईव्हीएम मशीनचा तुटवडा आहे. त्यामुळे शेजारच्या राज्यांकडून काही मशीन उसनवारीवर घेतल्या जाणार आहेत. काही नव्याने खरेदी केल्या जातील. तरीही सर्व जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका एकाच टप्प्यात होणार असल्याने ईव्हीएम कमी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदान केंद्रांची संख्या कमी करून ईव्हीएम आणि मनुष्यबळाची गरजही कमी केली जात आहे.

कन्नड तालुक्यात सर्वाधिक ७९ मतदान केंद्रांची भर पडली होती. गंगापूरमध्ये ७७, वैजापूरमध्ये ६९, फुलंब्रीत ५०, पैठणमध्ये ४१, सोयगावमध्ये ३५, छत्रपती संभाजीनगरमध्ये ३०, खुलताबादमध्ये २८. आणि सिल्लोडमध्ये २७ केंद्रांची वाढ झाली होती. आता निकष बदलल्यामुळे ही संख्या कमी होणार आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह अनेक मंत्री आज शहरात

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्री बुधवार, १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यामध्ये रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आदींचा त्यामध्ये समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी सकाळी नऊ वाजता सिध्दार्थ उद्यानात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण करुन शहिदांना अभिवादन करण्यात येणार आहे. तर रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## भाजप शहरात घेणार ठिकठिकाणी मेळावे : डॉ. भागवत कराड

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

केंद्र सरकारने जीएसटी दरात कपात केली. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होऊन महागाईत दिलासा मिळणार आहे. याबाबत नागरिकांना माहिती देण्यासाठी शहर भाजपच्यावतीने शहरातील मंडळांमध्ये - मेळावे घेतले जातील; तसेच व्यापाऱ्यांकडून मुंबई येथे धन्यवाद सभा होणार आहे. त्या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती खासदार डॉ. भागवत कराड यांनी रविवार, १४ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. कराड म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या अर्थव्यवस्थेला वेग मिळाला असून जीडीपी ७.५ टक्क्यांवर पोचला आहे. त्यामुळे भारताने जगात तिसरे स्थान मिळवले आहे. नुकत्याच झालेल्या जीएसटी परिषदेच्या ५६व्या बैठकीत नवीन दोन-स्लॅब रचना मंजूर झाली आहे. हा बदल नवरात्रोत्सवाच्या मुहूर्तावर, २२ सप्टेंबरपासून लागू होईल. यातून ४८ हजार कोटी रुपयांचा फायदा जनतेला होईल. जीएसटी दरकपातीनंतर सुमारे ४८ हजार कोटींची बचत आणि १.९८ लाख कोटींची अतिरिक्त वाढ अपेक्षित आहे. जनतेसाठी मोदी सरकारने ऐन सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मोठी स्वस्ताईची भेट दिली. त्याची माहिती या मेळाव्यात दिली जाणार आहे'', असेही त्यांनी सांगितले.

### कुख्यात टिप्याची हर्सुल कारागृहात रवानगी

**छत्रपती संभाजीनगर :** जामिनावर सुटताच व्यापाऱ्याला धमकावून खंडणी घेणाऱ्या गावगुंड टिप्या ऊर्फ जावेद मसूद शेख याची सोमवार, १५ सप्टेंबर रोजी न्यायालयाने हर्सुल कारागृहात रवानगी केली. पोलिसांनी त्याच्यावर कठोर कारवाईची तयारी करत आणखी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले.

२ ऑगस्ट रोजी मध्यरात्री व्यावसायिक शेख अझर शेख यांना टिप्याने टवाळखोरांसोबत मिळून तलवारीचा धाक दाखवत अडीच लाख रुपये लुटले होते. शिवाय खंडणी मागितली. त्याच्या १५ दिवसांपूर्वीच तो जामिनावर बाहेर आला होता. तो २६ ऑगस्ट रोजी थेट न्यायालयात हजर झाला. त्यानंतर पुंडलिकनगरचे पोलिस निरीक्षक अशोक भंडारे यांनी ९ सप्टेंबर रोजी त्याला हर्सुल कारागृहातून ताब्यात घेत अटक केली.

### स्मशानभूमीकडे जाणारा पूल खचला



**छत्रपती संभाजीनगर :** भावसिंगपूरा परिसरातील भिमनगरात असलेल्या स्मशानभूमीकडे जाणारा पूल सोमवार, १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसामुळे खचला आहे. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते ॲड. बाबा तायडे यांनी पूल खचल्याची माहिती मनपा अधिकारी संजय चामले, कुलकर्णी यांना दिली.

## जनसुरक्षा कायद्यासाठी क्रांती चौकात समर्थन सभा

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

नक्षलवादी-माओवादी चळवळीं विरोधात व जनसुरक्षा विधेयकाच्या समर्थनात सोमवार, १५ सप्टेंबर रोजी क्रांती चौक येथे विविध देशप्रेमी संघटनांची समर्थन सभा पार पडली. महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकाला काही राजकीय पक्ष विरोध करत आहेत. त्यामुळे सामाजिक सुरक्षेसाठी जनहिताच्या संवैधानिक विधेयकाचे समर्थन सभेत केले.

यावेळी विविध घोषणा देण्यात आल्या. माजी केंद्रीयमंत्री खा. डॉ. भागवत कराड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा कायदा संमत केल्याचे सांगून त्याची गरज विशद केली. आ. संजय केणेकर म्हणाले, हा कायदा समाजासाठी उपयोगी आहे. भाजपचे शहराध्यक्ष किशोर शितोळे यांनी जनसुरक्षा कायद्यासंदर्भात माहिती दिली.

### मनपातर्फे आजपासून आरोग्य तपासणी

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सूचनेनुसार, बुधवार, १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत शहरात स्वास्थ नारी, सशक्त परिवार या उपक्रमांतर्गत शहरात महिला, बालकांची तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांनी दिली. महापालिकेचे आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये महिलांची तपासणी, रक्त शिबिर आदी उपक्रम राबविले जातील.

## ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

**वैजापूर / प्रतिनिधी**



भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रॅक्टरने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. हा अपघात सोमवार, १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास स्टेशन रोडवरील बाजरा फार्मजवळ घडला. जनार्धन उद्धव इंगळे (२३ वर्ष), रा.लोणी बु., ता. वैजापूर असे घटनेतील मृत तरुणाचे नाव आहे.

जनार्धन इंगळे हा तरुण सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास तो शहरातील स्टेशन रोडलगत असलेल्या बाजरा फार्म समोरून दुचाकीवर जात होता. त्यावेळी भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रॅक्टरने त्याच्या दुचाकीस धडक दिली.

यावेळी ट्रॅक्टरचे चाक अंगावरुन गेल्याने जनार्धन इंगळे गंभीर जखमी झाला होता. जनार्धन इंगळे याला उपचारासाठी वैजापूरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे .पुढील तपास पोलिस अंमलदार किसन गवळी हे करित आहेत.

### ९८ प्रवासी बॅग मागवून २ लाख ४२ हजारांना गंडवले

**छत्रपती संभाजीनगर :** लासलगावच्या दुकानदाराने सातारा भागातील दुकानदाराकडून फोन करून दोन टप्प्यात ९८ बॅग मागवून घेतल्या. माल उतरून घेतल्यानंतर २ लाख ४२ हजार ८४५ रुपयांचे बिल न देता फोन बंद करून फसवणूक केली. हा प्रकार २० ते ३० मे यादरम्यान घडला. या प्रकरणी मंगळवार, १० सप्टेंबर रोजी गुन्हा नोंदवण्यात आला.

फिर्यादी अतुल प्रकाशराव पूर्णपात्रे (३६ वर्ष), रा. अलोकनगर, सातारा परिसर यांनी यासंदर्भात तक्रार दिली. ते रेवा इंटरप्राइजेस येथे काम करतात. २० मे रोजी त्यांना आरोपीने फोन करून लासलगाव येथे त्याचे बॅग वर्ल्ड नावाचे दुकान असल्याचे सांगितले व ४३ बॅगची ऑर्डर दिली. २ दिवसांनंतर ट्रान्सपोर्टने अतुल पूर्णपात्रे यांनी पाठवून दिलेला माल आरोपीने उतरवून घेतला. त्यानंतर पुन्हा ३० मे रोजी ५५ बॅगची फोनवरच ऑर्डर दिली. त्या बॅग नाशिक येथे पाठवायला सांगितल्या. त्यानुसार अतुल पूर्णपात्रे यांनी अमेरिकन टुरिस्ट कंपनीचे व्यवस्थापक स्वप्निल सोनवणे यांच्याशी संपर्क करण्यास सांगितले. सोनवणे व आरोपींची भेट देखील झाली. माल आरोपीने उतरून घेतला. त्यानंतर मात्र त्याने मोबाइल बंद करून ठेवला. पूर्णपात्रे यांच्या बॅगचे २ लाख ४२ हजार दिले नाही.

### पाच महिन्यात २८ लाखांचा मुद्देमाल जप्त

# ऑपरेशन प्रहार : अवैध मद्यविक्री प्रकरणी ४७५ गुन्हे दाखल

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने एप्रिल महिन्यापासून ऑपरेशन प्रहार राबविले आहे. त्याअंतर्गत एप्रिल ते ऑगस्ट या दरम्यान जिल्ह्यात अवैध मद्यविक्री व बेकायदा ढाबा चालकांविरुद्ध केलेल्या कारवाईत ४७५ गुन्हे दाखल केले. ८४४ आरोपींना अटक केली. २८ लाख ८ हजार ३८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सूत्रांनी दिली.





अवैध मद्यविक्री आणि बेकायदा ढाब्यांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाने एप्रिल पासून ऑपरेशन प्रहार अभियान राबवण्यास सुरुवात केली आहे.

एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांच्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अवैध मद्यविक्री व बेकायदा ढाबा चालविणाऱ्याविरुध्द ४७५ गुन्हे दाखल केले. तर ८४४ जणांना अटक केली. या कारवाईदरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी २८ लाख ८ हजार ३८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता.

दरम्यान, जिल्हा विधी सेवा केंद्रामार्फत शनिवार, १३ सप्टेंबर रोजी झालेल्या लोकअदालतीत महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ६८ आणि ८४ अंतर्गत २६ खटल्यांचा निकाल लागला त्यात १२२ जणांवर दोष सिद्ध झाला. त्यांच्याकडून ७ लाख ८१ हजार ९०० रुपये दंड वसूल करण्यात आला असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

### अवैध मद्य विक्री करणाऱ्यांची माहिती द्या

■ शहरासह जिल्ह्यात परवानाधारक हॉटेल, रेस्टारंट, परमीट रुम यांच्या व्यतिरिक्त अवैध मद्यविक्री, त्यास बेकायदा जागा पुरविणे, मद्यपान करणे अशा गैरप्रकारांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाईची मोहिम हाती घेतली आहे. अवैध मद्य विक्री करणाऱ्यांची माहिती दिल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल असेही राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

### हॉटेलमध्ये हाणामारी ; गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** जेवणात माशी पडलेली आढळल्याने दुसरे पार्सल मागितल्याच्या कारणावरून वाद होत तरुणावर हॉटेलमध्ये सात ते आठ जणानी हल्ला चढवून जखमी केले. ही घटना शुक्रवार, १२ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास देवळाईच्या सागर १. हॉटेलमध्ये घडली. सतीश कडुबा मगरे (३३ वर्ष), रा. माउलीनगर असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास सतीश मगरे हे देवळाईच्या सागर नं १ हॉटेलमध्ये जेवणाचे पार्सल घेऊन जाण्यासाठी गेले होते. पार्सल घेताना त्यांनी जेवण तपासले असता त्यात त्यांना माशी आढळली. त्यांनी ती बाब हॉटेलचालकाच्या निदर्शनास आणून देत दुसरे पार्सल मागितले. त्यातून वाद झाल्यावर अज्ञात सात ते आठ जणांनी ते सतीश मगरे यांच्यावर काठी, लोखंडी रॉडसह बेल्टने हल्ला चढवून मारहाण केली. यात सतीश मगरे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी सतीश मगरे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अजगर हत्येप्रकरणी दोन आरोपी गजाआड

**सोयगाव / प्रतिनिधी**

शेळी गिळंकृत केल्यानंतर अजगराची ठेचून हत्या करणाऱ्या दोन आरोपींना सोयगाव वनविभागाच्या पथकाने सोमवार, १५ सप्टेंबर रोजी बहुलखेडा येथून अटक केली. अफरोज नजीर पठाण (२३ वर्ष) व हमजेखा तडवी (२१ वर्ष) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांना सायंकाळी सोयगाव न्यायालयात हजर केले असता, गुरुवार, १८ सप्टेंबरपर्यंत वनकोठडी सुनावण्यात आली आहे.

८ सप्टेंबर शेळी गिळलेल्या अजगराचे तोंड ठेचून आरोपींनी त्याचे पोट फाडून शेळी बाहेर काढली होती.

याबाबतच व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच वन्यप्रेमींनी संताप व्यक्त केला होता. तसेच आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी सोयगावमध्ये मोर्चा काढला होता.

यानंतर वनविभागाने वनगुन्हा दाखल करून शोधमोहीम राबविली. सखोल चौकशी अंती रविवार, १४ सप्टेंबर रोजी दोन आरोपींची ओळख पटली. त्यानंतर बहुलखेडा येथे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल मिसाळ, सोयगावचे वनपाल प्रवीण कोळी, वनपाल एम.एम. अली, सुभाष नागरे, वनरक्षक शामित तडवी, शरद चेके, मंगेश सनांसे, कृष्णा धोत्रे, विलास सपकाळ, अनिल लोखंडे आदींनी सोमवारी छापा मारुन अफरोज नजीर पठाण व हमजेखा तडवी या दोघांना अटक केली. मात्र व्हायरल व्हिडिओत सात ते आठ आरोपी दिसत असून बाकीच्यांनाही अटक करावी, अशी मागणी पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील व वन्यजीव रक्षक समितीचे दिनेश गायकवाड यांनी केली आहे.

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.

डॉ.ए.एच.शेख

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9021111549 / 7020614645

www.drshaikhah.com

## न्यूज ब्रीफ

### अनधिकृत बांधकामांची वीज खंडित करा

**छत्रपती संभाजीनगर :** बेकायदा आणि अनधिकृत बांधकामाचा वीजपुरवठा खंडित करा, असे पत्र महापालिका प्रशासन महावितरण कंपनीला देणार आहे, अशी माहिती प्रशासक जी. श्रीकांत यांनी दिली. बीड बायपास रस्त्यावरील दोन्ही बाजूने झालेल्या बांधकामांपैकी काही बांधकामांनी महापालिकेची परवानगी घेतलेली नाही. अनधिकृत बांधकामे केवळ बीडबायपास रस्त्यावर नव्हे तर शहराच्या विविध भागांत झाली आहे. त्यावर अंकुश लावण्याचा प्रयत्न पालिकेचे प्रशासन करीत आहे. याबद्दल माहिती देताना जी. श्रीकांत म्हणाले, अशा प्रकारच्या बांधकामांना आता पुन्हा महापालिकेकडून नोटीस बजावण्यात येणार आहे.

### कुणबी जात प्रमाणपत्र कार्यशाळा उत्साहात

**सिल्लोड :** मराठा समाजातील नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही बाबत राजर्षी शाहू महाराज सामाजिक सभागृह येथे १५ सप्टेंबर रोजी कार्यशाळा पार पडली. यावेळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार सतीश सोनी, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व कृषी सहाय्यक यांची उपस्थिती होती.

### वीजपुरवठा खंडित; नागरिक त्रस्त

**पिंपळगाव रेणुकाई :** परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच गेल्या काही दिवसापासून पडत असलेल्या पावसामुळेदेखील अनेकदा वीजपुरवठा खंडित होत आहे. पिंपळगाव रेणुकाई येथे महावितरणचे ३३ केव्हीचे उपकेंद्र असून या केंद्रातून अनेक गावांना वीज पुरवठा केला जातो. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. महावितरण कंपनीने पिंपळगाव रेणुकाईसह परिसरातील गावांना सुरळीत विजेचा पुरवठा करावा अशी मागणी मनीष श्रीवास्तव, उपसरपंच लक्ष्मण आहेर आदींनी केली आहे.

### भुजबळांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा : छावा

**छत्रपती संभाजीनगर :** छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाच्या शपथेचा भंग करून मराठा समाजावर चुकीचे आरोप केले आहेत, असा आरोप करत छावा संघटनेने त्यांना मंत्रिमंडळातून तत्काळ बडतर्फ करण्याची मागणी केली. या मागणीसाठी संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले. मंत्री भुजबळ यांनी जातीयवादी भूमिका घेत आहेत. त्यामुळे अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही, असे संघटनेने म्हटले आहे. सरकारने भुजबळांचा – राजीनामा न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेचे अध्यक्ष अशोक वाघ, योगेश केवारे, डॉ.उध्दवराजे काळे यांनी दिला आहे.

### भाजपच्या वतीने जलपूजन

**सिल्लोड :** तालुक्यातील माणिकसागर खेळणा मध्यम प्रकल्प तुडुंब भरल्याने भाजपच्या वतीने सोमवार, १५ सप्टेंबर रोजी जलपुजन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, भाजपा अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, कैलास जंजाळ, चेअरमन अशोक साखळे, भाजपा भवन मंडळ तालुकाध्यक्ष एकनाथ हिवाळे, भाजपा शिवना मंडळ तालुकाध्यक्ष आत्माराम पाडाळे, दिपक कळात्रे, विनोद चव्हाण, हरीदास साखळे, तुषार पालोदकर, दादाराव गोरे, सचिन जंजाळ, भाऊसाहेब उबाळे, अशरद शेख, नामदेव बनकर, तात्याराव पालोदकर, गणेश बावस्कर आदींची उपस्थिती होती.

# १३ महिन्याच्या लढ्यानंतर मराठवाडा निजामशाही मुक्त

## मुक्ती संग्रामासाठी अनेकांनी दिली प्राणांची आहुती..

**अमित तांदळे**

**छत्रपती संभाजीनगर :** निजामाच्या राजवटीतुन मुक्त होण्यासाठी मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा लढा सतत १३ महिने लढला गेला. या काळात मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळावे यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिल्याची इतिहासात नोंद आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. परंतू त्यानंतरही मराठवाडा हैद्राबाद येथील निजाम संस्थानाच्या राजवटीखाली होते. देशात त्यावेळी अस्तित्वात असलेली संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली होती. मात्र हैद्राबाद, काश्मीर आणि जुनागढ ही तीन संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली नव्हती.

स्वातंत्र्यापूर्वीपासून मराठवाडा प्रदीर्घ काळ निजामाच्या हैद्राबाद राज्याचा भाग होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या बरोबरीनेच हा हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढला गेला. हैद्राबाद संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान बहादूर नियामुद्दौला निजाम-उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निझामाच्या राजवटीची पाठराखण करणाऱ्या रझाकार संघटनेने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी हिंसक मार्ग अवलंबला तेव्हा त्याला उत्तर देण्यासाठी सशस्त्र लढा उभारण्यात आला. निजामांच्या या अत्याचारातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम सुरु झाला होता. तेव्हा मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात लढा उभारण्यात आला होता. हैद्राबाद संस्थानामध्ये मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटकचा काही भाग सामील होता. हैद्राबाद संस्थानातून भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी मुक्ती संग्राम सुरु झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रझवी याने जनतेवर अनेक अत्याचार सुरु केले. या अत्याचारास प्रत्युत्तर देण्यासाठी दुसऱ्या बाजूला मुक्ती संग्राम लढा अधिक गती घेत होता. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा, दिंगबरराव बिंदू, रवीनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, बाबासाहेब परांजपे आदी नेत्यांनी या लढ्यात महत्वाचे कार्य केले. आपल्या जीवाची पर्वा न करता मराठवाड्याच्या गावागावातून हा संग्राम लढण्यासाठी अनेक स्वातंत्र्यवीर नंतर पुढे आले.

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील जरुळ गावातील भाऊराव भिमाजी मतसागर यांनी हैद्राबाद मुक्तिसंग्रामात त्यांचे तसेच सर्व कुटुंबाचे योगदान व उचललेले कष्ट विशेष उल्लेखनिय होय. बदनापूर तालुक्यातील धोपटश्वर येथील दगडाबाई शेळके, बर्दापूर पोलीस ठाणे उडवून देणारे लातूरचे हरिश्चंद्रजी जाधव, रोहिल्यांना जेरीस आणणारे बीडचे विठ्ठलराव काटकर, परभणीत रझाकारांना हुसकावून लावणारे सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातनेश्वरकर, नांदेड येथील देवरावजी कवळे, जीवनराव बोधनकर, मराठवाड्यात निजामाच्या पंतप्रधानास रोखण्यासाठी पूल उडवून देणारे काशीनाथ कुलकर्णी, नळदूर्ग सर करणारे उस्मानाबाद जिल्ह्यातील होटी गावचे जनार्दन होर्टीकर गुरुजी, तर हिंगोली जिल्ह्यातील चंद्रकांत पाटील गोरेगावकर, दीपाजी पाटील दातीकर, बर्हिजी शिंदे वापटीकर, बापुराव शिंदे वापटीकर, भीमराव उर्फ बाबासाहेब शेषराव नायक सवनेकर, वासुदेवराव बसोले, बाबुलाल माणिकचंद राठौर आदींच्या रुपाने मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातून स्वातंत्र्य संग्राम तेजस्वीपणे लढला गेला.






### गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांच्यासमोर निजामाने पत्कारली शरणागती..

■ भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी निजाम तयार होत नव्हता. त्याने नागरिकांवर अतोनात अत्याचार सुरु केल्याने पोलीस ॲक्शन सुरु झाले. भारतीय फौजांनी हैद्राबाद संस्थांनावर चारी बाजूंनी हल्ले सुरु केल्याने निजामास सैन्य माघार घेण्यास भाग पाडले. हैद्राबादचे सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस यांनी १७ सप्टेंबर, १९४८ रोजी शरणांगती स्वीकारल्याने खुद्द निजाम तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासमोर शरण आला. निजामाच्या हुकूमशाहीतून मराठवाडा मुक्त होऊन हैद्राबाद संस्थानावर भारतीय तिरंगा फडकला.

# झाल्टा येथे विवाहितेवर अत्याचार

**छत्रपती संभाजीनगर :** झाल्टा ग्रामपंचायतीच्या लिपिकाने ३१ वर्षीय विवाहितेवर अत्याचार केल्याची घटना झाल्टा गावात २८ ऑगस्ट आणि ४ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी रेवणनाथ कारभारी शिंदे याच्याविरुध्द चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार, आरोपी रेवणनाथ शिंदे हा झाल्टा ग्रामपंचायतीत लिपिक आहे. पीडित महिला नोव्हेंबर २०२४ मध्ये ग्रामपंचायतीत गेली असता त्यावेळी रेवणनाथ शिंदे याने तिची छेड काळात बळजबरी केली होती. परंतु पीडिता बदनामीच्या भीतीने शांत राहिली होती. दरम्यान, पीडितेचा पती २८ ऑगस्टला बाहेरगावी गेला असल्याची माहिती शिंदे याला मिळाली. रेवणनाथ शिंदे याने रात्री तिच्या घरी जावून पीडितेवर लैंगिक अत्याचार केला होता. पुन्हा ४ सप्टेंबर रोजी पीडिता दुपारी शिंदे याने तिच्यावर अत्याचार केला.

# भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी अतुल रासकर

**गंगापूर/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी अतुल रासकर यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे पत्र भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांनी दिले आहे. पक्षाने माझ्यावर जी जबाबदारी टाकली असून ती माझ्यासाठी सन्मानाची बाब असून पक्षाने दाखविलेल्या विश्वासाला तडा जावू देणार नाही, असा विश्वास अतुल रासकर यांनी नियुक्तीनंतर व्यक्त केला. अतुल रासकर यांची भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आमदार प्रशांत बंब यांनी कौतुक केले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकांच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्षांनी संस्थात्मक पक्ष बांधणीला बळकटी देण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत. अशातच रासकर यांच्या नियुक्तीने पक्षाला बळ मिळणार आहे.



### ग्रा.पं.कर्मचाऱ्यांचे सहा महिन्यापासून वेतन थकले

**टेंभुर्णी :** सावरगाव मस्के येथील ग्रामपंचायत कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन मागील सहा ते सात महिन्यापासून थकले आहे. वेतन थकल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोलमजुरी करावी लागत आहे.

तालुक्यातील सावरगाव मस्के येथील ग्रा.पं.कार्यालयातील काम करणारे कर्मचारी राजू म्हस्के यांचे सहा ते सात महिन्यापासून वेतन थकले आहे. वारंवार पाठपुरावा करुनही त्यांना वेतन मिळालेले नाही. वेतन होत नसल्यामुळे कुटुंबप्रपंच चालविण्यासाठी त्यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांना दुसऱ्याच्या शेतावर जाऊन मोलमजुरी करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासनाने आमचे थकीत वेतन त्वरित अदा करावे अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

# सिल्लोडमध्ये झालेल्या अतिवृष्टीचे तातडीने पंचनामे करा

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची मागणी..

**सिल्लोड/प्रतिनिधी**

तालुक्यामध्ये सलग काही दिवसापासून होत असलेल्या पावसामुळे व काल अचानक झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेती पिकाचे अतोनात नुकसान झाले असून शेती पिकांचे शंभर टक्के नुकसान झालेले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रा. राहुल कुमार ताठे यांनी तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

निवेदनात असे म्हटले आहे की, प्रत्येक वर्षीच्या तुलनेत यावर्षी पर्जन्यवृष्टी जास्त असल्याकारणाने व त्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने नदी नाले ओसंडून वाहत असून शेतातील मका, बाजरी, कपाशी, सोयाबीन पाण्याखाली गेले आहेत. शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेला हा घास निसर्गाने हिरावून नेला आहे. त्यामुळे तातडीने पंचनामे करून बाधितांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर राहुल कुमार ताठे, शंकरराव जाधव, हरिदास शेलार, उमेद देशमुख, बाळासाहेब तायडे, राहुल सुरडकर, ज्ञानेश्वर पांढरे, शंकर मानकर, दादाराव गोडसे, शाकीर पठाण, रफिक पठाण, शेख सरफराज, माधवी काळात्रे, रेश्मा शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पाचोड परिसरातील पिके पाण्याखाली

**पैठण :** वादळी वाऱ्यासह संततधार ढगफुटी सदृश पावसाने जोमदार हजेरी लावल्याने पाचोड परिसरातील शेतशिवार जलमय होऊन खरिपाचे पिकं संकटात सापडले आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याच्या भीतीने बळीराजा हतबल झाला आहे.

१३ सप्टेंबर रोजी दुपारपासून पैठण तालुक्यात उत्तरा नक्षत्राच्या जोमदार पावसाला वादळी वाऱ्यासह सुरुवात झाली. रविवार, १४ सप्टेंबर रोजी दिवसभर पावसाचा जोर कायम होता. पावसामुळे पिके पाण्याखाली गेली. सततच्या पावसामुळे दगड मातीच्या घराची व शेतातील विहीरी ढासळल्याच्या मोठ्या घटना घडल्या. थेरगाव, हर्षी, मुरमा येथे घर व विहीरी ढासळल्या.

# व्यापाऱ्याची पाच लाखांची बॅग घेऊन चोरटे पसार

**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

मिरची व्यापाऱ्याची पाच लाख रुपयांची बॅग घेऊन चोरटे पसार झाले. ही घटना जाफ्राबाद येथील गजानन महाराज अर्बन सोसायटीत गुरुवार, ११ सप्टेंबर रोजी घडली. दरम्यान, संशयित आरोपी विदर्भाच्या दिशेने पळाल्याचा संशय आहे. धाड गावाजवळ चोरट्यांनी पळवलेली रिकामी बॅग पोलिसांना आढळून आली.

जाफ्राबाद येथील मिरची व्यवसाय करणारे व्यापारी मोहंमद तौफिक मोहंमद शमीम यांना मजुरांना पैसे द्यायचे होते. त्यामुळे त्यांनी गुरुवारी सायंकाळी साडेचार वाजता एसबीआय बँकेतून चार लाख रुपये काढले. त्यांच्याजवळ आधीचे एक लाख रुपये होते. असे पाच लाख रुपये त्यांनी बॅगेत ठेवले. त्यानंतर जालना रोडलगत असलेल्या गजानन महाराज अर्बनमधून आणखी काही पैसे काढण्यासाठी ते गेले. या वेळी पैसे काढण्याची पावती लिहीत असताना त्यांनी पैशाची बॅग रोखपालाच्या खिडकीसमोर आपल्या पायाजवळ ठेवली. मात्र, त्यानंतर अवघ्या काही वेळेतच चोरट्यांनी पळवून नेली. याप्रकरणी मोहंमत तौफिक मोहंमद शमीम यांनी दिलेल्या तक्रारीवरुन चोरट्याविरुध्द जाफ्राबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राजधर पठाडे करीत आहेत.

### अवजड वाहतूक गंगापूरमार्गे वळविल्याने वाहतूक कोंडी

**गंगापूर :** अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील दुरुस्तीचे काम १२ सप्टेंबरपासून सुरू झाले आहे. रविवार, २१ सप्टेंबरपर्यंत या महामार्गावरील सर्व प्रकारची अवजड वाहतूक पर्यायी मार्गावर वळविण्यात आली आहे. यामुळे पहिल्याच दिवशी शनिवारी गंगापूर शहरात कोंडी होऊन वाहनधारकांचे हाल झाले. मनमाड मार्गावरील दुरुस्तीमुळे अहिल्यानगर-मनमाड मार्गासाठी विविध रस्त्यांचा पर्याय देण्यात आला. त्याबाबतचे पत्र अहिल्यानगरचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शुक्रवारी काढले. त्यानुसार अहिल्यानगरहून मनमाड-मालेगाव -धुळेकडे जाणारी वाहतूक शेंडी बायपास-नेवासा फाटा-कायगाव टोके-गंगापूर व वैजापूरमार्गे इच्छितस्थळी जातील.

# लोकअदालतीत १०३ प्रकरणे निकाली

## दिवसभरात ७८ लाखांची वसुली..

**सिल्लोड/प्रतिनिधी**

येथील दिवाणी न्यायालयात शनिवार, १३ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित ३०५ पैकी १०३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यातील गुन्हा कबुली, दिवाणी दावा, बँक वसुली आदी प्रकरणांचा समावेश असून, ७८ लाख रुपयांची वसुलीही करण्यात आली. यावेळी प्रमुख दिवाणी न्यायाधीश एस.एस. देशमुख, सहदिवाणी न्यायाधीश के.टी. अढायके, एम.इ. किरमे यांची उपस्थिती होती.

लोकअदालतीत ३३ गुन्हा कबुली प्रकरणांतून ८२ हजार ६०० रुपयांची वसुली करण्यात आली. बैंक वसुलीच्या तीन हजार प्रकरणांपैकी ३३ प्रकरणे निकाली काढत ६ लाख ८ हजार ३५०, याशिवाय विविध बँकांचे ४२ लाख ३३५ रुपये वसूल झाले. १३८ धनादेश अनादराची २१ प्रकरणे निकाली काढली. पंच म्हणून अॅड. कौतिक अॅड. रवींद्र ताठे यांनी काम पाहिले. यावेळी सरकारी वकील एस.एस. सपकाळ, वकील संघाचे अध्यक्ष अशोक कळम, तायडे, अॅड. संदीप ढाकरे, सहायक अधिकारी आनंद सुरडकर, ए.बी. पवार, मंजूषा देशपांडे, एस.बी. विटोरे, वैभव निकाळजे, तुषार वाहटुळे, सुभाष आगे, बाळू लोढे, न्यायालयातील अधीक्षक के. आर. हिरेकर, योगेश जामखेडकर, आनंद सुरडकर, एस.बी. विटोरे आदींची उपस्थिती होती.

### राज्यपाल हरिभाऊ बागडे सहा दिवस शहरात

**छत्रपती संभाजीनगर :** राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे सहा दिवसाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे बुधवार, १७ सप्टेंबर रोजी रात्री शासकीय विमानाने शहरात आगमण होईल. त्यानंतर त्यांचा २२ सप्टेंबरपर्यंत छत्रपती संभाजीनगर शहरात मुक्काम राहणार असून यादरम्यान त्यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## मराठवाड्यात परतीच्या पावसाचा धुमाकूळ

# पाच जिल्ह्यातील ३२ मंडळात अतिवृष्टी; शेतीचे नुकसान

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

मराठवाड्यातील पाच जिल्ह्यातील तब्बल ३२ मंडळांत पुन्हा एकदा अतिवृष्टीने दणका दिला आहे. बीड, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली या जिल्ह्यातील मंडळांचा यामध्ये समावेश असून नदी नाले एक झाल्याने अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. प्रकल्पांमधूनही मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असून पीक पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसल्याने शेती पिकाचे नुकसान परिसीमा गाठत असल्याची स्थिती आहे.

मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे नुकसानीचे चक्र थांबण्याचे नाव घेत नसल्याची स्थिती आहे. सोमवारी २४ तासात बीड जिल्ह्यातील सर्वाधिक १५ मंडळ अतिवृष्टी झाली. आजवर पावसाचा टक्का कमी असलेल्या आष्टी तालुक्यात या पावसाचा जोर सर्वाधिक होता. त्यापाठोपाठ धाराशिव जिल्ह्यातील सात, परभणी व लातूर जिल्ह्यातील प्रत्येकी चार तर हिंगोली जिल्ह्यातील दोन मंडलांत अतिवृष्टी झाली. पावसाचा जोर कायम असल्यामुळे पिकाचा बचाव करावा तरी कसा हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सुमारे ६३ मंडळांत तुरळक, हलका पाऊस झाला. जालना जिल्ह्यातील ३६ मंडळांत तुरळक, हलका तर काही ठिकाणी मध्यम पाऊस झाला. बीड जिल्ह्यातील तब्बल ६४ मंडळांत हलका मध्यम दमदार जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यातील आष्टी, केज, अंबाजोगाई, बीड, शिरूर कासार, तालुक्यात पावसाचा जोर अनुक्रमे अधिक होता. लातूर जिल्ह्यातील ५८ मंडळांत हलका मध्यम ते दमदार पाऊस झाला.

लातूर जिल्ह्यातील उदगीर व लातूर तालुक्यात पावसाचा जोर अधिक होता. धाराशिव जिल्ह्यातील ३९ मंडळांत हलका मध्यम, दमदार पाऊस झाला जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, परंडा, तुळजापूर तालुक्यात पावसाचा जोर अनुक्रमे अधिक होता. नांदेड जिल्ह्यातील सुमारे ७८ मंडळांत तुरळक, हलका तर काही ठिकाणी मध्यम पाऊस झाला. परभणी जिल्ह्यातील ४९ मंडळांत तुरळक, हलका, मध्यम पाऊस झाला. हिंगोली जिल्ह्यात सकाळपर्यंत केवळ १२ मंडळाची पावसाची आकडेवारी प्राप्त झाली. त्या माहितीनुसार त्या माहितीनुसार काही मंडळात हलका, मध्यम तर काही मंडळांत तुरळक पाऊस झाला.



### मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त मंडळे

■ मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील नाळवंडी ६७ मिमी, नेकनुर ७०.२५ मिमी, येळंबघाट ९९ मिमी, कडा ६७ मिमी, टाकळसिंग ६७ मिमी, दौलावडगाव ८०.७५ मिमी, धानोरा ९६.२५ मिमी, पिंपळा ९१ मिमी, दादेगाव ९६.२५ मिमी, पाटोदा ८६.५० मिमी, लोखंडी सावरगाव ८६.५० मिमी, केज ७४.२५ मिमी, युसुफ वडगाव ६६.२५ मिमी, होळ ६८.७५ मिमी, शिरूर १०४.२५ मिमी, लातूर जिल्ह्यातील सासारखेडा ७७ मिमी, उदगीर ९३ मिमी, मोघा ९३ मिमी, तोंडार ९३ मिमी, धाराशिव जिल्ह्यातील बेंबळी ७१.७५ मिमी, पाडोळी ७१.७५ मिमी, केशेगाव १०५ मिमी, तुळजापूर ६९.२५ मिमी, अनाळा ६५.७५ मिमी, ईटकुर ६५.७५ मिमी, कळंब ६५.७५ मिमी. परभणी जिल्ह्यातील परभणी ६५.५० मिमी, माखणी ६९.५० मिमी, बोरी ९४ मिमी, दुधगाव ७५ मिमी. हिंगोली जिल्ह्यातील वाकोडी ६६ मिमी, डोंगरकडा ७९ मिमी मंडळात पावसाची नोंद झाली आहे.

### बीडमध्ये ४४ नागरिक पुरात अडकले

■ बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्याच्या सहा गावांमध्ये एकूण ४४ नागरिक पूरस्थितीत अडकले आहेत. कडा (११), सोभा निमगाव (१४), घाटा पिंपरी (७), पिंपरखेड (६), धानोरा (३) आणि डोंगरगण (३) या गावांतील नागरिक अडकले असून, स्थानिक प्रशासनाने तसेच लष्कराच्या हेलिकॉप्टरद्वारे त्यांची सुटका करण्यात आली.



## न्यूज ब्रीफ

### २८ सप्टेंबरला भोकरदन येथे लोक अदालतीचे आयोजन

**भोकरदन :** उपविभागीय अधिकारी, भोकरदन यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा व्हावा तसेच नागरिकांना जलद न्याय मिळावा या उद्देशाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल सेवा पंधरवाडा अंतर्गत न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून रविवार, २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भोकरदन येथे लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. नागरिकांनी अर्धन्यायीक प्रकरणामध्ये तातडीने न्याय मिळवून देण्यासाठी लोकअदालतीचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रासह वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बी.सरवनन यांनी केले आहे.

### जीएसटीमध्ये बदल केल्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा : आ.कुचे

**जालना :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारमधील अर्थ मंत्रालयाने जीएसटीमध्ये बदल करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम केल्याचे मत भाजपचे जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनी येथे केले. जालना शहरातील भाजपच्या कार्यालयात सोमवार, १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११वाजता आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आ.कुचे म्हणाले, केंद्र सरकारने दैनंदिन घरगुती व शेतीच्या वस्तुवरील जीएसटी दर कमी केले आहे.

### बंजारा समाजाच्या मागणीला पाठिंबा

**जालना :** मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गामध्ये सामावून घ्यावे या मागणीसाठी बंजारा समाजातील श्रीकांत राठोड, हरिश राठोड हे जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी उपोषण कर्त्यांची भेट घेवून त्यांच्या न्याय मागणीला पाठिंबा दिला. यावेळी अंबेकर यांनी बंजारा समाज बांधवांच्या न्याय्य मागणीची दखल घेवून शासनाने त्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी केली.

## जालना शहरातील हुतात्मा जनार्दन मामा नागपूरकर स्मारकाची दुरवस्था

# हुतात्मा स्मारकाला अवकळा !








**विनोद काळे**

**जालना :** मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यातील प्राणांतिक लढा देणाऱ्या हुतात्मा जनार्दन मामा नागपूरकर आणि अनेक अज्ञात हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या हुतात्मा स्मारकाला अवकळा आल्याचे दिसून येत आहे. जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज उद्यानासमोर असलेल्या या स्मारकाची दुरवस्था झालेली असून याकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यानंतरही हैदराबाद स्टेट निजामाच्या ताब्यात होते. त्यावेळी झालेल्या मुक्तीसंग्राम लढ्यात अनेक वीरांनी हौतात्म्य पत्करले होते. या स्वातंत्र्य लढ्यातील जनार्दन मामा नागपूरकर यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांचे मूळ गाव बीड जिल्ह्यातील नागापूर हे होते. निजामशाही आणि रझाकाराच्या विरुद्ध त्यांनी प्राणांतिक लढा दिला. या लढ्यात त्यांना हौतात्म्य आले. त्यांच्यासह या लढ्यात अनेक ज्ञात अज्ञात वीरांनी हौतात्म्य पत्करले.

दरम्यान, मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यात बलिदान देणाऱ्या या हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या समोर २ एकर जागेत हुतात्मा जनार्दन मामा नागपूरकर स्मारक उद्यान उभारण्यात आलेले आहे. मात्र, या स्मारकाची देखभाल आणि दुरुस्तीकडे स्थानिक तत्कालीन नगरपालिका आणि आताच्या महानगर पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून आले आहे.

या स्मारकाची दुरवस्था झालेली दिसत असून या स्मारकाच्या छताची, भिंतींची,समोरील ओट्याची दुरवस्था झालेली दिसत आहे. या ठिकाणी पालिकेने वाचनालय सुरू केलेले होते. आता ते देखील अनेक वर्षांपासून बंद करण्यात आलेले आहे. हे स्मारक आता कुलुपबंद अवस्थेत पडलेले असून याठिकाणी नशापान करणारे, जुगार खेळणारे आणि टवाळ लोकांचा वावर दिसून येत आहे. या स्मारकाची दुरुस्ती करण्यात यावी, येथे पुन्हा सार्वजनिक वाचनालय सुरू करावे, अशी मागणी केली जात आहे.

### देखभाल करू

छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या समोर असलेल्या हुतात्मा जनार्दन मामा नागपूरकर स्मारकाच्या ठिकाणी महानगरपालेकडून देखरेख करण्यासाठी कर्मचारी नेमलेले आहेत. तथापि, या ठिकाणची पाहणी करून या स्मारकाची देखभाल दुरुस्ती केली जाईल.

**– संतोष खांडेकर,**
आयुक्त, महानगरपालिका जालना

### वाचनालय केले बंद

■ मोतीबागेच्या निसर्गरम्य परिसरात असलेले हुतात्मा जनार्दन मामा नागपूरकर स्मारक हे दोन एकर जागेत उभारण्यात आलेले असून या स्मारकामध्ये नगरपालिकेचे जनार्दन मामा नागपूरकर यांच्या नावाने वाचनालय सुरू केलेले होते. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून हे वाचनालय बंद करण्यात आलेले असून कचेरी रोडवरील टाऊन हॉल येथील सार्वजनिक वाचनालयात हे वाचनालय विलीन करण्यात आल्याची माहिती महानगरपालिकेतील मालमत्ता विभागातील सूत्रांकडून सांगण्यात आली.

# भुसार मालाचे पैसे दिले नाही ; व्यापाऱ्याच्या घरावर हल्ला !

## जवखेडा ठोबरे येथे ८० जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना / प्रतिनिधी**

भुसार मालाचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यापाऱ्याने पैसे बाकी ठेवले म्हणून जमावाने व्यापाऱ्याच्या घरावर हल्लाबोल केला. भोकरदन तालुक्यातील जवखेडा ठोबरे येथे हा थरार घडला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी ८० जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जवखेडा ठोबरे येथील लंकाबाई सरदार बिलघे यांच्या घरावर ८० ते ९० जणांच्या जणांच्या जमावाने प्राणघातक हल्ला केला. ही घटना रविवार, १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता घडली. लंकाबाई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचा पुतण्या पवन बिलघे याचा केदारखेडा येथे भुसार मालाचा व्यवसाय होता. शेतकऱ्यांचे काही पैसे बाकी राहिल्याने त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. तो सध्या तुरुंगात आहे. मात्र या कारणावरून गावातील बाबासाहेब वराडे, पप्पू उर्फ भास्कर ठोबरे यांनी गावातील ३५ जण व इतर ८० ते ९० लोकांना एकत्र करून लंकाबाई यांच्या घरावर हल्ला केला. हल्लेखोरांनी घराचे गेट मोडले. खिडक्यांवर दगडफेक केली. कॅमेऱ्यांची तोडफोड केली. लाकडांचे ओंडके घरावर फेकले व घरात घुसून महिलांना शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. यावेळी लंकाबाईंची गरोदर मुलगी उपस्थित होती. तरीदेखील आरोपींनी निर्दयीपणे धमक्या दिल्या, असे फिर्यादीत म्हटले आहे.

भोकरदन पोलिस ठाण्यात दंगल, मारहाण, तोडफोड, जीवे मारण्याची धमकी, सरकारी आदेशाचा भंग आदी गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करत असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### यांच्यावर गुन्हे दाखल

■ या प्रकरणी लंकाबाई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बाबासाहेब वराडे, पप्पु उर्फ भास्कर ठोबरे, रमेश ठोबरे, उमेश ठोबरे, गणपत ठोबरे, गणपत ठोबरे, नारायण ठोबरे, संजु ठोबरे, रामेश्वर ठोबरे, बाबासाहेब ठोबरे, विजय ठोबरे, परमेश्वर ठोबरे, शरद ठोबरे, संजु ठोबरे, सुभाष ठोबरे, आकाश आढावे, वनिता ठोबरे, राधाबाई ठोबरे, जगदीश ठोबरे, श्रीराम सोरमारे, गंगाधर काळे, भाऊसाहेब घोडे, परमेश्वर ठोबरे, विजय ठोबरे, संजु ठोबरे, रामेश्वर ठोबरे, पांडुरंग पडोळ, डिगांबर वाघ, लक्ष्मीबाई वाघ, पंढरीनाथ तांबडे, गौतम राऊत, गोविंदराव बकाल, श्रीमंता लोखंडे, दत्तात्रय ठोबरे यांच्यासह अन्य ८०-९० लोकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जनसुरक्षा कायदा रद्द करा : कपिल आकात

**परतूर / प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने बहुमताच्या जोरावर जनसुरक्षा कायदा हे विधेयक नुकतेच पारित केले आहे. हा कायदा मंजूर झाला असून या कायद्यामुळे नागरिकांच्या मुलभूत स्वातंत्र्यावर बाधा येणार आहे. त्यामुळे हा कायदा रद्द करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवक जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी केली आहे. या संदर्भात उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांना निवेदन देण्यात आले.

जनसुरक्षा कायद्याच्या अधिकाराने शहरी नक्षलवाद, माओवाद सरकारच्या कामात अडथळा आणने, सरकार विरोधात घोषणा देणे, या कायद्याचा गैरवापर होवून सरकार याचा वापर विरोधकांचा आवाज दाबण्याकरिता करू शकतात. त्यामुळे हे सरकार या कायदाअडून आपली सत्ता अबाधीत राहावी, म्हणून हिटलर शाहीच्या मार्गाने जात आहे. त्यामुळे सरकारने जनसुरक्षा कायदा रद्द करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## शालेय जुडो स्पर्धेमध्ये श्रुती देशमुख जिल्ह्यात प्रथम

**पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी**



भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील रेणुकादेवी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाची इयत्ता बारावीमध्ये शिकणारी श्रुती राजू देशमुख या विद्यार्थिनींने शालेय जुडो स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.

पिंपळगाव रेणुकाई सारख्या ग्रामीण भागामधून विभाग-राज्यस्तरावर आणि राष्ट्रीय स्तरासारख्या उच्च पातळीवर स्पर्धेमध्ये यश मिळवण्याचे काम श्रुतीने केले आहे. यापूर्वी देखील तिने कुस्ती आणि वेटलिफ्टिंग यासारख्या स्पर्धांमध्ये आपला ठसा उमटवून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्याचे कार्य केले आहे.

श्रुतीने मागील वर्षी शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पातळीवर वेट लिफ्टिंग स्पर्धेमध्ये आपली कामगिरी दाखवली होती. त्यानंतर आता जुडो स्पर्धेमध्ये देखील जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. विभागीय स्तरावरील जुडो स्पर्धेसाठी आता श्रुतीची निवड करण्यात आली आहे.

या यशाबद्दल रेणुका देवी विद्यालयाचे अध्यक्ष वसंतराव देशमुख यांनी विद्यालयाचे नाव श्रुतीने उंचावल्याचे यावेळी सांगितले. मुख्याध्यापक अरुण देशमुख, संचालक अमोल देशमुख, श्रीमती ए.सी. देशमुख, तृप्ती देशमुख, डी. एस. देशमुख तसेच पिंपळगाव रेणुकाई परिसरामधून श्रुतीचे कौतुक होत आहे.

### वडील हेच माझे गुरू

■ माझे गुरु आणि माझे वडील कुस्ती पैलवान होते. त्यांनी मला लहान पणापासूनच कुस्ती लाठी-काठी आणि शालेय खेळांचे प्रशिक्षण दिले, म्हणून मी माझ्या शाळेचे, गावाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करू शकले, अशी भावना यावेळी श्रुतीने व्यक्त केली.

## हज यात्रेवर जाणाऱ्या सैय्यद दिलावर यांचा सत्कार

**माहोरा :** गावातील सैय्यद दिलावर यांची यावर्षी हज यात्रेसाठी निवड झाल्याने माहोरा येथे आनंदाचे वातावरण आहे. यानिमित्ताने गजानन जाधव, शिवाजी जाधव तसेच गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

येथील गजानन जाधव यांच्या निवास्थानी हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. गावकऱ्यांनी त्यांच्या भावी यात्रेसाठी सुरक्षित व मंगलमय प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सय्यद कमाल, दादाराव गडकरी, शिवाजी जाधव, चंद्रकांत चौतमोल, तान्हाजी वाघ, अंकुश जाधव, केशव मकवाने, सय्यद रियाज, अभिजीत थारेवाल, शेख रईस, सलीम सय्यद, निशिकांत वाहूळे आदी मान्यवर व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभात उपस्थितांनी हज यात्रेचे महत्त्व अधोरेखित करत दिलावर यांना शुभेच्छा देऊन गावाचा अभिमान वाढवल्याबद्दल कौतूक केले.



## शाळकरी मुलींवर अत्याचार ; साठ वर्षीय नराधम गजाआड

**अकोलादेव / प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील सावरगाव म्हस्के येथील साठ वर्षीय नराधमाने एका अल्पवयीन शाळकरी मुलीला घरात ओढून अमानुष लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे तालुक्यात संतापाची लाट उसळली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

भिसन ढवळे (६०), रा. सावरगाव म्हस्के, ता. जाफ्राबाद असे या घटनेतील आरोपीचे नाव आहे. अकरा वर्षीय शाळकरी मुलगी सोमवार, १५ सप्टेंबर रोजी दुपारी महादेवाच्या मंदिरात खेळण्यासाठी जात होती. यावेळी ती एकटी असल्याची संधी साधून भिसन याने तिचा रस्त्यात हात धरून स्वतःच्या घरात ओढून नेले. या ठिकाणी तिच्यावर बलात्कार केला. ही संतापजनक घटना समोर आल्यानंतर अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, भोकरदनचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेनंतर आरोपी पसार झाला होता. टेंभुर्णी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती, उप निरीक्षक बाबासाहेब खार्डे, बीट जमादार एस. सी. मान्टे, राजु डोईफोडे, महिला पोलीस मिना साळवे, उषा साबळे ,सागर शिवरकर, सचिन तिडके, अशोक घोंगे, निवृती सोनवणे यांनी तातडीने आरोपी भिसन ढवळे याचा शोध सुरू केला. आरोपी हा पळून जाण्याच्या उद्देशाने शेतात लपून बसला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पंधरा तासानंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आले. अत्याचार ग्रस्त मुलींच्या फिर्यादीवरुन आरोपी विरूद्ध बाल लैंगिक संरक्षण अत्याचार पोस्को नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## गैरहजर अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस; खा.डॉ. कल्याण काळे यांनी घेतला समाचार

# दिशा समितीच्या बैठकीला अधिकाऱ्यांची दांडी !

**जालना / प्रतिनिधी**



सर्वसामान्य जनतेची अडवणूक करणार्या, विविध योजनेचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणार्या कामचुकार अधिकार्यांचा खा. डॉ. कल्याण काळे यांनी खरपूस समाचार घेतला. दरम्यान, यावेळी बैठकीला दांडी मारणाऱ्या आणि काम न करणार्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश डॉ. काळे यांनी यावेळी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, १५ सप्टेंबर रोजी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची ( दिशा ) बैठक खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला आमदार नारायण कुचे, सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम., अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे यांनी जल जीवन मिशन, महावितरण, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महिला व बालविकास, कामगार विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा कौशल्य विकास प्रशिक्षण, एमएसआरएलएम, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध विभागाच्या योजनांचा आढावा घेतला. दरम्यान, जलजीवन मिशन आणि कामगार विभागाच्या अनुषंगाने कोणताच विषय विषयपत्रिकेवर दिसून आला नाही. त्यामुळे खा. डॉ. काळे यांनी तो विषय निर्दशनास आणून दिला. शिवाय मागील दिशा समितीच्या बैठकीतील काही विषय देखील प्रोसिडींगला घेतले नसल्यामुळे त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

### कामे न करताच उचलले बिले !

■ या बैठकीत काही तक्रारीही झाल्या. कामे न करता बिले उचलण्यात आल्याचे दिशा समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्यावर एक समिती गठीत करुन चौकशी करून कारवाई करण्याच्या सुचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकारी मित्तल यांना दिल्या.

### कारणे दाखवा नोटिसा

■ दिशा समितीच्या अत्यंत महत्वाच्या बैठकीसाठी अनेक अधिकार्यांनी दांडी मारली. त्यामध्ये सर्वच तहसिलदार आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश

## बदनापूरला तालुकास्तरीय कार्यशाळा उत्साहात

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**बदनापूर / प्रतिनिधी**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळा शहरातील साक्षी लॉन्स येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत आ. नारायण कुंचे यांनी शासनाच्या विविध योजना व अभियानाची माहिती दिली.

याप्रसंगी माजी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पाटील पठाडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते, तहसीलदार हेमंत तायडे, गटविकास अधिकारी ज्योती राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ भुसारी, बांधकाम विभागाचे उपअभियंता राजहंस यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा म्हणजे केवळ माहिती देण्याचा कार्यक्रम नसून प्रत्यक्ष ग्रामविकासासाठी कार्यपद्धती आत्मसात करण्याची प्रक्रिया आहे.

लोकसहभाग, पारदर्शकता व समान संधी यांच्या जोरावर प्रत्येक गाव आत्मनिर्भर, सुसंस्कृत व प्रगत होईल. गाव मजबूत झाला, तर महाराष्ट्र मजबूत होईल आणि अखेरीस 'समृद्ध महाराष्ट्र' हे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन यावेळी आ. कुचे यांनी केले. या कार्यशाळेस वसंत राव जगताप, भानुदास नाना घुगे, भाजपा तालुकाध्यक्ष भगवान मात्रे, देविदास कुचे, भगवान बारगाजे, नामदेव तिडके, माजी सभापती रवी बोचरे, गणेश कोल्हे, सरपंच मुक्ताबाई महादेव गिते, सरपंच स्वाती संतोष नागवे, सरपंच विजया माला साहेबराव साळवे, सरपंच अश्विनी सुधीर पवार, सरपंच विद्या गणेश गोरे, अनिल उगले, सर्व विभाग प्रमुख व उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, अधिकारी, कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऐतिहासिक विश्वविक्रम...

# आनंदकुमार वेलकुमार ठरला स्केटिंगमध्ये विश्वविजेता बनणारा पहिला भारतीय खेळाडू

**दिल्ली, वृत्तसंस्था :**

युवा भारतीय खेळाडू आनंदकुमार वेलकुमारने १००० मीटर स्प्रिंट शर्यतीत १:२४.९२४ सेकंद वेळेसह ऐतिहासिक विजय नोंदवला. यासह, तो स्केटिंगमध्ये विश्वविजेता बनणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.

भारतीय खेळाडूंनी २०२५ च्या जागतिक स्पीड स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. २२ वर्षीय तरुण आनंदकुमार वेलकुमारने चीनमध्ये होत असलेल्या या मोठ्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. यासह या स्पर्धेत वेलकुमारने २ पदके जिंकली आहेत.

वेलकुमारने एक दिवस आधी ५०० मीटर स्प्रिंट शर्यतीतही कांस्यपदक जिंकले होते. ज्यात त्याचा वेळ ४३.०७२ सेकंद होता. सोमवारी तो सिनियर स्केटिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये पदक जिंकणारा पहिला खेळाडू बनला. याच दिवशी आणखी एका भारतीय खेळाडू क्रिश शर्माने ज्युनियर १००० मीटर स्प्रिंट शर्यतीत सुवर्णपदक जिंकले.पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही आनंदकुमारच्या या कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला. त्यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले, स्पीड स्केटिंग वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ मध्ये वरिष्ठ पुरुषांच्या १००० मीटर स्प्रिंटमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या आनंदकुमार वेलकुमारचा अभिमान आहे. त्यांच्या संयम, वेग आणि आवडीमुळे ते भारताचे पहिले विश्वविजेते बनले आहेत. त्यांची कामगिरी असंख्य तरुणांना प्रेरणा देईल.



### भारताची 'स्केटिंग' मधील लक्षणीय कामगिरी

■ २०२५ च्या सुरुवातीला, आनंदकुमार वेलकुमारने जागतिक क्रीडा स्पर्धेत १००० मीटर स्प्रिंट शर्यतीत कांस्य पदकही जिंकले. त्यावेळी तो रोलर स्पोर्ट्स मध्ये भारतासाठी पदक जिंकणारा पहिला खेळाडू बनला. २०21 मध्ये ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये १५ किमी एलिमिनेशन शर्यतीत वेलकुमारने रौप्य पदक जिंकले होते. २०२३ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत, भारताने ३ हजार मीटर टीम रिलेमध्ये कांस्यपदक जिंकले. या विजयानंतर, भारताने स्केटिंग जगात युरोपियन, लॅटिन अमेरिकन आणि पूर्व आशियाई देशांच्या वर्चस्वाला आव्हान दिले आहे.

# अपोलो टायर्स आणि बीसीसआय मध्ये ५७९ कोटी रुपयांचा करार




**मुंबई, वृत्तसंस्था :**

ऑनलाइन गेमिंग विधेयक २०२५ सादर झाल्यानंतर, ड्रीम ११ आणि बीसीसीआयमधील करार संपला आहे. विधेयक मंजूर होण्यापूर्वी, ड्रीम ११ टीम इंडियाचे टायटल स्पॉन्सर होते. बीसीसीआयचा नवीन टायटल स्पॉन्सरचा शोधला आहे. अपोलो टायर्स आणि बीसीसआयमध्ये सुमारे ५७९ कोटी रुपयांचा करार झाला आहे. टीम इंडिया आता त्यांच्या जर्सीवर अपोलो टायर्सचे नाव घेऊन खेळताना दिसणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि कंपनी यांच्यातील करार पूर्ण झाला असून अपोलो टायर्स कंपनी प्रत्येक सामन्यासाठी बीसीसीआयला ४.५ कोटी रुपये देणार असल्याचे समोर आले आहे.

भारतीय संघाच्या जर्सीवर अपोलो टायर्सचे नाव छापले जाणार आहे. बीसीसीआय आणि कंपनीमधील करार जवळजवळ निश्चित झाला असून अपोलो टायर्स प्रत्येक सामन्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला ४.५ कोटी रुपये देईल. अशी माहिती बीसीसीआयने दिली आहे.

आशिया कप २०२५ मध्ये, टीम इंडिया शीर्षक प्रायोजकाशिवाय स्पर्धेत सहभागी झाली आहे. हा कारार मार्च २०२८ पर्यंत असेल. यादरम्यान टीम इंडिया १२१ द्विपक्षीय सामने तर २१ आयसीसीचे सामने खेळेल.




## बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**मिराई :** दुपारी २, सायंकाळी ५, रात्री ९.३० वा
**बाघी ४ :** दुपारी २.१५, रात्री ९.१५ वा
**दशावतार :** सायंकाळी ५.४५ वा

## खामगाव

**श्री गजानन टॉकीज**

**बागी ४ :** शो टाईम–दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकीज**

**दिल मद्रासी :** शो टाईम– दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

## वाशिम

**एचटूएम मुव्हीप्लेक्स**

**बागी–४ :** दुपारी १२:१५, सायंकाळी ६:१५, रात्री ९:२०
**मिराई :** दुपारी १२:२५, सायंकाळी ६:३०
**दशावतार :** दुपारी ३:१५
**द कॉन्जुरिंग :** लास्ट राइट्स : दुपारी ३:३०, रात्री ९: ३५

## अकोला

**मिराज**

**दी कॉंज्यूरिंग: लास्ट राइट्स :** स. ९.०० वा., दु. ५.०५ वा. रात्री १०.५० वा.
**मिराई :** स. ९.४५ वा. , दु. १.०० वा., सायं. ७.०० वा. रात्र. १०.१५ वा.
**देमॉन स्लायर: कायमेस्टू नो याईबा इन्फिनिटी कास्टल (हिंदी) :** दु. १.३० वा. , रात्री १०.३० वा.
**देमॉन स्लायर: कायमेस्टू नो याईबा इन्फिनिटी कास्टल (इंग्लीश) :** सायं. ७.३० वा.
**बागी ४ :** स. १०.४५ वा., दु. ५.००, रात्री ११.०० वा.
**मन्नु क्या? कारेगा :** स. ११.३५ वा, रा. ८.१५ वा.
**हिर एक्सप्रेस :** दु.२.०० वा.
**बीन लग्नाची गोष्ट :** दु.२.२० वा.
**दशावतार :** सायं. ७.५० वा.

## जालना

**रत्नदीप सिनेमा**

**दशावतार :** सायंकाळी ६ : १५
**मिराय :** दुपारी ३ :००; रात्री ९: ३०

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**बागी ४ :** सायंकाळी ६ : ३०; रात्री ९: ३०
**मिराय :** स ९ : ४५; सायंकाळी ६ :००; रात्री ९ :१५
**दशावतार :** दुपारी : ३ :००

**नीलम सिनेमा**

**बागी ४ :** दुपारी : ३ : २०; रात्री ९ : ३०
**दशावतार :** दुपारी १२ : २०; सायंकाळी ६ : ३०
**मिराय :** दुपारी २ :००; ३ :००; रात्री ९:१५




# द पॅराडाईज चित्रपटाची चर्चा शिगेला , फर्स्ट लूक प्रदर्शित

दसरा चित्रपटाच्या प्रचंड यशानंतर, प्रतिभावान दिग्दर्शक श्रीकांत ओडेला या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. त्यांच्या 'दसरा' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळाले होते. आता त्यांच्या द पॅराडाईज या चित्रपटाचा फर्स्ट लूक प्रदर्शित झाल्यापासून त्याची चर्चा शिगेला पोहोचली आहे.

हा प्रोजेक्ट लवकरच भारतातील सर्वात प्रतीक्षित चित्रपटांपैकी एक बनला आहे. या चित्रपटासह, दसरानंतर पुन्हा एकदा हातमिळवणी करणाऱ्या नॅचरल स्टार नानी आणि श्रीकांत ओडेला यांच्या सहकाऱ्यांकडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत दिग्दर्शकाने सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे त्याचे मागील ब्लॉकबस्टर दसरा आणि पुढचा चित्रपट द पॅराडाईजशी यांना कनेक्ट केले आहे. श्रीकांत ओडेलाच्या द पॅराडाईज चे शूटिंग सुरू झाले आहे. ओडेलाने आपल्या हाताचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये दोन्ही चित्रपटांचे रिस्टबँड असल्याचे दिसत आहेत. चित्रपटाची कहाणी दाखवण्यासाठी काही विशेष गोष्टी आवश्यक होत्या, या चित्रपटाचा सेट तयार करण्यासाठी टीमने खूप मेहनत घेतली आहे. द पॅराडाईज हा चित्रपट खूप धमाकेदार असणार आहे. कला विभागाने, नृत्यदिग्दर्शक आणि दिग्दर्शन टीमसह, द पॅराडाईजसाठी एक अनोखा सेट तयार करण्यासाठी कठोर परिश्रम केले आहेत. या चित्रपटासाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे झोपडपट्ट्यांना एक मोठे साम्राज्य दाखवणे. तसेच, झोपडपट्ट्या पुन्हा तयार करणे खूप कठीण आहे, कारण त्या वास्तविक जीवनात स्वतःहून विकसित होतात, यामध्ये प्रत्येक लहान जागा वापरली जाते. चित्रपटाच्या सेटवर छोट्या छोट्या गोष्टीकडे लक्ष देण्यात आले आहेत.




# मुंबई पोलिसांकडून राज कुंद्राची पाच तास चौकशी

बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा याची सोमावरी मुंबई पोलिसांनी पाच तास कसून चौकशी केली. राज कुंद्रावर ६० कोटी रुपयांच्या कथित आर्थिक घोटाळ्याचा आरोप आहे. याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने राज कुंद्रा याची १० सप्टेंबर रोजी तपास अधिकाऱ्यांसमोर चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावले होते. मात्र, तो काही कारणाने हजर राहू शकला नव्हता.

त्याने आपल्या वकिलामार्फत १५ सप्टेंबरची तारीख मागून घेतली होती. त्यानुसार तो सोमवारी मुंबई पोलीस आयुक्तालयात दाखल झाला होता. पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत सोमवारी राज कुंद्राची ६० कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीप्रकरणी चौकशी करून त्याचा रितसर जबाब नोंदवण्यात आला. राज कुंद्राला पुन्हा एकदा समन्स बजावला जाण्याची शक्यता आहे. राज कुंद्राच्या चौकशीनंतर पत्नी शिल्पा शेट्टीला देखील चौकशीसाठी बोलावले जाईल अशी शक्यता आहे.

# अभिनेत्री हुमा कुरेशीने गुपचूप उरकला साखरपुडा

बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशीने गुपचुप साखरपुडा केल्याची माहिती समोर आली आहे. अनेकदा हुमा कुरेशीचे नाव अभिनय प्रशिक्षक रचित सिंग याच्या सोबत जोडले गेले आहे. आता मात्र दोघांनी गुपचूप साखरपुडा केल्याची चर्चा रंगली आहे.

हुमा आणि रचित हे अनेक वेळा एकत्र दिसले आहेत. त्यांचा जवळीक दाखवणारा एक फोटो त्यांच्या कॉमन फ्रेंडने शेअर केला आहे. त्या फोटोवर त्याने लिहिले ''हुमा, तुला स्वर्गाचा छोटासा तुकडा मिळाला, अभिनंदन.'' ही पोस्ट बघून हुमाच्या साखरपुड्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे.

रचितने स्वतःच्या वाढदिवसाच्या पार्टीतही हुमा सोबतचा फोटो टाकला होता. त्याने कॅप्शनमध्ये लिहिलं होतं, ''दोन काट्यांमधला गुलाब... प्रेम आणि सेलिब्रेशनसाठी धन्यवाद.'' यापूर्वीही सोनाक्षी सिन्हाझहीर इक्बालच्या लग्नात हुमा आणि रचित एकत्र दिसले होते.

रचित हा केवळ अभिनय प्रशिक्षकच नाही, तर अभिनेता देखील आहे. त्याने आलिया भट्ट, रणवीर सिंग, वरुण धवन, विकी कौशल, अनुष्का शर्मा आणि सैफ अली खान यांना अभिनयात मार्गदर्शन केलं आहे.



# दैनिक महाभूमि शब्दसंगम 745



**—: आडवी विधाने :—**

1) दोन व्यक्ति मध्ये भांडणे लावून नामानिराळा राहणारा
3) अंगावर एकही अलंकार नसलेली गरीब स्त्री
5) डावा
7) बिंदू, ठिपका
9) ब्रह्मदेव, वडिलांचे वडील, भीष्मांची एक उपाधि
13) ठरावपत्र, कराराचा कागद
16) मृदू, मुलायम
18) पत्नीचा भाऊ, साळा
19) परीक्षेत नापास
20) मन अस्थिर होणे
22) उजळणी, पुनर्मुद्रण
23) पोळी भाजण्याचे पसरट लोखंडी किंवा धातुचे पात्र
25) पाऊस आल्यावर लहान मुले म्हणतात त्या एका गाण्याची सुरवात
31) लाक्षणिक अर्थाने लाळघोट्या माणूस
32) अर्थ, स्वार्थ, हेतू
34) माझे (सं.)
36) गावचा वसूल सरकारी खजिन्यात जमा करण्याचा अधिकार असलेला
37) एकाच अर्थाचे शब्द
38) वरदान, नवरदेव
39) पापी लोकांचा किंवा पतितांचा उद्धार करणारा
40) मोत्यांची माळ
41) व्रण, जखम
43) नेहमी, सदोदित
44) लहान मुलांची दोस्ती
45) रसीद, पैसे मिळाल्याचा अधिकृत कागद
47) सार्वभौम राजाने करावयाचा यज्ञ
51) रमणारा, उपभोक्ता
52) सूट, सवलत
53) तोंडाला पाणी सोडणारा भाजणीचा केलेला एक महाराष्ट्रीयन खमंग पदार्थ
56) स्तुती, प्रशंसा
58) शंभर वर्षे वयाचा
59) उत्कट इच्छा
60) पौष्टिक पदार्थांचा आहार
61) राजा दशरथाची एक पुत्रवधु
62) सूर्य
63) खोटा आरोप, बालंट
64) पृथ्वी
66) पानावर पीठ लावून निखाऱ्यावर भाजलेली जाड भाकरी
67) ग्रहण लागलेल्या स्थितीत चंद्र किंवा सूर्याचा उदय होणे
71) फळातील रसाळ भाग
73) संस्कृत मध्ये मी
74) पत्राच्या शेवटी विस्मरणाने राहिलेला मजकूर लिहिणे
75) जीभ, जिव्हा

**—: उभी विधाने :—**

1) गुप्त गोष्टी कानात सांगणारा गुप्त माणूस 2) तडाखा, टोला
3) लांब कानाचा
4) हत्तीचे ओरडणे
6) राजवाडा
8) आकुंचन, मिटणे, लज्जा
10) गायनातील स्वरांचा काळ
11) पृथ्वीचा दक्षिण ध्रुव सूर्याकडे पूर्णपणे वळला म्हणजे सूर्यकिरण लंबरुप पडतात, या अंशावरुन जाणारे अक्षवृत्त
12) लोखंडाचा मार लागल्यावर होऊ शकणारा एक रोग
14) आपणांस एखादे काम चांगले करता नाही आले म्हणजे आपला उणेपणा झाकण्यासाठी दुसऱ्यांमध्ये काहीतरी खोड काढणे (एक वाक्प्रचार)
15) किंमती जिन्नस
17) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
21) पायदळावरचा अधिकारी
24) पुस्तक किंवा वृत्तपत्राचे वाचन करणारा
26) सारखा, बरोबर, एकाच वर्गात असणारे
27) चाल, प्रथा
28) गुजराथ राज्यातून वाहणारी एक नदी, महात्मा गांधीजींचा गुजराथेतील आश्रम
29) सूर्योदयापासूनचे पहिले तीन तास
30) पिवळ्या रंगाचे
33) रामायणातील एक श्रीराम पुत्र
35) बुद्धी, आकलन शक्ती
36) झाडाची ढोली, निवांत जागा
40) समस्त
42) शोध घेणे
46) ईश्वराने प्रसन्न होऊ दिलेली देणगी
48) पाण्यावर कितीही मारले तरी पाणी फाटत नाही यावरुन आलेला एक शब्दप्रयोग, निष्फळ प्रयत्न
49) याप्रमाणे
50) खालच्या अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात वरच्या अधिकाऱ्याकडे केलेला अर्ज
52) मजबूत, दणकट
54) भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी देवाने धारण केलेला देह
55) छाप, शिक्का
57) एक तंतु वाद्य
60) वेडा, मूर्ख
63) प्रयत्नावाचून मिळालेले, मोफत
65) समुद्र
66) पारद
68) अवडंबर, थेर, फाजील वेड
69) कावळा
70) कल्याण, हित
72) द्रव, रुची (उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | रो | वा | कुं | ज | रो | वा | | | भा | ऊ | बं | द | की | | ऋ |
| दे | ह | | ज | य | ज | य | क्र | र | | हा | | ण | | घ | ण |
| वा | ण | | र | | नि | स | र | ड्ड | | पो | र | क्र | | र | |
| य | | च | | मा | शी | | भा | र | वा | ह | क | | श्र | | भा |
| न | ग | र | पा | ल | | क | र | | या | | म | न | मि | ळ | ऊ |
| ध | र | ण | | कं | क | ण | | न | | धा | वा | | क | | |
| र्मा | | पा | य | स | | व | ट | व | ट | क | र | णे | | रु | ची |
| य | म | दु | त | | क्र | ट | क | स | र | | | | रा | ख | |
| | | क्र | न | डो | ळ | | म | | फ | ण | क्र | रा | | स | ल |
| अ | ज्ञ | | | म | | इ | क | बा | ल | | न | | फ | त | वा |
| भि | | द्वा | र | क्र | | मा | | जा | | पा | ठ | ब | ळ | | ज |
| न | | र | | व | ज | न | दा | र | | क | ळी | | | मा | मा |
| व | च | पा | | ळ | | दा | | बु | ध | | ब | क | ध्या | न | |
| भा | | ल | स | | सा | र | व | ण | | ध्या | स | | न | | ज |
| र | त | | फ | | स | | | गे | रु | | णे | | चं | द्र | मा |
| त | प | शी | ल | वा | र | | | | प | त | | या | द | व | |

uday munde - 8446302691

# जिंकलो तरीही ट्रॉफी घेणार नाही




आशिया चषकातील रविवारी झालेल्या भारत आणि पाकिस्तान सामन्याला भारतात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. एप्रिल महिन्यात पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात रोष निर्माण झाला होता. त्यामुळे बीसीसीआय, सरकार तसेच भारतीय खेळाडूंवरही तीव्र टीका झाली. दरम्यान, या सामन्यात पाकिस्तानला पराभूत केल्यानंतर सूर्यकुमार यादवने पहलगाम हल्ल्यातील हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली. जर भारतीय संघाने २८ सप्टेंबर रोजी आशिया कपचे विजेतेपद जिंकले तर संघ एसीसी प्रमुख मोहसीन नक्वी यांच्याकडून स्पर्धेची ट्रॉफी घेणार नाही. किंवा त्यांच्यासोबत स्टेज शेअर करणार नाहीत असा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. टीम इंडिया त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याचा विचार करत आहे.

टीम इंडिया आशिया कप जिंकण्याच्या दावेदारांमध्ये नंबर वन आहे. यावेळी भारतीय संघ इतका मजबूत आहे की त्यांच्याशी स्पर्धा करणे क्वचितच शक्य आहे. सहसा आयसीसीचे विजेतेपद त्यांच्या प्रमुखांकडून दिले जाते त्याच प्रमाणे एसीसीचे विजेतेपदही त्यांच्या प्रमुखांकडून दिले जाते. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार जर सामनाधिकारी पायक्रॉफ्टला काढून टाकले नाही तर पाकिस्तानने स्पर्धेतून माघार घेण्याची धमकी दिली आहे. पीसीबी प्रमुख मोहसीन नक्वी हे सध्या आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुख असल्याने हे अशक्य वाटते.

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

बुधवार । १७ सप्टेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

न्यूज ब्रीफ

### निळकंठ सूतगिरणी पुन्हा सुरु होणार

**अकोला :** जिल्ह्यातील निळकंठ सहकारी सूतगिरणी पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा असून, राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग विभाग ''खास बाब'' म्हणून आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. अर्थसहाय्याचे प्रमाण ५:४५:५० या गुणोत्तरानुसार ठरवण्यात आले असून, हा निर्णय १६ सप्टेंबर रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झाला आहे. अकोला जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. या आर्थिक सहाय्यामुळे सूतगिरणीच्या कामकाजात गती येईल, रोजगाराच्या संधी कायम राहतील, तसेच स्थानिक वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना मिळेल.

### रेल्वेतून उतरताना प्रवासी अडकला

**अकोला:** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेला हादरवणारी धक्कादायक घटना सोमवारी मूर्तिजापूर रेल्वे जंक्शनवर घडली. पुणे-अमरावती गाडीतून प्रवास करणारा अकोल्यातील मुस्ताक खान मोईन खान हा प्रवासी प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर उतरतानाच घसरला आणि थेट गाडीखाली अडकला. क्षणातच भीषण परिस्थिती निर्माण झाली. जखमी प्रवासी एवढा घट्ट अडकला होता की त्याला बाहेर काढणे अशक्यप्राय ठरत होते. तत्काळ रेल्वे पोलिसांनी जय गजानन आपत्कालीन पथकाला बोलावले. या पथकाने गॅस कटरच्या सहाय्याने गाडीचे पायदान कापून अडकलेल्या प्रवाशाची सुटका केली. सुटकेच्या प्रयत्नादरम्यान प्लॅटफॉर्मवर थरारक वातावरण होते. पथकाच्या तत्परतेमुळे मुस्ताक खानचा जीव वाचला. मात्र या अपघातात त्याच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून, त्याला तातडीने श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे एक्सप्रेस बराच वेळ खोळंबली होती

## वादळी वारा, विजांचा कडकडाट : अडीच तास बरसला

# जिल्ह्यात सर्वदूर जोरदार पाऊस; पिकांचे नुकसान, हंगाम धोक्यात

**अकोला / प्रतिनिधी**



शहरात दिवसाआड पाऊस सुरू आहे. अशातच सोमवारी दिवसभर कडाक्याचे ऊन तापले.दरम्यान सायंकाळी साडेसहा नंतर तुफान वारा, विजासंह मुसळधार पावसाला सुरुवात झाली.पावसाचा जोर एवढा होता की, अडीच तासात शहरातील रस्ते जलमय झाले. अचानक आलेल्या पावसाने बाजारपेठेत देखील धांदल उडाल्याचे पाहायला मिळाले.

जिल्ह्यात गेल्या एका आठवड्यापासून कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत आहे.दरम्यान दोन दिवस पावसाचा खंड होता. सोमवारी सकाळपासून वातावरण कोरडे होते तर दुपारी उन्ह देखील तापले.मात्र सायंकाळी सहा नंतर वातावरणात बदल झाला व विजांच्या कडकडाटांसह मुसळधार पावसाने हजेरी लावली.अवघ्या तासाच्या पावसाने शहरातील सर्व रस्ते जलमय झाले होते.यंदा आधीच पावसाने सरासरी ओलांडली असून ७४९.८ मिमी पावसाची नोंद आतापर्यंत झाली आहे. सततच्या सुरू असलेल्या या पावसाने शेती पिकांचे देखील प्रचंड नुकसान झाले असून सकल भागात पाणी साचल्याने शहरवासीयांचे देखील हाल होत आहे.

### काही तासातच शहरात रस्ते जलमय

■ सायंकाळी सहा वाजता शहरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली तब्बल अडीच तास नऊ वाजेपर्यंत एकसारखा पाऊस बरसला त्यामुळे शहरातील सखल भागात पाणी शिरले व मुख्य रस्त्यावर देखील जन्म झाल्याची पाहायला मिळाले. दरम्यान शहरात कोणतीही अनुचित घटना घडली नसल्याची माहिती जिल्हा नैसर्गिक आपत्ती विभागाकडून देण्यात आली.

### मुसळधार पावसामुळे रस्ते-पुलांचे मोठे नुकसान

■ सततच्या अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे तब्बल ३४ रस्ते व पुलांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, नागरिक व वाहनधारक मोठ्या अडचणींचा सामना करत आहेत. या नुकसान भरपाईसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एकत्रित ३५ कोटी १७ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. या नुकसानात सर्वाधिक फटका अकोट व तेल्हारा तालुक्यांना बसला असून, या दोन्ही तालुक्यात तब्बल १२ पुलांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये रस्ते व पूलांचे नुकसान झाल्याची नोंद आहे. प्रस्तावानुसार, अकोला तालुक्यातील ३ रस्त्यांसाठी ११ कोटी २७ लाख रुपये, बाळापूर तालुक्यातील ८ रस्त्यांसाठी ४ कोटी २५ लाख रुपये (नागद-सागद पुलाचे मोठे नुकसान), पातूर तालुक्यातील ४ रस्त्यांसाठी ५ कोटी ५ लाख रुपये, बार्शीटाकळी तालुक्यातील १२ रस्त्यांसाठी ९ कोटी २० लाख रुपये, आणि मूर्तिजापूर तालुक्यातील ५ रस्त्यांसाठी ९० लाख रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे.

### काटेपूर्णातून पाण्याचा विसर्ग

■ काटेपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस झाल्याने हवामानाचा अंदाज लक्षात घेता धरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सोमवारी रात्री ७.३० वाजता काटेपूर्णा प्रकल्पाचे २ द्वारे ६० सें.मी.उंचीने उघडून एकूण ९८.९६ क्यूसेस इतका पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. त्यामुळे काटेपूर्णा नदी दुथडी भरून वाहत आहे.



## पोलिसांच्या ताफ्यात मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन

### घटनास्थळावरच होणार तपास

**अकोला / प्रतिनिधी**

पोलिसांच्या ताफ्यात दाखल झालेल्या मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनमुळे अकोला शहर व ग्रामीण परिसरातील पोलिसांना घटनास्थळी त्वरित पोहचून पुरावे गोळा करण्याची, भौतिक व जैविक नमुने सुरक्षित करून प्रयोगशाळेत पाठविण्याची सुविधा मिळणार आहे.

१५ सप्टेंबर रोजी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून या विशेष व्हॅनचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अकोला उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक शंकर शेळके, सपोनि फिंगर प्रिन्ट सुरेश परसोडे उपस्थित होते. प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथून वाहन क्रमांक एम एच १२ वाय डी ९९६८ हे पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला करिता प्राप्त झाले. व्हॅन उपविभागीय अधिकारी अकोला यांच्या अधिपत्याखाली कार्यान्वित होईल आणि इतर वाहने प्राप्त होईपर्यंत अकोला जिल्हा (शहर व ग्रामीण) सेवा उपलब्ध राहील. व्हॅनमध्ये आवश्यक किट्स, रसायने व वैज्ञानिक साधनसामग्री उपलब्ध असून फॉरेन्सिक तज्ञ, वैज्ञानिक सहाय्यक, वाहन चालक व प्रयोगशाळा परिचरांची नियुक्ती करण्यात आली आहे. घटनास्थळी त्वरित पोहोचून पुरावे सुरक्षितपणे गोळा करण्याची, भौतिक व जैविक नमुने लॅबकडे पाठविण्याची सुविधा व्हॅनद्वारे मिळणार आहे.

### स्वतंत्र टीम कार्यान्वित

■ टीममध्ये अभिषेक भारसाकळे, पूजा खडसे, नेहा इंगळे, सोनल गाडगे, गायत्री हरणे, नागेश बाचने, ओम बोडफळे, राहुल गावंडे, अनिकेत वाजडे, अंकुश मोरे, रूपेंद्र ठाकरे यांचा समावेश आहे. मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनच्या माध्यमातून पोलीस विभागाला तात्काळ वैज्ञानिक मदत मिळून गुन्हे उकलण्याची प्रक्रिया गतीमान आणि विश्वसनीय होणार आहे.

## रक्तदान शिबिरांचा उपक्रम लोकचळवळ व्हावा : वर्षा मीना

**अकोला / प्रतिनिधी**

रक्तदानाच्या कार्यात अधिकाधिक लोकसहभाग मिळविण्यासाठी 'राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिवस' १ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येणार आहे. हा उपक्रम लोकचळवळीचा स्वरूप धारण करावा, यासाठी अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले.

केंद्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयातर्फे देशभरात हा दिवस साजरा होतो. जिल्ह्यातून अधिक रक्तदाते नोंदवले जावेत म्हणून इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान रक्तदान मोहिम पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अंतर्गत डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या सुसज्ज मोबाईल रक्तदान व्हॅन व पथकाच्या सहकार्याने तालुका पातळीवर शिबिरांचे आयोजन होईल. या सामाजिक उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन राष्ट्रीय सेवेचा भाग व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

## प्रा. श्वेता मेंढे यांना पीएचडी पदवी

**अकोला / प्रतिनिधी**

आर. डी. जी. महिला महाविद्यालय, अकोला येथील कॅप्टन श्वेता प्रियदर्शी मेंढे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण शाखेतील पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. कॅप्टन श्वेता मेंढे या श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विभागात कार्यरत आहेत. त्यांचा पीएचडी प्रबंध ''एरोबिक व्यायाम का विदर्भ की महिला छात्राओं के शारीरिक क्षमता तथा शरीर के वजन पर होने वाले परिणाम का चिकित्सक अध्ययन'' या विषयावर आधारित आहे.

## नव्या वाणांची शेतीशाळा ठरणार फलदायी

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात खरीप शिवार फेरी

**अकोला / प्रतिनिधी**

जागतिक हवामान बदल आणि व्यावसायिक स्पर्धेच्या या काळात शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करता यावे, तसेच कृषी प्रक्रिया व मार्केटिंगमध्ये सक्षम होता यावे, या उद्देशाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या वतीने तीन दिवसीय खरीप शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम कृषी विभाग महाराष्ट्र शासन व संलग्न संस्थांच्या सहकार्याने २०, २१ व २२ सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर पार पडणार आहे. या फेरीत शेतकऱ्यांना ३०० हून अधिक जिवंत प्रात्यक्षिके, पिकानिहाय संशोधन, तंत्रज्ञान, आधुनिक शेती पद्धती, तसेच कृषी प्रक्रियेतील विविध संधी यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

सूर्यफूल, भुईमूग, कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, ज्वारी, बाजरीसह नगदी व तृणधान्य पिके, फळबागा, भाजीपाला, फुलपिके, सेंद्रिय शेती, शेळीपालन, कोंबडीपालन, रेशीमशेती, सुगंधी-औषधी वनस्पती, तसेच शेतीपयोगी आधुनिक यंत्रसामग्रीचेही प्रदर्शन होणार आहे. विशेष वैशिष्ट्य म्हणून २० एकर क्षेत्रावर खरीप पिकांच्या विविध जातींची व तंत्रज्ञानाची मांडणी करण्यात आली आहे. एकाच ठिकाणी विविध विद्यापीठे व खासगी संस्थांची सुधारित वाणं व लागवड पद्धती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे.

### शनिवारी होणार प्रारंभ

■ अतिशय नाविन्यपूर्ण पद्धतीने यंदाच्या शिवाय फेरीचे आयोजन करण्यात आले असून शनिवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजेपासून शिवार फेरीला सुरुवात होणार आहे. संपूर्ण आयोजनात कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने व त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत. शेतकरी बंधू-भगिनींनी सहकुटुंब या शिवार फेरीस उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठ व कृषी विभागाने केले आहे.

## शाळांतील तरुण प्रतिभांनी गाजवली वक्तृत्व स्पर्धा

**अकोला / प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री शिवाजी विद्यालय टाऊन ब्रँचमध्ये आयोजित इंग्रजी वक्तृत्व व एक्सटेंपरी स्पर्धा १५ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडली. तालुक्यातील ६० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेत आपले भाषण कौशल्य सिद्ध केले.

कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे, इंग्रजी विषय शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डी. बी. म्हैसने उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मनोज देशमुख होते. मेटा सदस्य सुनील अवचार, गणेश राऊत, वैशाली अवचार, प्रा. अमोल जती, प्रा. गोपाल दशमुखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वक्तृत्व स्पर्धेत अकोला शहर गट अ मधून अद्वैत गायकवाड (बाल शिवाजी शाळा) प्रथम, चंचल घाटे (अमृत कलश विद्यालय) द्वितीय, राधिका घुमरे (श्री शिवाजी हायस्कूल टाऊन ब्रँच) तृतीय क्रमांकावर ठरले. गट ब मधून प्रणव नवले (बाल शिवाजी हायस्कूल) प्रथम, आदिनाथ सोनोने (भिकमचंद खंडेलवाल विद्यालय) द्वितीय, आस्था तेलगोटे (न्यू इंग्लिश हायस्कूल) तृतीय ठरले. अकोला ग्रामीण गट अ मधून मंजू होळकर (परशुराम नाईक विद्यालय, बोरगाव) प्रथम, रिया साबळे द्वितीय, राशी बावस्कर तृतीय ठरली. गट ब मधून आकांक्षा गवई प्रथम, मोहम्मद जाहिद द्वितीय, वेदांती चोरे तृतीय ठरली.

एक्सटेंपरी स्पर्धेत गट अ मधून साची सुरवाडे प्रथम, स्पंदना वानखडे द्वितीय, आदिती कावीटकर तृतीय ठरली. गट ब मधून युतीका भट्टड प्रथम, श्रेयस कोलते द्वितीय, कृष्णाली धेंडे तृतीय ठरली. विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वैशाली अवचार व शितल मोरे यांनी केले, आभार सुनील अवचार यांनी मानले.

## दारूच्या नशेत वाद, दगडाने ठेचून एकाचा खून

**अकोला / प्रतिनिधी**

शहरातील शासकीय रुग्णालय परिसरात मंगळवारी सकाळी एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. दारूच्या नशेत झालेल्या वादातून ही हत्या घडल्याची प्राथमिक माहिती पोलिस सुत्रांकडून समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ सप्टेंबरच्या मध्यरात्री दोन व्यक्तींमध्ये किरकोळ वाद झाला. तो वाद चिघळताच एका व्यक्तीने दगड उचलून दुसऱ्यावर वार केला. यात शांताराम शिवराम गोपनारायण (रा. घुसर) याचा जागीच मृत्यू झाला.

घटनास्थळी असलेला मारेकरीदेखील जखमी झाला असून त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मात्र तो अद्याप शुद्धीवर नसल्याने त्याची ओळख पटलेली नाही. या धक्कादायक घटनेनंतर सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## सहा दिवसीय नाट्य अभिनय कार्यशाळेला प्रारंभ

**अकोला / प्रतिनिधी**




शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात पीएम उषा योजनेअंतर्गत १५ ते २० सप्टेंबर दरम्यान सहा दिवसीय नाट्य अभिनय कार्यशाळेचे उद्घाटन रंगकर्मी सचिन गिरी यांच्या हस्ते १५ सप्टेंबर रोजी पार पडले. अभिनय शिबिर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांनी आपल्या भाषणात नाट्यकलेची जोपासना करताना व्यावसायिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले. उद्घाटन सोहळ्यात ज्येष्ठ रंगकर्मी विष्णू निंबाळकर, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सुमेध कावळे, प्रा. डॉ. अविनाश थोटे उपस्थित होते. प्रारंभीच्या सत्रात प्रमुख मार्गदर्शक संकेत खेडकर (सप्तरंग थिएटर, अहिल्यानगर) यांनी विद्यार्थ्यांना नाट्य निर्मिती प्रक्रिया, अभिनयासाठी निरीक्षण आणि एकाग्रतेचे महत्त्व प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले. प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. ज्ञानसागर भोकरे यांनी, सूत्रसंचालन निकिता पोरे यांनी केले. तर सांस्कृतिक समिती सदस्य प्रा. डॉ. निशा वराडे यांनी आभार मानले. या सहा दिवसीय शिबिरात दिग्दर्शक हरिष इथापे, प्रा. गणेश शिंदे, सागर लांडगे आणि महेश इंगळे मान्यवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

### महिला व बालकांच्या आरोग्य तपासणीसाठी जिल्ह्यात विशेष शिबिर

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानास आजपासून प्रारंभ

**अकोला / प्रतिनिधी**




निरोगी नारी म्हणजे सशक्त परिवार आणि सशक्त परिवार म्हणजे प्रगत राष्ट्र या ध्येयाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत ''स्वस्थ नारी, सशक्त परिवार'' हे राष्ट्रीय अभियान आजपासून जिल्ह्यात राबविले जाणार आहे.

जिल्ह्यातील शुभारंभ सोहळ्यास पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अभियानाचे आयोजन उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. वाघचोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल, महानगरपालिका आयुक्त सुनील लहाने, वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष गिरे आणि स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. जिल्हा व महापालिका स्तरावर महिलांसाठी व बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आजच सुरू होणार आहेत. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करणे असा आहे. या मोहिमेत आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज तपासणी आणि जनजागृती शिबिरे आयोजित केली जाणार आहे.

जिल्हा रुग्णालय ,जिल्हा स्त्री रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये / उपजिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरे घेतली जाणार आहे. खासगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्नीत रुग्णालये व क्लिनिक येथे देखील विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

### विशेष उपक्रम

- ■ महिला बचत गट व पंचायत प्रतिनिधींच्या माध्यमातून पोषण जनजागृती
- ■ खाद्यतेल व साखरेचा वापर कमी करण्यावरील मार्गदर्शन
- ■ १ ऑक्टोबर राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिनानिमित्त देशभरात १ लाख युनिट रक्तदानाचे उद्दिष्ट; इंडियन रेड क्रॉस सोसायटी व तेरापंथ युवक परिषदेचा सहभाग
- ■ आयुष्मान भारत डिजिटल मिशन कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना कार्ड पात्र लाभार्थ्यांना वाटप

### शिबिरांमध्ये मिळणाऱ्या सेवा

■ उच्च रक्तदाब, मधुमेह, तोंडाचा, स्तनाचा व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी, क्षयरोग तपासणी व जोखीम गटातील महिलांना समुपदेशन किशोरवयीन मुलींसाठी ॲनिमिया तपासणी, पोषण व मासिक पाळी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन, आदिवासी भागातील महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप, गर्भवतींसाठी प्रसूतिपूर्व काळजी, हिमोग्लोबिन तपासणी व पोषण समुपदेशन, बालकांचे लसीकरण, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्ध, नॅचरोपॅथी या पर्यायी उपचार पद्धतींचा लाभ

### क्षयरोग निर्मूलनासाठी 'निक्षय मित्र'

■ या अभियानात क्षयरोग निर्मूलनावर विशेष भर देण्यात आला आहे. क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करून देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था व संघटनांना 'निक्षय मित्र' म्हणून जोडले जाणार आहे.

## बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मेळावा ठरणार आधार

**अकोला / प्रतिनिधी**

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा रोजगार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर होणार असून, त्यात नामांकित ४ कंपन्यांमधील १०० पदांची भरती करण्यात येणार आहे. या रोजगार मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय तसेच पदवीधर उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी सहभागासाठी महास्वयम संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करावी. मुलाखतीसाठी उपस्थित राहताना उमेदवारांनी बायोडेटा, शैक्षणिक कागदपत्रे, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र तसेच आवश्यक कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी स्वखर्चाने मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे. मेळाव्यासंबंधी अधिक माहितीसाठी संबंधित केंद्राच्या कार्यालयाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## शेकडो हेक्टर शेती पाण्याखीली

# खामगाव परिसरात दमदार पावसाची हजेरी, जनजीवन विस्कळीत

**खामगाव / प्रतिनिधी**

शहर व परिसरात १६ सप्टेंबरच्या पहाटेपासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. या दमदार पावसामुळे शहर व तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून तालुक्यातील शेकडो हेक्टर शेत जमीन पाण्याखाली गेल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तर शहरातील बोर्डी नाल्याला पुर आल्याने सिंधी कॉलनी आणि जनुना मार्गावरील पुलावरून पाणी वाहत होते. त्यामुळे या मार्गावरील वाहतुक काही काळ विस्कळीत झाली होती.

मागील काही दिवसानंतर प्रथमच पावसाने १६ सप्टेंबरच्या पहाटे दमदार हजेरी लावली आहे. दोन तास सुरू असलेल्या या दमदार पावसामुळे नागरिकांची दाणादाण उडाली होती. पहाटे रिमझिम सुरू झालेल्या पावसाने सकाळी अचानक रूद्ररूप धारण केले होते. दोन तास झालेल्या कोसळधार पावसाने सर्वांचीच धांदल उडविली होती. अचानक आलेल्या जोरदार पावसाने सर्वत्र शहरातील गल्लीमध्ये रस्त्यावर नदीचे स्वरूप आले होते.

शहरातील नाल्या तुडूंब भरून नाल्यातील पाणी रस्त्यावर वाहत होते. न.प. कडून नाल्यांची नियमित सफाई होत नसल्याने नाल्यातील पाणी अनेकांच्या घरात शिरल्याचे दिसून आले. याचबरोबर तालुक्यातील अनेक ठिकाणी शेतीचे नुकसान झाले आहे. तालुक्यातील अनेक गावांमधील लहान मोठ्या नदी, नाल्यांनाही पुराचे स्वरूप आले होते. त्यामुळे शेतकरी आणि गावकऱ्यांनाही मोठा फटका बसला. सकाळी शेतीसाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांना आणि दुग्धव्यावसायिकांनाही याचा त्रास झाला.

दमदार पावसामुळे अनेकांची कामे प्रभावित झाली होती. दोन ते तीन तास झालेल्या जोरदार पावसामुळे शहरातून वाहणाऱ्या बोर्डी नाल्याला पुराचे स्वरूप आले होते. त्यामुळे शहरातील जनुना तलाव रोडवरील सिंधी कॉलनी जवळील नदीच्या पुलावरून पाणी वाहत होते. त्यामुळे जनुना कडे जाणारी वाहतुक विस्कळीत झाली होती.

याठिकाणी न.प. कडून रस्ता निर्माणाचे काम सुरू असून सदर बोर्डी नाल्यावरील पुलाची उंचीही वाढवण्यात येणार असून अद्याप मात्र या कामाला सुरूवात करण्यात आलेली नाही. त्यामुळे दमदार पाऊस झाल्यानंतर याठिकाणी नेहमीच पुलावरून पाणी वाहते आणि वाहतूक प्रभावित होते. तरी तातडीने पुलाची उंची वाढविण्याचे कामाला सुरूवात करण्यात यावी. अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



### शेकडो हेक्टर शेतीचे नुकसान

■ मंगळवारी झालेल्या जोरदार पावसामुळे तालुक्यातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर जमीन पाण्याखाली गेल्याचे दिसून आले. तसेच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे . संपूर्ण खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून निसटण्याची भिती निर्माण झाली आहे. सततच्या पावसामुळे शेती पाण्याखाली गेल्याने पिकांची नासाडी झाल्याची ओरड शेतकऱ्यांकडून केली जात आहे. याबाबत महसूल प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे घेण्यात येत आहेत.



### फरशी आणि दाळफैल भगात पाणी घुसले

■ १६ सप्टेंबर रोजी सकाळी झालेल्या दमदार पावसामुळे बोर्डी नाल्याला पुर आला होता. त्यामुळे पुराचे पाणी फरशी भागात काही ठिकाणी घुसले होते. तसेच दमदार पावसामुळे दाळफैल भागातील रस्त्यावरून पाणी वाहत होते. नाल्यांची सफाई न झाल्याने नाल्यामधील सांडपाणीसुध्दा रस्त्यावर आणि वस्त्यात घुसल्याचे दिसून आले. त्यामुळे नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागला.

## सिध्दी विनायक मंदिरातील गणपती मुर्तीची खोळ निघाली



**खामगाव / प्रतिनिधी**

येथील सुटाळपुरा भागातील सिध्दी विनायक मंदिरातील श्री गणपती मुर्तीची खोळ निघाली असून त्यामुळे मुर्तीचे मुळ स्वरूप समोर आले आहे. मुळ मुर्तीच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी उसळली आहे.

सुटाळपुरा भागातील स्व. नंदलाल खत्री यांना १९०२ साली मध्यप्रदेश मधील खंडवा जिल्ह्यातील शिवनी येथून संत दादाजी धुनीवाले यांच्याकडून आशिर्वाद रूपाने श्री गणपतीची मुर्ती मिळाली होती. ती मूर्ती त्यांनी खामगाव येथे आणून संत दादाजी पुनीवाले यांनी सांगितल्या प्रमाणे मुर्तीची पुजा अर्चा करून १९०२ साली म्हणजे आजच्या १२३ वर्षापुर्वी मुर्तीची स्थापना करून छोटे मंदिर बांधले. या मंदिराची जबाबदारी १९८० पर्यंत खत्री परिवाराने सांभाळली, त्यानंतर ट्रस्ट रजिस्टर करून स्व. मुकुंद टिपरे, स्व. बबन महाजन, स्व. विलास पाठक यांनी कारभार पाहण्यास सुरुवात केली. त्यानंतर रविंद्र गिरजापुरे, गणेश क्षीरसागर, अशोक हिवरकर, गोवर्धनसेठ गोयनका, पिंटु पारीख, नंदु खत्री, श्रीराम अग्रवाल, मोहन अग्रवाल यांनी २००६ मध्ये मंदिराचा जिर्णोध्दार केला. या सिध्दीविनायक गणपती मुर्तीची खोळ सन १९८३ मध्ये निघाली होती. त्यानंतर आता तब्बल ४२ वर्षांनी ही खोळ १५ सप्टेंबर रोजी आरती सुरू असतांना निघाली. त्यामुळे मुर्तीचे मुळ स्वरुप समोर आले आहे. यामुळे भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून दर्शनाकरिता भक्तांनी एकच गर्दी केली होती. आता या ट्रस्टचा कारभार रविंद्र गिरजापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विजयकुमार गुजराथी, मनिष सावंग, जितेंद्र गुजराथी, गोविंद मुसाची, दिगंबर माडीवाले व गणेश क्षिरसागर हे पाहत आहेत.

## न्यूज ब्रीफ

### सहज समाधी ध्यान योग शिबीराचे आयोजन

**खामगाव :** श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणेने आर्ट ऑफ लिव्हींग खामगावच्या वतीने सहज समाधी ध्यान योग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबीर देशमुख मंगल कार्यालय (सिव्हील लाईन) येथे १७ ते १९ सप्टेंबर पर्यंत सकाळी किंवा संध्याकाळी ६ ते ८ (कोणतीही एक वेळ) या वेळेत होणार आहे. शिबीरात प्रत्येकाला वैयक्तिक बीज मंत्र देण्यात येणार असून सदर मंत्राच्या साह्याने समाधीचा अनुभव सहजतेने घेऊ शकतो. शिबीरात १६ वर्षावरील महिला-पुरुष सहभाग घेऊ शकतात. नागरिकांनी शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने प्रशांत जवरे यांनी केले आहे.

### सराफा व्यावसायिकांची फसवणुक, गुन्हा दाखल

**खामगाव :** शहरातील एका व्यापाऱ्याने दोन सराफा व्यावसायीकांकडून दीड कोटींचे दागिने घेऊन त्यांची फसवणुक केल्याप्रकरणी शहर पोलिसांनी त्याचेविरूध्द तक्रारीवरून फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक रायगड कॉलनी केला नगर भागातील व्यापारी ऋषी संदीप खत्री (२४) याने मुरलीधर बन्सीलाल सोनी ज्वेलर्सचे संचालक जितेंद्र मुरलीधर सोनी (५५) व पंचरत्न ज्वेलर्सचे संचालक अभिषेक महेश शेलारका यांचा विश्वास संपादन करून सोन्याचे दागिने खरेदीच्या व्यवहार केला व ९ डिसेंबर २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत सोनी ज्वेलर्स मधून १ कोटी ३७ लाख ४० हजार ५५७ रूपये व पंचरत्न ज्वेलर्स मधून २५ लाख ४ हजार ३८२ रूपयांचे सोन्याचे दागिने खरेदी करून या बदल्यात धनादेश दिला. सदर धनादेश अनादरीत झाल्याने दोन्ही सराफा व्यवसायीकांची १ कोटी ६२ लाख ४४ हजार ९३९ रूपयांनी फसवणुक केली.

### मलकापूर येथून १४ वर्षीय बालक बेपत्ता

**मलकापूर :** नेहमीप्रमाणे नूतन विद्यालय मलकापूर येथे जातो, असे सांगून सकाळी ८ वाजता ग्राम जांभुळधाबा येथून घरून गेलेला १४ वर्षीय विद्यार्थी अभय विनोद खर्चे हा गेला होता. दरम्यान रात्री सव्वा आठ वाजेपर्यंत घरी परतला नाही. अभयला त्याचे वडिल विनोद निवृत्ती खर्चे यांनी फोन केला असता, त्याने फोन उचलला नाही. नंतर पुन्हा कॉल केला असता, मोबाईल स्वीचऑफ येत होता. त्यामुळे कुणीतरी अज्ञात इसमाने माझ्या मुलाला पळून नेवून अपहरण केल्याची तक्रार वडिलाने पोलिसात दिली.

## टीव्ही ॲण्ड डिजिटल मीडिया जर्नालिस्ट असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

**खामगाव / प्रतिनिधी**



बुलढाणा जिल्ह्यातील टीव्ही ॲण्ड डिजिटल मीडिया जर्नालिस्ट असोसिएशनची बुलढाणा जिल्हा कार्यकारणीची १४ सप्टेंबर रोजी निवड करण्यात आली आहे. पत्रकार फहीम देशमुख यांची जिल्हाध्यक्षपदी तर सचिव म्हणून प्रा. प्रफुल खंडारे तसेच कार्याध्यक्षपदी संदीप वानखडे यांची अविरोध निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल पहुरकर यांच्या अध्यक्षतेत ही कार्यकारिणी निवडण्यात आली आहे.

खामगाव येथील विश्राम भवनात पार पडलेल्या या द्विवार्षिक बैठकीच्या प्रमुख उपस्थिती म्हणून पत्रकार राहुल खंडारे, वरिष्ठ पत्रकार मो. फारुक, पत्रकार श्रीधर ढगे, संदीप शुक्ला, डॉ. संजय महाजन यांची उपस्थिती होती. बैठकीमध्ये सर्वप्रथम स्वर्गीय पत्रकार गजानन कुलकर्णी आणि नागोराव अनोकार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर उपस्थित पत्रकारांनी आपले विचार मांडले.

यावेळी बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी पत्रकार फहीम देशमुख यांच्या नावावर चर्चा होऊन त्यांची अविरोधपणे निवड करण्यात आली. याबाबतची घोषणा असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष राहुल पहुरकर यांनी केली.

यांनतर उर्वरित कार्यकारणीच्या विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. बैठकीचे प्रास्ताविक श्रीधर ढगे, सूत्र संचालन प्रा. प्रफुल्ल खंडारे, तर आभार अमोल गावंडे यांनी मानले.

### बोंडगाव जि.प. शाळेत निरोप समारंभ

**शेगाव :** बोंडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १३ सप्टेंबर रोजी शिक्षकांचा निरोप व स्वागत समारंभ गावकऱ्यांच्या लोकसहभागातून पार पडला. यावेळी एस. डी. पाटील, भालके, राजेंद्र शेंद्रे, एम. डी. घुले व राजेंद्र सोनटक्के या शिक्षकांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. तर डी. एम. काकड व वर्षा डीगांबर काकड यांचे नियुक्तिबद्दल स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रवीण ईलामे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सरपंच व शिवसेना तालुकाप्रमुख रामा थारकर उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी शाळेच्या विकासासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शाळेच्या कार्यात योगदान दिलेल्या शिक्षकांचा सत्कार झाला.

## खाटू श्याम भजन संध्या आणि निशान यात्रा उत्साहात

**खामगाव / प्रतिनिधी**

शहरात श्री श्याम भक्तांकडून येथील कॉटन मार्केट यार्ड मध्ये भजन संध्या आणि श्री श्याम निशान यात्रा १४ सप्टेंबर रोजी काढण्यात आली. या निशान यात्रेत हजारोंच्या संख्येने खाटू श्याम भक्तांनी सहभाग घेतला होता. तसेच आयोजित भजन संध्यामध्येही सुप्रसिद्ध गायकांच्या सुरेल भजनाचा अनेकांनी लाभ घेतला.

सकाळी १० वाजता सुरू झालेली निशान यात्रा कॉटन मार्केट यार्ड, मुख्य मार्केट रस्ता, निशांत टॉवर, गांधी चौक, फरशी मार्गे पुढे जात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत अखेर खाटू श्याम मंदिर सराफा येथे पोहोचली. 'श्याम बाबा की जय' च्या गजरात भगवे व रंगीबेरंगी निशाण घेऊन निघालेल्या या यात्रेत



भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. मंदिरात आरती करून सर्वांनी दर्शनाचा लाभ घेतला. यात्रेनंतर भाविकांसाठी साबुदाणा उसळ व अल्पोपहाराची व्यवस्था होती. या निशान यात्रेचे शहरात ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. तसेच संध्याकाळी कृउबास मार्केट यार्ड येथे भव्य भजन संध्या पार पडली. मध्यप्रदेशातील मंदसौर येथील गायिका अधिष्ठा-अनुश्का तसेच अमरावतीचे गायक गोपाल हारे यांनी श्यामबाबांची मधुर भजने सादर करून वातावरण भक्तिरसाने भारावून टाकले. सुरेल भजनांवर भाविक थिरकताना दिसले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन कॉटन मार्केट श्यामभक्त मंडळाने केले.

## 'उत्पन्न करातील अलिकडच्या सुधारणा' या विषयावर मार्गदर्शन

**खामगाव / प्रतिनिधी**

उत्पन्न कर सवलत श्रेणी विभाग नागपूरच्या वतीने कर पात्रता आणि सूट तरतुदी तसेच ट्रस्ट आणि धर्मादाय संस्थांशी संबंधित उत्पन्न करातील अलिकडच्या सुधारणा या विषयावर आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम अंजुमन कॅम्पस नांदुरा रोड खामगाव येथे १७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास घेण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक व स्वागत भाषण सवलत विभाग नागपूरचे आयकर अधिकारी अशोक सी. वाडेकर हे राहणार आहेत. तर तांत्रिक सादरीकरण आयकर निरीक्षक प्रवीण देशमुख हे करणार आहेत.

तर ट्रस्ट आणि धर्मादाय संस्थांच्या फाइलिंग समस्यांवरील परस्परसंवादी सत्र आयकर अधिकारी गौतम कुमार हे घेणार आहेत.

या कार्यक्रमाला उत्पन्न कर निरीक्षक रविशंकर आणि कार्यालयीन अधीक्षक अमित दास उपस्थित राहणार आहेत. या मार्गदर्शन शिबिरांमध्ये संस्थाध्यक्ष, मुख्याध्यापक आणि शाळेचे लिपिक यांनी उपस्थित राहण्याचे, आवाहन राष्ट्रीय शैक्षणिक संस्था दुसरबीडचे अध्यक्ष इरफानअली शेख यांनी केले आहे.

## पुलाअभावी शेतकऱ्यांचा जीवघेणा प्रवास !

**ढोरपगाव / प्रतिनिधी**

खामगाव तालुक्यातील ढोरपगाव येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सिध्दगंगा नदी ओलांडावी लागत आहे. सध्या सततच्या पावसामुळे नदीला पुराचे स्वरूप आले असून पुला अभावी शेतकऱ्यांना जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

सध्या तालुक्यात सततधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा शेतात जाण्यासाठी रस्ता आणि पुला अभावी शेतात जाण्याचा संपर्क तुटला आहे. धो धो पावसामुळे नव्हे तर बारा महिनेही शेतकऱ्यांना तसेच मजुरांना शेतात जाण्याकरिता जीवघेणी कसरत करावी लागत आहे. तरीपण शेतात पोहोचणे रस्ता आणि पुला अभावी अशक्य झाले आहे. या परिसरातील शेतकऱ्यांचे



हजारो हेक्टर क्षेत्र हे सिद्धगंगा नदीच्या पलीकडे आहे. त्याचप्रमाणे बरेच शेतकऱ्यांचे गुरेढोरे तसेच दुग्ध व्यवसायिकांचे ढोरे हे या सिद्धगंगा नदीच्या पलीकडे आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना शेतीसोबतच दुग्ध व्यवसाय दूध ने आण करण्याकरिता कठीण झाले आहे. तसेच सततच्या पावसामुळे जनावरांची चाऱ्याअभावी उपासमार होत आहे. अशी दुर्लभ परिस्थिती येथील शेतकऱ्यांसोबत दिसून येत आहे. सदर नदीवर पुला अभावी एका बारा वर्षीय मुलाचा बळी गेला होता. हे हजारो हेक्टर जमीन, गोरढोरांच्या चारा, पाण्याकरिता आणि दुग्ध व्यवसाय करण्याकरिता मजुरांच्या मजुरीसाठी शेतात शेती आणि मजुरी करण्याकरता येथील स्थानिक शेतकऱ्यांची गावाकरिता पाच ते सहा पुलांची मागणी होत आहे. तरी शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीचा विचार करून शासनाने त्वरित पुलाची निर्मिती करावी, अशी मागणी

## 'अतिक्रमण धारकांविरूध्द कारवाई करा'

**खामगाव :** गणेशपूर येथील वार्ड क्र. ३ मधील ग्रा.पं. च्या जागेत अवैधरित्या घरकुल बांधकाम केल्या जात आहे. सदर बांधकामावर कारवाई करावी, अन्यथा उपोषण करू, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते वलन मांडवे यांनी केले आहे. तालुक्यातील गणेशपूर येथील रहीवासी तथा सामाजिक कार्यकर्ते वलन छगनराव मांडवे यांनी १६ सप्टेंबर रोजी ग्रामसेवक व सरपंच गणेशपूर ग्रामपंचायत यांना निवेदन दिले. त्यामध्ये नमूद केले आहे की, वार्ड क्र. ३ मधील घरकुल योजनेचे लाभार्थी स्वःमालकीच्या जागेत तसेच ग्रामपंचायतच्या जागेत अवैधरित्या घरकुल बांधकाम करीत आहेत. तसेच गावामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. ग्रामपंचायतने याकडे लक्ष देऊन अतिक्रमण धारकांविरुध्द कारवाई करावी, अन्यथा ५ ऑक्टोबर पासून उपोषण करण्याचा इशाराही निवेदनात दिला आहे.

### गावकऱ्यांच्या आरोग्याला धोका, ग्रामसेवकाचे दुर्लक्ष

# सुनगावात ठिकठिकाणी साचले पाण्याचे डबके

**जळगाव जामोद / प्रतिनिधी**

तालुक्यातील सूनगाव येथे मोठ्या प्रमाणात घाणीचे सम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात सापडले असून याकडे स्थानिक ग्रामपंचायतीचे आणि ग्रामसेवकाचे दुर्लक्ष होतांना दिसून येत आहे.

जळगाव जामोद तालुक्यातील सूनगाव ग्रामपंचायत हि साफसफाई कामांच्या दृष्टीने उदासीन दिसत असून गावात ठिकठिकाणी पावसाच्या पाण्याचे डबके साचलेले आहे. या साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती झालेली आहे व ठिकठिकाणी गवत हे वाढलेले





आहे. त्यामुळे गावात डासांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यावर तन नाशक फवारणी करावी व गावात धूर फवारणी करावी. गावात मच्छरांचे प्रमाण खूप वाढलेले आहेत. त्यामुळे डायरिया, मलेरिया कॉलरा डेंग्यू इत्यादी प्राणघातक रोगांची लागण होण्याची दाट शक्यता आहे. सद्यस्थितीत या गावामध्ये तापाचे बरेच रुग्ण आढळून येत आहेत. गावातील नागरिकांच्या आरोग्याकडे ग्रामपंचायतने संपूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. मागील दोन वर्षांपासून ग्रामपंचायतकडून गावामध्ये धूर फवारणी झाली नसल्याचे नागरिकांकडून ओरड होत आहे. या तालुक्यातील बऱ्याच ग्रामपंचायकडून गावांमध्ये तन नाशक फवारणी व धुर फवारणी झालेली आहे. त्यातच सतत पाऊस चालू असल्यामुळे गावात पावसाचे पाणी साचून जागोजागी डबके निर्माण झाले आहे. त्यामध्ये डासांची मोठी उत्पत्ती झालेली आहे. त्यामुळे अनेक आजारांनी डोके वर काढले आहे. सूनगाव ग्रामपंचायत कडून नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा पुरविण्यात येत नाही. पिण्याचे शुद्ध पाणी पुरवठा व धूर फवारणी तर होतच नाही. या बाबीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

### आरोग्य विभागाच्या पत्राला केराची टोपली

■ गावातील मुलभूत सुविधांबाबत नागरिकांनी ओरड करताच आरोग्य विभागाने ८ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतला या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी पत्र दिले परंतु ३ ते ४ दिवस होऊन सुध्दा ग्रामसेवक हितेंद्र जोशी यांनी कोणतीच उपायोजना न करता पत्राला सरळ केराची टोपली दाखविल्याचे दिसून येत आहे. याबाबत पंचायत समिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी. अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जाहीरनामा

मी सोनल हेमंत गांधी रा.विरार ठाणे जाहीरपणे कळविते की, माझ्या मौजे तरोडा डी ता.शेगांव येथील शेत गट नं. १५ या शेत जमिनीच्या ७/१२ अभिलेखा मध्ये माझे नांव सोनल रामेश्वर राठी असे नमुद आहे. परंतु माझे नांव आधार, रेशनकार्ड पॅनकार्ड व इतर कागदपत्रावर सोनल हेमंत गांधी असे आहे. मी सोनल रामेश्वर राठी ऐवजी सोनल हेमंत गांधी असे राज पत्रानुसार दुरस्त करुन मिळण्या साठी मी मा.तहसिलदार शेगांव यांचे कार्यालयात अर्ज सादर केला आहे. सदरचे नांव राज पत्रानुसार दुरस्त करण्याबाबत ज्या कोणाची काही हरकत/ आक्षेप असल्यास १५ दिवसाचे आत तहसिल कार्यालय शेगांव येथे दाखल करावे विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत अर्ज विचारात घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी
सोनल हेमंत गांधी

महाराष्ट्र शासन
तहसिल कार्यालय लोणार
क्र.कावि/जमृनो/मह.सहा/ ४१८/२०२५
दि.- १५/०९/२०२५

## जाहीर नोटीस

**विषय:-** जाहिर नोटिस प्रसिध्द करणेबाबत.
**संदर्भ:-** जन्म / मृत्यु नोंदणी कायदा-१९६९ चे कलम १३-(३)
**अर्जदार:-** सुरेखा रामभाऊ राठोड रा.सावरगाव मुंढे ता.लोणार जि.बुलडाणा
- **विरुध्द** -
**गैरअर्जदार :-** १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोणार
२. सचिव, ग्रामपंचायत, सावरगाव मुंढे ता.लोणार

याव्दारे जाहिर नोटिसव्दारे कळविण्यात येते को, जन्म /मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम-१३(३) प्रमाणे सुरेखा रामभाऊ राठोड यांच्या जन्माचे नोंदीबाबत गैर अर्जदार यांना आदेश होणेबाबत अर्जदार यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अर्जात अर्जदार नामे सुरेखा रामभाऊ राठोड यांचा जन्म दिनांक १६/०५ /१९८९ रोजी मोजे सावरगाव मुंढे ता. लोणार येथे झाला आहे व त्यांच्या जन्माची नोंद केली नाही, असे नमूद केले आहे.

उक्त नोंदीबाबत कोणाला काही हरकत घ्यावयाची असेल त्यांनी आपला हरकत अर्ज या कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासून १५ दिवसाच्या आत कार्यालयीन वेळत सुट्टीचे दिवस वगळून सादर करावे, विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्वांना नोंद घ्यावी.

वरील प्रमाणे जाहिर नोटिस देण्यात येत असून त्यानुषंगाने सदर प्रकरणातील जाहिर नोटिस आपल्या वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यासाठी पाठविण्यात येत आहे. त्यासाठी लागणारी आवश्यक ती शुल्क संबंधित पक्षकार/विधीज्ञ यांचेकडून भरुन घेण्यात येवून सदर नोटिसची जाहिर प्रसिध्दी देण्यात यावी. सदर नोटिस सुस्पष्ट व ठळक वाचणीय स्वरुपात जाहीर करावी, तसेच सदर वृत्तपत्राची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरी व शिक्यासह दिले आहे.

शिक्का
स्वाक्षरी
तहसिलदार, तथा
तालुका दंडाधिकारी, लोणार

दैनिक
महाभूमि

# वाशिम भूमि

बुधवार । १७ सप्टेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### समय कॉम्प्युटरला पुरस्कार प्रदान

**वाशिम :** स्थानिक पातळीवर संगणक शिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत असलेल्या समय कॉम्प्युटर अँड कोचिंग क्लासेस, वाशिम या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी भारतातील टॉप १०० संगणक प्रशिक्षण संस्था म्हणून स्थान मिळाले आहे. या कामगिरीची दखल घेऊन संस्थेला 'भारतातील टॉप १०० संस्था पुरस्कार' या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. नागपूर येथील सोहळ्यात अभिनेत्री सायली भगत, एआयसीपीई नागपूरचे डायरेक्टर शरद तावारी व कविता तावारी यांच्या हस्ते हा पुरस्कार समय कॉम्प्युटर अँड कोचिंग क्लासेसचे संचालक कल्पेश राऊत यांना प्रदान करण्यात आला. हा राष्ट्रीय पुरस्कार संस्थेसाठी व वाशिमकरांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

### विद्युत शॉकने म्हैस दगावली

**मानोरा:** देवठाणा येथील शेतकरी श्रीराम रामजी जाधव यांच्या मालकीची म्हैस १४ सप्टेंबर रोजी विद्युत शॉकने मृत्यू पावली. ग्रामपंचायतच्या नळयोजनेच्या विहिरीजवळ असलेल्या तुटक्या विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने ही दुर्घटना घडली. या घटनेत शेतकऱ्याचे सुमारे १ लाख २५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच महावितरण, पशुवैद्यकीय विभाग व पोलिसांनी पंचनामा केला असून पीडित शेतकरी कुटुंब शासनाकडून आर्थिक मदतीची मागणी करत आहे.

### बंजारा समाजाचा आज मोर्चा

**मानोरा:** बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटियरनुसार अनुसूचित जमातीच्या धर्तीवर आरक्षण मिळावे, या मागणीसाठी सकल बंजारा समाज व विविध सामाजिक संघटनांकडून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा १७ सप्टेंबर रोजी आठवडी बाजाराच्या दिवशी होणार असून, आयोजकांनी मानोरा तालुक्यातील समाजबांधवांना हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### समृद्धी मार्गावर ट्रकला अचानक आग

**वाशिम :** वनोजा इंटरचेंजजवळ सोमवारी मध्यरात्री नागपूरवरून मुंबईकडे निघालेल्या ट्रकला अचानक आग लागली. काही क्षणातच वाहनाने पेट घेतल्याने घटनास्थळी गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, महामार्ग पोलिस तसेच स्थानिक नागरिक तातडीने मदतीस धावले. ट्रकमध्ये निर्माण झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने या घटनेत असून कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### ढगफुटी सदृश्य पाऊस, पिकांचे नुकसान; नाल्यात वाहून ३२ वर्षीय युवकाचा मृत्यू

# मुसळधार पावसाचे थैमान ; सहा मंडळात अतिवृष्टी

**वाशिम / प्रतिनिधी**

जिल्ह्यात अतिवृष्टीची मालिका सुरूच असून सोमवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसाने कहर केला. वाशिमसह काही भागात ढगफुटी सदृश्य पाऊस बरसला. नदीनाल्यांना आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले, तर शेलगाव बगाडे येथील ३२ वर्षीय युवक नाल्यात वाहून गेल्याने त्याचा मृत्यू झाला.

सोमवारी सायंकाळी पाच वाजल्यानंतर तब्बल दीड ते दोन तास मुसळधार पाऊस बरसला. १५ सप्टेंबरच्या सकाळी १० वाजेपासून ते १६ सप्टेंबर सकाळी १० वाजेपर्यंतच्या २४ तासांत ३२.०६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम आधीच डळमळीत झाला होता. सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आणि हळद यांसारख्या प्रमुख पिकांवर पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. विशेषत: ऑगस्टमधील मुसळधार पावसामुळे नदीकाठच्या शेकडो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली होती. नुकसानीतून शेतकरी सावरण्याआधीच सप्टेंबर महिन्यातील जोरदार पावसाने परिस्थिती आणखी बिकट केली आहे.

सततच्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या आशा अक्षरशः पाण्यात गेल्या आहेत. कापसावर रोगराईचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. तर सोयाबीन शेंगा भरताना झालेल्या पावसामुळे पीक पिवळे पडत असून उत्पादनावर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

**तालुकानिहाय पाऊस**
**(१६ सप्टेंबर सकाळी १० पर्यंत)**






मंगरूळपीर : तालुक्यातील शेलुबाजार येथील मुख्य चौकात मुसळधार पावसामुळे पाणी शिरले. भारतीय स्टेट बँक, सेंट्रल बँक तसेच खाजगी दुकाने पाण्याखाली गेल्याने गोंधळ उडाला.



## 'त्या' तरुणाचा दुसऱ्या दिवशी आढळला मृतदेह

**शिरपूर जैन/ प्रतिनिधी**

परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने सोमवारी संध्याकाळी कहर केला. शेलगाव बगाडे येथील रवी नंदू राऊत (वय ३५) हा तरुण बोंबली नामक नाल्याचा रस्ता पार करताना प्रचंड पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचा मृतदेह नाल्याच्या काही अंतरावर आढळून आला. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

सोमवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास तब्बल दोन तासांत ८२ मिमी पावसाची नोंद झाली. परिणामी परिसरातील सर्व नाल्यांना पूर आला. शेलगाव बगाडे रस्त्यावरील नाल्यावरून तब्बल चार फूट पाणी वाहत होते. याचदरम्यान राऊतने नाला पार करण्याचा प्रयत्न केला. मात्र तोल जाऊन तो पुराच्या प्रवाहात वाहून गेला. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, नाल्यात पाणी असल्याने गावकऱ्यांनी त्याला पाण्यातून न जाण्याचा सल्ला दिला होता. तरीही त्याने प्रयत्न केला आणि प्राण गमावला.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्थानिक नागरिकांनी शोध घेतला असता त्याचा मृतदेह नाल्याच्या जवळच सापडला. या घटनेची माहिती शिरपूर पोलिसांना दिली असून, त्यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. रवी राऊत यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले, तसेच आई-वडील असा आप्तपरिवार आहे.

### या मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद

- जिल्ह्यात ६ मंडळात अतिवृष्टी नोंद झाली असून वाशिम मंडळामध्ये ७२.०५ मिमी, नागठाणा ९९ मिमी, कोंडाळा ६५.०३ मिमी, शिरपूर जैन ८२ मिमी, करंजी ९९ मिमी आणि पाती ७२.०५ मिमी इतक्या प्रमाणात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. याशिवाय इतर मंडळांमध्येही जोरदार पाऊस झाला.

## साईश्रद्धा संस्थानच्या विकासासाठी निधीची मागणी

**मंगरुळपीर / प्रतिनिधी**

शेलुबाजार येथील साईश्रद्धा संस्थानच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी संस्थानच्या वतीने विधान परिषदेचे आमदार वसंतराव खंडेलवाल यांच्याकडे करण्यात आली आहे.

भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हे तिर्थक्षेत्र 'ब' दर्जा प्राप्त असून, संस्थानाला शासनाकडून विकासासाठी निधी मिळाल्यास भाविकांसाठी सुविधा वाढविणे आणि विकासात्मक कामे गतीने पुढे नेणे शक्य होणार आहे. संस्थान परिसरात मुबलक जागा उपलब्ध असल्याने विकास धोरण ठरवून त्या अनुषंगाने पावले उचलण्याची योजना आहे. यासाठी संस्थानच्या अध्यक्ष मोहन राऊत, अनिल वाडेकर, अतुल कुलकर्णी, जलील खान यांच्यासह प्रतिनिधींनी आमदार खंडेलवाल यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. त्यांनी निवेदनाद्वारे संस्थानच्या विकासासाठी निधीची मागणी देखील सादर केली. आमदार खंडेलवाल यांनी संस्थानच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आणि संस्थेकडून आयोजित सत्कार कार्यक्रमात उपस्थित राहण्याचेही मान्य केले.



## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला कृषी विभागाचा आढावा

### नैसर्गिक शेती, खत उपलब्धता, महाविस्तार ॲपवर भर देण्याचे निर्देश

**वाशिम / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कृषी विभाग आणि आत्मा अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, कृषी उपक्रम व कार्यक्रमांचा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी १६ सप्टेंबर रोजी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात झालेल्या या बैठकीत नैसर्गिक शेतीचा प्रचार, खत उपलब्धता, महाविस्तार ॲपचा वापर आणि शेतकरी संवाद यावर त्यांनी विशेष भर दिला. जिल्हाधिकाऱ्यांनी रासायनिक खतांची उपलब्धता जिल्ह्याच्या संकेतस्थळावर नियमितपणे प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले. बायो फर्टिलायझरच्या वापराबाबत व्यापक जनजागृती करण्याची सूचना केली. तसेच शेतकऱ्यांना महाविस्तार ॲपचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्यावर त्यांनी भर दिला. कृषी समृद्धी योजनेतील निधी स्थानिक गरजांनुसार खर्च करण्यात यावा, तसेच शेतीशाळांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधावा, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत चिया पिक, गहू, हरभरा लागवड, कार्यशाळा, प्रात्यक्षिके, शेतकरी-शेतीशाळा, खरेदीदार-विक्रेता संमेलन, तांत्रिक मार्गदर्शन, कृषी विस्तार आणि बाजारपेठेची माहिती या विषयांवरही आढावा घेण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन २०२५-२६, तसेच आत्मा अंतर्गत केंद्र शासनाचे आवंटन आणि जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ याबाबत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. वाशिम शेती शिल्प कृषी विपणन कक्ष, वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा, जलतारा उपक्रम, वत्सगुल्म स्मार्ट पेरणी स्पर्धा यांचा आढावा घेऊन अधिकारी वर्गास आवश्यक दिशा-निर्देश देण्यात आले. विविध योजनांच्या अंमलबजावणीवर देखील चर्चा झाली. या बैठकीस प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, कृषी विकास अधिकारी अभिजित देवगीरकर, सर्व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

## कारंजा शहरात सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

**कारंजा / प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीत पितृपंधरवाडा हा आपल्या पूर्वजांच्या स्मरणाचा आणि श्राद्धाचा कालखंड मानला जातो. याच पार्श्वभूमीवर कारंजा येथील कामाक्षा माता सदाचार सभा आणि शिवशक्ती सदाचार सभाच्या महिला कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य सेनानी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन केले.

१४ सप्टेंबर रोजी महिलांनी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याजवळ स्वच्छता करून परिसर सजवला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले आणि विश्वमांगल्य सभेच्या प्रतिमेला हार अर्पण करून शक्तिगानाने सभा सुरू करण्यात आली.

कारंजा शाखेच्या उपाध्यक्षा वैशाली नंदे यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर प्रकाश टाकत, त्यांचे ध्येय, भारताला सशस्त्र संघर्षातून स्वातंत्र्य मिळवून देणे यावर माहिती दिली. सदाचार सभेच्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमासाठी मेहनत घेतली, ज्यात सोनाली लक्रस, मनीषा जोशी, शितल काकडे, मेघा गुल्हाने, गायत्री पापडे, सोनल पापडे, एकता गायकवाड, प्रमिला जिरापुरे, शिला गुलवाडे, आचल कश्यप, पियुषा भोयर, प्रतीक्षा देसाई, मोना देशपांडे यासह इतर कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## भाजपा वाशिम शहर मंडळाची सेवा पंधरवडा कार्यशाळा उत्साहात

**वाशिम / प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत भाजपातर्फे राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवडा उपक्रमाचा भाग म्हणून वाशिम शहर मंडळाची कार्यशाळा १५ सप्टेंबर रोजी मंत्री पार्क येथील जनसेवा कार्यालयात उत्साहात पार पडली.

कार्यशाळेत आमदार श्याम खोडे, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, सेवा-सुशासन समितीचे जिल्हा संयोजक सुभाष नानवटे, माजी आमदार पुरुषोत्तम राजगुरू, जिल्हा महामंत्री गणेश खंडाळकर व संगीताताई इंगोले यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वाशिम शहर तसेच जिल्ह्यातील महिला व पुरुष पदाधिकारी, विविध मोर्चांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपस्थित सर्वांनी मार्गदर्शनाचा लाभ घेत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले. या कार्यशाळेत निर्धार व्यक्त केला गेला की, सेवा पंधरवाडा उपक्रम वाशिम शहरात जोमाने, शिस्तबद्धपणे राबविला जाईल.



## धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला २ महिन्यांचा कारावास

**शिरपूर जैन / प्रतिनिधी**

बुलढाणा अर्बन पतसंस्थेला दिलेला धनादेश अनादर झाल्याप्रकरणी रामराव खाडे यांना मालेगांव न्याय दंडाधिकारी यांनी दोषी ठरविले असून २ महिन्यांचा साधा कारावास व नुकसानभरपाई म्हणून ३ लाख ९८ हजार रुपये पतसंस्थेला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जर आरोपीने भरपाई न दिल्यास, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७(२) अंतर्गत त्याला आणखी २ महिने कारावास भोगावा लागेल, असे आदेश १० सप्टेंबर २०२५ रोजी पारीत झाले. बुलढाणा अर्बन को-ऑप कडीट सोसायटी मर्या., शिरपुर जैन शाखेकडून माहिती नुसार, रामराव खाडे यांनी १६ डिसेंबर २०१७ रोजी ८, लाख रुपयांचे वैयक्तिक कर्ज घेतले होते. हा कर्ज भरणा न केल्यामुळे खाते थकीत झाले. वसुली दरम्यान, रामराव खाडे यांनी २४ सप्टेंबर २०२१ रोजी ३, लाख ९८ हजार रुपयांचा धनादेश दिला, परंतु बँकेत रक्कम उपलब्ध नसल्याने धनादेश अनादर झाला. नोटीस पाठवल्यानंतरही आरोपीने धनादेश भरून कर्ज फेडी केली नाही. परिणामी, बुलढाणा अर्बन पतसंस्थेने फौजदारी खटला दाखल केला. न्यायालयीन कार्यवाहीनंतर आरोपी दोषी ठरला व सदर शिक्षा व नुकसानभरपाईचे आदेश पारीत झाले. पतसंस्थेच्या वतीने ॲड. आशिष गोलेच्छा यांनी युक्तीवाद केला.

### तीन टप्प्यात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणार:जिल्हाधिकारी

# शेतकरी समस्या सोडवण्यासाठी 'सेवा पंधरवडा'

**वाशिम / प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान 'सेवा पंधरवडा' तीन टप्प्यात साजरा केला जाणार आहे.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या माहितीनुसार, या पंधरवडेत महसूल व वने विभागामार्फत नागरिकांना दिलासा देण्याचे उपक्रम राबविले जातील. सेवा पंधरवडया निमित्त लोकाभिमुख, पारदर्शक व कार्यक्षम महसूल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने महसूल व वने विभागामार्फत १७ ते २२ सप्टेंबर, २३ ते २७ सप्टेंबर आणि २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर अशा तीन टप्प्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. सेवा पंधरवडा दरम्यान राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची अंमलबजावणी करीता जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

नागरिकांनी रस्ते, घरं, शेतकरी समस्या किंवा इतर तक्रारी प्रशासनाला कळवाव्यात. सेवा पंधरवडा हा योजना लाभ घेण्याचे, माहिती मिळविण्याचे व आपले प्रश्न मांडण्याचे उत्तम व्यासपीठ आहे. सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

### शेतरस्ते, घरकुलांचे प्रश्न मार्गी लागणार

- **पहिला टप्पा :** पाणंद रस्त्यांची विशेष मोहीम

पहिल्या टप्प्यात गावांच्या पाणंद किंवा शिवरस्त्यांचे सर्वेक्षण, क्रमांक देणे, नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद करणे व शेतरस्त्यांच्या सीमांकनासह तक्रारींचे निराकरण करण्यासाठी रस्ता अदालतांचे आयोजन करण्यात येणार आहे.

- **दुसरा टप्पा :** 'सर्वांसाठी घरे' उपक्रम

दुसऱ्या टप्प्यात शासन निर्णयानुसार घरकुल लाभार्थ्यांना घर देणे, अतिक्रमण नियमानुसार सोडविणे व पात्र लाभार्थ्यांना पट्टेवाटप करणे हे उद्दिष्ट आहे.

- **तिसरा टप्पा :** नाविन्यपूर्ण उपक्रम व जनसंवाद

तिसऱ्या टप्प्यात जिल्ह्यात जनसंवाद/आदिसेतू अभियान राबवून मंडळस्तरावर विशेष शिबीरांचे आयोजन, ७/१२ अद्यावत करणे, महिला वारस नोंदी अद्यावत करणे, प्रलंबित प्रकरणांची चौकशी व शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणे यासारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## महेंद्र राठोड यांची निवड

**मानोरा / प्रतिनिधी**



भाजपाच्या पोहरादेवी मंडळाचे सरचिटणीस म्हणून महेंद्र जेसू राठोड यांची नेमणूक करण्यात आली आहे. पोहरादेवी मंडळात आसोला, शेंदुर्जना अढाव, फुलउमरी आणि पोहरादेवी जिल्हा परिषद सर्कलचा समावेश आहे. सरचिटणीस राठोड यांनी मंडळातील सर्व गावे, तांडे, पाड्यांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये चेतना निर्माण करून संघटन मजबूत करण्यावर लक्ष ठेवण्याचे आश्वासन दिले. यासाठी आ. सईताई प्रकाश डहाके, मंडळ अध्यक्ष गणेश जाधव व इतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनात कार्य करणार असल्याचेही ते म्हणाले.

## मानोरा तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस ; पिके पाण्याखाली

### पुराच्या पाण्याने शेतजमीन व पिकांचे नुकसान

**मानोरा / प्रतिनिधी**

तालुक्यातील सहा महसुल मंडळांमध्ये १६ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसाने प्रचंड कहर केला. भुली व शेदुर्जना परिसरात पावसाने शेतकऱ्यांची शेती तलावासारखी केली असून सोयाबीन आणि कपाशीचे पिके पाण्यामध्ये बुडाली आहेत. खोराडी नाला आणि अरुणावती नदी दुथडीभरून वाहत आहेत. सततच्या पावसामुळे नाल्यांचे पाणी शेतात घुसल्याने अनेक शेतकऱ्यांची जमीन आणि पिके नष्ट झाली आहेत. तालुक्यातील रस्तेही खरडून गेले आहेत, तर काही गावांना जोडणारे लहान पूल वाहून गेले असल्याने गावकऱ्यांना वाहतुकीसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच तालुक्यातील लहान-मोठी धरणे १०० टक्के भरली असून, सांडव्या मधून पाणी वाहत आहे. तालुक्यातील सहा महसुल मंडळांमध्ये मुसळधार पावसामुळे नदी व नाल्यांचा पुर शेतात घुसत असल्याने तुर, सोयाबीन आणि कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाने पीक विम्याच्या निकषांत बसवून तालुक्यातील शेतकऱ्यांना विम्यासह भरीव मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.



## न्यूज ब्रीफ

### तरुणांना कौशल्य स्पर्धेकरिता संधी

**बुलढाणा** : जगातील सर्वांत मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा दर दोन वर्षांनी घेण्यात येत असून ही जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई, चीन येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची संधी असून तरुणांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करुन या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जिल्हा स्तरीय रायफल शुटिंग स्पर्धा उत्साहात

**बुलढाणा** : जगातील सर्वांत मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा दर दोन वर्षांनी घेण्यात येत असून ही जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई, चीन येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची संधी असून तरुणांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करुन या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सील तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने ६३ विविध क्षेत्रांमध्ये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर स्किल कॉम्पीटीशनचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे देशपातळीवरून जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी संकेतस्थळावर भेट देऊन ३० सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे.

### महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**बुलढाणा** : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अकोला कार्यालयाच्या अधिनस्त अकोला, वाशीम व बुलढाणा या तीन जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, कायम विना अनुदानित सर्व मान्यता प्राप्त महाविद्यालयांना आणि सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रातील भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व अन्य शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेणेसाठी ऑनलाईन महाडीबीटी प्रणालीवर नवीन अर्ज व नुतनीकरणाचक अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे.

'रेशीम विभाग आपल्या दारी' अभियान...

# एक एकर वृक्ष लागवडीसाठी शेतकऱ्यांना मिळणार २ लाख १२ हजाराची मजुरी

**बुलढाणा / प्रतिनिधी**

जिल्हा रेशीम कार्यालयाकडून 'रेशीम विभाग आपल्या दारी' या मोहिमेला सोमवारी प्रारंभ झाला. योजनेत मनरेगा अंतर्गत एक एकर वृक्ष लागवड जोपासना करण्यासाठी २ लाख १२ हजार ७८४ मजुरी तीन वर्षात दिली जाणार आहे.

जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत रेशीम विकास योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापूर्वी रेशीम योजना राबविण्यासाठी कार्यालयाकडे ५०० रुपये प्रती एकर प्रमाणे नोंदणी केली होती.



### रेशीम कोष निर्मिती करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

■ बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ या योजनेत सहभाग घेता येईल. तुती वृक्ष लागवडीसाठी १ एकरसाठी ४५ हजार, सिंचन व्यवस्थेसाठी ४५ हजार संगोपनगृह बांधकामासाठी २ लक्ष ४३ हजार ७५०, संगोपन साहित्यासाठी ३७ हजार ५० आणि निर्जंतुकीकरण औषधीसाठी ३ हजार ७५० काम पूर्ण झाल्यावर देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी पर्यात्मक तुती शेतीशी निगडीत रेशीम उद्योग करुन रेशीम कोष निर्मिती करण्याचे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### बुलढाणा जिल्ह्याला २० लक्ष तुती लागवडीचे उद्दिष्ट

■ मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी या पावसाळ्यात १० कोटी वृक्ष लागवड पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी उद्दिष्ट दिले आहे. त्यामध्ये या तुती वृक्ष लागवडीची गणना होणार आहे. रेशीम संचालनालयास ४ कोटीचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यापैकी २० लक्ष (३५० एकर) तुती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट बुलढाणा जिल्ह्यास देण्यात आले आहे.

मात्र, काही कारणास्तव तुती लागवड केली नाही व रेशीम उद्योग सुरु केला नाही. त्यांना त्यांच्या घरी जावून रेशीम योजनेची माहितीपत्रक व पुन्हा रेशीम उद्योग सुरु करण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे. तसेच त्यांनी तुती लागवड त्यावेळी का केली नाही याबाबत अभिप्राय घेण्यात येणार आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी केले जाते. एका गावातून कमीत कमी ५ शेतकऱ्यांनी ग्रामसभेच्या संमतीने जिल्हा रेशीम कार्यालयाकडे ग्राम रोजगार सेवक यांच्या मार्फत अर्ज करावेत. त्यासाठी प्रती एकर रुपये ५०० नोंदणी शुल्क रेशीम कार्यालयात जमा करावे. मनरेगा अंतर्गत एक एकर वृक्ष लागवड जोपासना करण्यासाठी २ लक्ष १२ हजार ७८४ मजुरी तीन वर्षात दिली जाणार आहे. रेशीम किटक संगोपन गृह बांधकामासाठी मजुरी ६६ हजार ४५६ रुपये तर साहित्यासाठी १ लाख ५३ हजार दिले जाणार आहेत.

### स्वस्थ नारी-सशक्त परिवार विशेष मोहीम

**बुलढाणा** : 'स्वस्थ नारी-सशक्त परिवार' या अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्याविषयी जागरुकता वाढून संपूर्ण कुटुंब निरोगी राहण्यास मदत होणार आहे. त्या निमित्त आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर दरम्यान ''स्वस्थ नारी-सशक्त परिवार'' या विशेष अभियानांतर्गत जिल्ह्यातील महिलांसाठी आरोग्य तपासणी, उपचार व समुपदेशन मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहीमेत महिलांमध्ये एनीमिया, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग तपासणी तसेच सामान्य आरोग्य समस्यांसाठी तपासणी केली जाणार आहे.

याशिवाय किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य जनजागृती, गर्भवती महिलांची तपासणी व आवश्यक तेथे उपचाराची तात्काळ सोय करता येणार आहे. या कालावधीत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये तपासणी शिबिर आयोजित करण्यात येतील.

## हिरकणी प्रतिष्ठानच्या गरबा कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

सहभागी महिला- युवतींचा बोंद्रे परिवाराकडून सत्कार

**चिखली / प्रतिनिधी**

हिरकणी महिला उत्कर्ष प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. हिरकणी परिवारासोबत गरबा उत्सव साजरा करण्यासाठी सुरु असलेल्या कार्यशाळेला चिखली शहर व परिसरातील महिला व युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



गरबा कार्यशाळेची प्रेरणा व संकल्पना प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा ॲड. वृषालीताई बोंद्रे यांची असून, कार्यशाळा भारतीताई बोंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या कार्यशाळेत पारंपरिक गरबा व दांडिया नृत्याची तालीम दिली जात असून सहभागींच्या उत्साहाने वातावरण रंगतदार झाले आहे. प्रशिक्षक नितीन सर यांच्याकडून सहभागी महिलांना व युवतींना बॉलीवूड गरबा, चारसा गरबा तसेच इतर विविध प्रकारचे पारंपरिक आणि आधुनिक गरबा शिकवले जात आहेत. प्रशिक्षकांकडून नृत्याचे तंत्र, पद्धती, हालचालींचा समन्वय आणि तालावर नियंत्रण यांचे बारकावे प्रत्यक्ष सरावातून शिकवले जात आहेत. विशेष म्हणजे महिलांबरोबरच मुलींचा मोठ्या संख्येने सहभाग दिसून येत असून नवरात्र उत्सवात आपले नृत्य अधिक आकर्षक व्हावे यासाठी सर्वजण मनोभावे सराव करत आहेत.

हिरकणी महिला उत्कर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा वृषालीताई बोंद्रे, भारतीताई बोंद्रे यांनी गरबा कार्यशाळेला भेट देवून सहभागी झालेल्या १५० महिला युवतींचा सत्कार केला. याप्रसंगी वृषालीताई बोंद्रे म्हणाल्या की, या उपक्रमामुळे सांस्कृतिक परंपरेला चालना मिळत आहे. महिलांसाठी कलात्मक व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याचे आत्मीक समाधान लाभले आहे. गरबा कार्यशाळा १३ सप्टेंबर पासून सुरु झाली असून २३ सप्टेंबर पर्यंत असणार आहे. यात सर्व वयोगटातील उत्साही महिला व युवतींनी सहभागी व्हावे असे आवाहनही हिरकणी महिला उत्कर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा वृषालीताई बोंद्रे यांनी केले आहे.

## लोणार येथे आज मूल्यांकन मंथन एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

आ.खरात यांच्या संकल्पनेतून युवक बिरादरी व उत्कर्ष फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**लोणार / प्रतिनिधी**

मेहकर- लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कर्ष फाउंडेशन, सिंदखेड राजा आणि राष्ट्रीय व राज्य शासन पुरस्कृत युवक बिरादरी सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने लोणार येथील श्री भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास व सर्वांगीण प्रगतीसाठी मूल्यांकन मंथन एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९:३० ते दुपारी ४:०० या वेळेत होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन आ. खरात



यांच्या हस्ते होणार असून लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वामनराव सांगळे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी युवक बिरादरी भारतचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. सचिन वाकुळकर, उत्कर्ष फाउंडेशनचे सचिव भास्कर गवई, लोणार शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष शांतीलाल गुगलिया, श्री भगवान बाबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र बोरसे उपस्थित राहणार आहेत. युवक बिरादरी भारत ही संस्था देशभरात युवकांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत असून, त्या मालिकेतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या कार्यशाळेद्वारे युवक-युवतींना नेतृत्व क्षमता, आर्थिक साक्षरता, सकारात्मक ऊर्जा आणि व्यक्तिमत्व विकास यांसाठी प्रशिक्षण दिले जाणार आहे.

### विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पारितोषिके

■ तज्ज्ञ प्राध्यापक व प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली १५० गुणांची चाचणी घेण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये प्रथम ५ हजार, द्वितीय ३, तृतीय २ हजार रुपये पारितोषिकाचा समावेश आहे. याशिवाय निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. युवकांनी आपल्या ज्ञानासाठी, आत्मविश्वासासाठी आणि भविष्यासाठी या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. सचिन वाकुळकर, पुरुषोत्तम बोर्डे, प्रा. गजानन खरात, प्रा. विठ्ठल भानुसे यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे.

## डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला येथे शिवार फेरीचे आयोजन

शिवारफेरीचा लाभ घेण्याचे कृषी विज्ञान केंद्राचे आवाहन

**बुलढाणा / प्रतिनिधी**

विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्य साधून यावर्षी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला यांची शिवार फेरी २० ते २२ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन २० सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या शिवार फेरीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शेतकरी, संशोधक, धोरणकर्ते व उद्योगधंदे भागधारक आदींना कृषी तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करण्यासाठी,अत्याधुनिक कृषी पद्धतीबद्दल जाणून घेण्यासाठी व शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल पद्धतीची खात्री करून पीक उत्पादकता वाढवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आहे. भव्य स्वरुपात कृषी उत्पादन तंत्रज्ञानाचे थेट प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके पाहण्याची आणि कृषी शास्त्रज्ञांशी चर्चा करण्याची संधी शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी दिलेली आहे.

या शिवार फेरीच्या कार्यक्रमात शेतकऱ्यांची एकाच वेळी गर्दी होऊ नये म्हणून बुलढाणा जिल्ह्यासाठी नियोजित असलेल्या दिवशी म्हणजेच २० सप्टेंबरला जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या शिवार फेरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन बुलढाणा कृषी विज्ञान केंद्र प्रमुख डॉ.अमोल एस. झापे यांनी केले आहे.

### बाल शिवाजी कॉन्व्हेंट मध्ये आजोबा - आजी दिन साजरा

**बुलढाणा / प्रतिनिधी**

बाल शिवाजी कॉन्व्हेंट बुलढाणा येथे आजोबा -आजी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे कमिटी सदस्य पठाण तर प्रमुख उपस्थिती मध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका पाटील व पर्यवेक्षक जोशी उपस्थित होत्या.

शाळेमध्ये आलेल्या आजोबा आजी मधूनच त्यांचे प्रतिनिधी म्हणून बाहेकर दांपत्य यांना सन्मान देण्यात आला. तर कार्यक्रमाला आलेल्या सर्व आजोबा आजींचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. उपस्थित असलेल्या सर्व पालकांनी व आजोबा आजींनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. एका आईने गाणे म्हणून सर्वांना भावूक केले. तर अध्यक्षीय भाषणात एकत्रित कुटुंब पद्धतीचे महत्त्व पठाण यांनी विशदं केले.

## कोऱ्हाळा बाजार शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी प्रकाश पाटील

**मोताळा / प्रतिनिधी**

जि.प.मराठी उच्च प्राथमिक शाळा कोऱ्हाळा बाजार शाळा व्यवस्थापन समितीची निवड सभा नुकतीच पार पडली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सलग चौथ्यांदा प्रकाश पाटील यांची अविरोध निवड झाली आहे.

वर्ग १ ते ८ असलेल्या जि.प.शाळेत शासन आदेशाप्रमाणे सर्व घटकांना प्रतिनिधींत्व देण्यात येऊन समिती स्थापन करण्यात आली. कोऱ्हाळा गावाने अवघ्या ३० मिनिटात समिती स्थापन करून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करून एक आदर्श निर्माण केला. कुठलाही वादविवाद न होता अत्यंत खेळीमेळीने समितीची स्थापना करण्यात आली.



समिती अध्यक्ष म्हणून प्रकाश जगन्नाथ पाटील, उपाध्यक्ष एकनाथ शेवाळे व सदस्य म्हणून गजानन मंझा,ज्ञानेश्वर बढे,गजानन बापू सुरडकर,गजानन बोरसे, निकिता रणीत, शुभांगी वाघ, रिता वाघ, विद्या सपकाळ, नंदिनी वाघ, मनीषा किटे यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी मुख्याध्यपाक अशोक राजनकर, शिक्षिका वर्षा राजनकर, शिक्षक संजय निमसे,संजय शिंदे,नितीन राणे, दीपक चौधरी,अजय बावस्कर, महावीर जैन,राजेंद्र पाटील,शशी शिराळ, चंद्रकांत वैराळकर, मंजुश्री पाटील, सविता धंदर यांच्यासह पालक वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलन व आभारप्रदर्शन दीपक चौधरी यांनी केले.

ओबीसी समन्वय समितीचा एल्गार; २ सप्टेंबरचा शासन निर्णय जाळून केला निषेध

# ओबीसीत कोणत्याही प्रकारची घुसखोरी होऊ देणार नाही

**बुलढाणा / प्रतिनिधी**

प्रगत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात सामावून घेऊ नये. शासनाने २ सप्टेंबर रोजी काढलेला जीआर तातडीने रद्द करावा, या प्रमुख मागणीसह ओबीसी महामंडळाकडून थेट ५ लाख कर्ज रुपये देण्यात यावेत. ओबीसी जातिनिहाय जनगणना व न्या रोहिणी आयोग लागू करण्यात यावा, या मागण्यांसाठी सोमवारी ओबीसी समन्वय समिती बुलढाणा यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. तद्नंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.





शासनाच्या अन्यायकारक धोरणांविरोधात घोषणाबाजी करत ओबीसी समाजबांधवांनी तीव्र रोष व्यक्त केला. तर २ सप्टेंबरचा शासन निर्णय जाळून निषेध नोंदविण्यात आला. या धरणे आंदोलनाला ओबीसी समाजातील विविध घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तरुण, महिला व मायक्रो ओबीसी घटकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती ही या आंदोलनाची ताकद ठरली. दरम्यान ओबीसी समन्वय समितीच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर ओबीसी चळवळीचे बांधणी केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. आंदोलनामध्ये बारा बलुतदार महासंघचे प्रदेश उपाध्यक्ष दामोदर बिडवे, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष संतोष खांडेभराड, समता परिषदेचे राज्य सल्लागार प्रा. सदानंद माळी , माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विजय खरात, गुरव समाजाचे जिल्हाध्यक्ष गोपाल सोनटक्के, सुतार समाजाचे जिल्हाध्यक्ष अनंत राऊत, लोहार समाजाचे नेते प्रकाश सुरडकर, शिवसेना नेते, श्रीराम झोरे, विजय जागृत, प्रकाश सपकाळ, सुनील शेजुळकर,समाधान जंजाळकर ,प्रवीण भुतेकर विजय भुतेकर, डॉ. विजय खोलाडे ,विनोद खोलगडे, एकनाथ खानजोडे, राजेश इंगळे , नारायण जाधव यांच्यासह ओबीसी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या आंदोलनाचे आयोजन ओबीसी समाज समिती बुलढाणा समन्वय समितीचे निमंत्रक सतीश शिंदे, प्रा सदानंद माळी यांनी केले.

### ओबीसीवर अन्याय करणारा अध्यादेश तात्काळ मागे घ्या

■ ओबीसी समाज समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ''मराठा समाजाच्या महामंडळाला हजारो कोटी रुपयांचा निधी मिळतो, मात्र ओबीसी महामंडळाला तुटपुंजा निधी देऊन थातूर-मातूर मदत केली जाते. ओबीसी प्रवर्गात तब्बल ३७६ पेक्षा जास्त जाती आहेत. एवढ्या मोठ्या समाजघटकाला न्याय मिळणे अपेक्षित असताना शासन सातत्याने ओबीसींवर अन्याय करत आहे. २ सप्टेंबरच्या हैदराबाद गॅझेटीर जीआरमुळे ओबीसी समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून समाजाचा हक्क हिरावला जात असल्याची भावना जनमानसात निर्माण झाली आहे.'' तो ओबीसीवर अन्याय करणारा अध्यादेश तात्काळ मागे घेऊन ओबीसीमध्ये होणारी जबरजस्तीची घुसखोरी थांबली पाहिजेत या व इतर मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले.

## प्रहार महिला आघाडी शहरप्रमुखपदी प्रीतीताई गुजर

**धाड** : बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महिलांमध्ये स्वाभिमान व आत्मविश्वास जागविणाऱ्या तसेच गेल्या अनेक वर्षांपासून प्रहारच्या सक्रीय सदस्या प्रीतीताई गुजर पाटील यांची नुकतीच प्रहार जनशक्ती पक्ष अंगीकृत प्रहार महिला आघाडीच्या धाड शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

धाडनगरी व परिसरात गेली अनेक वर्षांपासून प्रिती गुजर यांनी पती प्रवीण गुजर यांच्या खांद्याला खांदा लावून प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून महिलांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. इतकेच नव्हेतर बचत गटाच्या माध्यमातून आपल्या महिला सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी अनेक महिलांना सक्षम व स्वाभिमानी बनवले आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू



यांच्या आदेशान्वये,वैभवराजे मोहिते यांच्या शिफारशीवरुन पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष बल्लूभाऊ जवंजाळ यांनी प्रीतीताई गुजर पाटील यांची प्रहार महिला आघाडीच्या धाड शहरप्रमुखपदी नियुक्ती केली आहे.महिलांच्या समस्या सोडवण्यासह शाळा, विद्यालय आणि महाविद्यालयीन मुलींच्या प्रश्नांवर आपण प्रभावी काम करणार आहोत. सोबतच पक्ष, संघटना वाढविण्यावर तसेच प्रहार महिला आघाडीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर आपला भर राहणार असल्याची प्रतिक्रिया प्रीती गुजर पाटील यांनी दिली.